
श्रीकैलास ते सिंधुसागर



२० जानेवारी १९६८
चाळीस पैसे

# माणूस



सर्वांनी पाठिंबा द्यावा
असाच हा कार्यक्रम आहे.
मी औरंगाबादला
येत आहे.
दि. ३० जानेवारी
सायंकाळी ६ वाजता.
खासदार
जॉर्ज फर्नांडीस



समग्र साप्ताहिक
# माणूस

वर्ष : सातवे : अंक : चौतिसावा
वार्षिक वर्गणी : वीस रुपये
परदेशची वर्गणी : चाळीस रुपये
संपादक
श्री. ग. माजगावकर
साहाय्यक
दिलीप माजगावकर
सौ. निर्मला पुरंदरे

स. न.

३०–१२ च्या ' माणूस 'मधील आपली संचालनाची योजना राष्ट्राची शान राखण्यासाठी आगत्याची आहे. आपण आमच्यासमोर तो योग्य वेळी ठेवली त्याबद्दल आपले धन्यवाद.

या नव्या जबाबदारीची जाणीव ठेवून आम्ही स्वावलंबनाने अन्नसमस्या सोडविण्यासाठी अविश्रांत श्रम घेण्याचे आजपासून ठरवले आहे. त्याप्रमाणे कार्यक्रम आखले, उन्हाळयातदेखील हायब्रीडचे पीक घ्यायचे ठरवले, काम चालू केले, पूर्व मशागती होत आल्या. अडचणी व त्रास यांचा पाठपुरावा करून किमान गरजेच्या तिप्पट उत्पादन येईल असे करीत आहोत.

२६ जानेवरीला आपला व इतरांचा शुभ संदेश ऐकण्यासाठी औरंगाबादला येत आहोत. आमच्याप्रमाणेच देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यात हा आवाज घुमू द्या.

**दिगंबर बिनीवाले**
केंद्र ढवलापुरी, औरंगाबाद

मूल्य ४० पैसे
४१९ नारायण
पुणे २
दूरध्वनी : ५७३५९

प्रकाशित लेख, चित्रे, इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी ' माणूस ' साप्ताहिकाचे चालक सहमत असतातच असे नाही. ललित साहित्यातील पात्रे संपूर्णपणे काल्पनिक आहेत.

आपल्या देशातील लोकशाहीला धोका निर्माण झालेला आहे याचा कॉंग्रस-श्रेष्ठांना आता साक्षात्कार झालेला दिसतो. गेल्या आठवड्यात हैद्राबाद येथे कॉंग्रेसचे वार्षिक अधिवेशन भरले असताना नवे पक्षाध्यक्ष श्री. निजलिंगप्पा यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात जर कोणती एक गोष्ट घोळून घोळून सांगितली असेल तर ती हीच आहे की, बंधूंनो आपली लोकशाही धोक्यात आहे. गेल्या वर्षी झालेल्या सार्वत्रिक निवडणुकीत, आतापर्यंत सत्तेची मिरासदारी बाळगणाऱ्या कॉंग्रेस पक्षाला नामुष्की स्वीकारावी लागली. मध्यंतरी तर काही काळ अशी परिस्थिती होती, की देशाच्या दोन तृतीयांश भूभागावर कॉंग्रेसेतर पक्षांच्या प्रतिनिधींचा कारभार चालू होता.

या पार्श्वभूमीवर हैद्राबाद येथील अधिवेशनाचे नगारे वाजू लागल्यामुळे साहजिकच अशी अपेक्षा होती, की आता तरी हा पक्ष थोडेसे आत्मनिरीक्षण करील. परंतु काहीही शिकण्याची या पक्षाची इच्छा नाही ही गोष्ट पुन्हा एकदा सिद्ध झाली. आज आपला देश एका बिकट कालखंडातून वाटचाल करीत आहे. आर्थिक

# दिल्ली दरबार

परिस्थिती एवढी बिकट आहे की चौथ्या योजनेचे काय होणार आहे हे आज कोणीच सांगू शकत नाही. सर्वसामान्य नागरिकांचे जीवनमान कमालीचे त्रासदायक झालेले आहे. अन्नधान्यासारख्या जीवनावश्यक वस्तूंची टंचाई आणि त्यापायी निर्माण होणारी महागाई यांमुळे सर्वसामान्य माणूस अक्षरश: गांजून गेला आहे. जी गोष्ट आर्थिक परिस्थितीची तीच राजकीय परिस्थितीलाही लागू आहे. गेल्या वर्षभरात या देशात जेवढ्या दंगली व जेवढे हिंसाचार झाले तेवढे गेल्या वीस वर्षांतदेखील झाले नसतील. दंगल, जाळपोळ, लुटालूट, लाठीहल्ला, अश्रुधुराचा मारा, गोळीबार हे शब्द दररोज वर्तमानपत्रांच्या पहिल्या पानावर ठळकपणे वाचावयास मिळत होते. चीन–पाकिस्तानांचा धोका ही तर आता नित्याची बाब झालेली आहे. पूर्वेकडे नागा, मिझो आदी बंडखोरांनी भारताच्या सार्वभौमत्वालाच आव्हान दिलेले आहे.

हे सर्व पाहिले की सुजाण नागरिकाला लोकशाहीच्या भवितव्याबाबत चिंता वाटणे साहजिकच आहे. साधारणत: कोठेही सद्य:स्थितीची चर्चा सुरू झाली की आपल्या लोकशाहीचे खरोखरच काय होणार आहे हा प्रश्न हमखास विचारला

जातो. निजलिंगप्पा यांनी आपल्या भाषणात या प्रश्नांची दखल घेतली आहे असे मात्र मुळीच नव्हे. त्यांच्या दृष्टीने काँग्रेस पक्ष हा लोकशाहीचा ठेकेदार आहे. काही राज्यांतील काँग्रेस सरकारांची हकालपट्टी झाल्यामुळे आपल्या देशातील लोकशाही धोक्यात आहे हो, असा निजलिंगप्पा यांनी आक्रोश केला आहे. त्यांच्या या आक्रोशा-वरून काँग्रेस पक्षाच्या पुढील वाटचालीची दिशा मात्र स्पष्ट होत आहे.

संमिश्र मंत्रिमंडळांना सुरुंग लावण्याचा निर्धार करूनच निजलिंगप्पा आणि त्यांचे सहकारी हैद्राबादहून दिल्लीला परतले आहेत. गेले वर्षभर प्रधानमंत्री श्रीमती इंदिरा गांधी आणि त्या वेळचे पक्षाध्यक्ष श्री. कामराज संमिश्र मंत्रिमंडळाबाबत आपण पक्षपाती भूमिका घेणार नाही असे आश्वासन देत होते. सत्ताबाजीने पोखरलेल्या या पक्षाचा हा आव जेमतेम वर्षभर टिकू शकला. गमावलेली सत्ता कसेही करून हाती घेण्यासाठी काँग्रेसपक्ष आता इतका अधीर झाला आहे, की त्यालाही संमिश्र मंत्रि-मंडळाचा प्रयोग करून पाहण्याची हुक्की आलेली आहे. पश्चिम बंगालमधील डॉ. घोष यांच्या सरकारमध्ये सहभागी होण्याचा निर्णय हैद्राबाद अधिवेशनात करण्यात आला तेव्हाच काँग्रेसची सत्तालालसा किती प्रभावी आहे हे दिसून आले. कारण अजय

## हे म्हणे लोकशाहीचे आधारस्तंभ !

मुकर्जी यांचे मंत्रिमंडळ बरखास्त करताना राज्यपाल श्री. धर्मवीर यांनी जी अका-रण आणि अनुचित घाई केली तिच्यामागच्या कारणाचा आता उलगडा झाला आहे.

अजय मुकर्जी यांच्या मंत्रिमंडळाने विधानसभेत बहुमत गमावले होते ही गोष्ट निर्विवाद आहे. कम्युनिस्टांच्या वर्चस्वामुळे संमिश्र राजवटीच्या काळात बंगाल-मधील शांतता आणि सुव्यवस्था यांना सुरुंग लावण्याचा पद्धतशीर प्रयत्न होत होता ही गोष्टही कोणीच अमान्य करीत नाही. स्वतः अजय मुकर्जीही कम्युनिस्टांच्या कारवायांना कंटाळून राजीनाम्याची भाषा बोलू लागले होते. अशा परिस्थितीत ज्योति बसू आणि कंपू सत्ताभ्रष्ट झाला याबद्दल कोणताही राष्ट्रवादी आणि लोक-शाहीनिष्ठ नागरिक समाधानच व्यक्त करील. असे असले तरीही मुकर्जी मंत्रिमंडळ बडतर्फ करण्याची घाई करण्याचे कारण नव्हते. मूळ कार्यक्रमानुसार विधानसभेचे अधिवेशन भरले असते तर पहिल्या दिवशीच मुकर्जी महाशयांना खुर्ची सोडावी लागली होती. परंतु तेथे असे घडले नाही. आपले मंत्रिमंडळ सावरता येते की नाही याचा अंदाज घेण्यासाठी मध्यप्रदेशात द्वारकाप्रसाद मिश्र यांना पुरेसा अवधी देण्याची सावधगिरी बाळगण्यात आली होती. राजस्थानमध्ये काँग्रेस राजवटच

आली पाहिजे या आग्रहापायी राष्ट्रपतींच्या राजवटीचा प्रयोग करण्यात आला होता.

काँग्रेस मंत्रिमंडळांना एक न्याय व काँग्रेसेतर मंत्रिमंडळास दुसरा न्याय अशी पक्षपाती वर्तणूक करणाऱ्या पक्षाच्या प्रमुखाला संमिश्र सरकारमुळे लोकशाही धोक्यात आल्याची गर्जना करण्याचा मुळीच अधिकार नाही. म्हणूनच नाजूकसाजूक भाषेतील निजलिंगप्पा यांचे भाषण निरर्थक वाटले. सर्व राज्यांचे आपापसातील तंटे सामोपचाराने मिटावेत, असे निजलिंगप्पा अध्यक्षपदाची झूल अंगावर चढताच सांगू लागले आहेत. म्हैसूरचे मुख्यमंत्रिपद सांभाळताना निजलिंगप्पा यांनी लोकशाहीची आणि सामोपचाराची किती बूज राखली असा प्रश्न जर बेळगावच्या जनतेने त्यांना विचारला तर निजलिंगप्पा काय उत्तर देऊ शकतील ? ज्याचा लोकशाहीवर विश्वास आहे तो माणूस लोकशाहीचे निर्णय स्वीकारताना टाळाटाळ करीत नाही.

अशा या निजलिंगप्पा यांना आणि त्यांच्या सहकाऱ्यांना पाचसहा राज्यांत काँग्रेसेतर पक्षांची मंत्रिमंडळे अधिकारावर येताच लोकशाहीची आठवण व्हावी, याचा साधा आणि सरळ अर्थ असा की गेले वर्षभर स्वस्थ बसलेले काँग्रेसश्रेष्ठ यापुढे बिहार आणि उत्तरप्रदेश येथील संमिश्र मंत्रिमंडळाविरुद्ध कारवाई करण्यास उतावीळ झालेले आहेत. संमिश्र मंत्रिमंडळाचा कारभार समाधानकारक आहे असे कोणीच म्हणत नाही. संयुक्त आघाड्यांच्या संधिसाधू राजकारणातून केवळ कम्युनिस्टांसारख्या राष्ट्रद्रोही आणि लोकशाहीविरोधी पक्षांचेच फावते ही वस्तुस्थिती आहे. परंतु अहोरात्र सत्ताबाजीच्या नशेत गुरफटलेल्या काँग्रेस पक्षाने लोकशाहीचे नाव घेऊन संमिश्र मंत्रिमंडळावर आगपाखड करणे म्हणजे सैतानाने बायबलचा आधार घेण्यासारखे आहे.

काँग्रेस (सत्तेवर) टिकण्यावरच देशाचे ऐक्य टिकणार आहे असाही दावा निजलिंगप्पा यांनी केला आहे. वस्तुस्थिती अशी आहे की काँग्रेसच्या गेल्या वीस वर्षांच्या राजवटीतच या देशातील फुटीर भावना विशेष जोराने वाढीस लागली. महाराष्ट्र काँग्रेस आणि म्हैसूर काँग्रेस यांच्यात आज कोणत्या प्रकाराने सामंजस्य आहे हे दोन्ही राज्यांतील विधानसभा आणि पक्ष बैठकीत झालेल्या चर्चेवरून सहज ध्यानात येण्यासारखे आहे. इंग्रजी-हिंदी वादावरून उत्तरेकडचे काँग्रेसवाले आणि दक्षिणेकडचे काँग्रेसवाले यांच्यात कितीसे मतैक्य आहे ? आणि हे सारे धडधडीत दिसत असताना काँग्रेस टिकली तरच देशाचे ऐक्य टिकेल हा दम निजलिंगप्पा मिरवीत आहेत. परंतु यातही आता नवल वा खेद वाटण्याजोगे राहिलेले नाही. गोंडस शब्दांच्या आवरणाखाली नाइलाजाने मशगुल होऊन जायचे हाच येथल्या राजकारणाचा स्थायीभाव झालेला आहे. लोकशाहीला खरा धोका आहे तो या प्रवृत्तीपासून.

**सदाशिव पेठकर**

O

पटवर्धन शिक्षक आहेत. आपल्या त्यागशील सेवेबद्दल त्यांना राष्ट्रपती पदक मिळाले आहे. तथापि त्यांच्या आनंदी, समाधानी वृत्तीचे रहस्य ह्या सन्मानात नाही. ते म्हणतात, "मी सुखी आहे याचे कारण म्हणजे माझी मुले मार्गी लागली आहेत. मला दोनच अपत्ये आहेत. थोरला विजय प्राध्यापक असून धाकटी नलिनी लवकरच डॉक्टर होईल. मुले थोडीच असणे बरे.



कारण त्यामुळेच पालक त्यांना सुस्थितीप्रत नेऊ शकतात. ह्या दृष्टीने मी सुखी आहे."

## पटवर्धन सुखी आहेत —

## तसेच तुम्हीही ?



67/103

## □ 'आक्रमण' कशाला म्हणतात?

सर्व जगभर दररोज वापरल्या जाणाऱ्या या शब्दाची व्याख्या इतकी कठीण आहे, की संयुक्त राष्ट्रसंघटनेच्या जाहीरनाम्यातही ती आढळत नाही; इतकेच नव्हे तर आक्रमण नक्की कशाला म्हणावे हे ठरविण्यासाठी युनोने ३० तज्ज्ञांची एक खास समिती नेमली आहे. अशा या कूट प्रश्नावर काही तज्ज्ञांची मते ऐकायची संधी गेल्या काही दिवसांपूर्वी मिळाली. दिल्लीत नुकत्याच झालेल्या कायदे-पंडितांच्या आंतरराष्ट्रीय सम्मेलनासाठी निरनिराळ्या देशांचे सरन्यायाधीश व इतर कायदे-पंडित गोळा झाले होते. त्या वेळी त्यांच्यापैकी काहींनी या विषयावर आपली वैदग्ध्यपूर्ण मते प्रकट केली.

ईजिप्तचे सरन्यायाधीश आदल मुनीस : आक्रमण या शब्दाची व्याख्या करणे सोपे नाही, कारण आक्रमण निरनिराळ्या प्रकारचे असते. आंतरराष्ट्रीय आक्रमणाची व्याख्या करण्यासाठी आधी या शब्दाचा राष्ट्रीय किंवा अंतर्गत अर्थ समजून घेतला पाहिजे. उदाहणार्थ, एका माणसाने दुसऱ्या माणसावर किंवा त्या माणसाच्या मालमत्तेवर हल्ला केला तर ते आक्रमण ठरते. परंतु कायद्यात ज्याला सजा नाही असे अनुचित वर्तनही आक्रमण ठरू शकते. अशा प्रकारे आक्रमण अनेक प्रकारचे असू शकते, पण प्रत्येकात एखाद्या व्यक्तीला किंवा तिच्या मालमत्तेला इजा पोचलेली असते. आंतरराष्ट्रीय पातळीवर विचार करायचा तर "एखाद्या देशाने आंतरराष्ट्रीय शिष्टाचाराचा व सौहार्दाचा भंग करून दुसऱ्या एखाद्या देशावर हल्ला करणे" याला आक्रमण म्हणता येईल. वादविवाद मिटविण्यासाठी नेमण्यात आलेल्या कुठल्याही जागतिक संघटनेकडे न जाता "या वस्तूवर आमचा हक्क आहे" अशी सबब पुढे करून एखाद्या देशान ती दुसऱ्या देशाकडून बळजबरीने हिसकावून घेतली तर ते आक्रमण होईल.

वेब्स्टरच्या जगप्रसिद्ध शब्दकोशात लष्करी कारवाईच्या पूर्वतयारीला किंवा धमकीलाही आक्रमण म्हटले आहे, पण ते योग्य नाही. एखाद्या देशाने परचक्राविरुद्ध स्वसंरक्षण करण्यासाठी स्वतःच्या सीमेच्या आत तयारी केली तर त्याला आक्रमण म्हणता यणार नाही. धमकीच्या बाबतीतही असेच म्हणावे लागेल. धमकी का दिली गेली यावर सर्व अवलंबून आहे. सगळ्या धमक्याच काही आक्रमण ठरू

शकत नाहीत. उदाहरणार्थ, "स्वदेशाचे रक्षण करण्याची धमकी आक्रमण नाही," पण 'सूड घेण्यासाठी' दुसऱ्या देशावर चाल करण्याची धमकी निश्चितपणे आक्रमण आहे. आंतरराष्ट्रीय संबंधांच्या क्षेत्रात आक्रमणाची चोख व्याख्या अजून नाही याचे कारण बड्या देशांना ती नको आहे.

सिलोनचे सरन्यायाधीश फर्नांडो : वेब्स्टरची व्याख्या एकूण बरोबर आहे, पण धमकीला प्रत्यक्ष आक्रमण न म्हणता आक्रमणाच्या खालची पायरी म्हटले पाहिजे. पूर्वतयारी ही धमकीपेक्षा आक्रमणाच्या अधिक 'जवळ' आहे. धमकी ही आक्रमणाची पहिली पायरी आहे, तर तयारी ही पुढची. नेपोलियनच्या किंवा शिकंदरच्या लढाया ही आक्रमणाची उदाहरणे आहेत.

'इंटरनॅशनल लॉ कमिशन'चे भूतपूर्व अध्यक्ष प्रा. यासीन : आक्रमण ही एक राजकीय, सामाजिक व वैधानिक संज्ञा आहे. तेव्हा केवळ त्या शब्दाची व्याख्या करून चालणार नाही. परंतु आक्रमणाशी संबद्ध अशा सर्व गोष्टींचा साकल्याने विचार केला तर आक्रमणाची व्याख्या करणे अशक्य नाही. यूनो किंवा त्यापूर्वी लीग ऑफ् नेशन्ससारख्या आंतरराष्ट्रीय संघटना आतापर्यंत आक्रमणाची व्याख्या करू शकल्या नाहीत याचे कारण काही मंडळींना व्याख्या व्हावी अशी 'राजकीय इच्छा' नाही. आक्रमणाची व्याख्या करायची म्हणजे आंतर-राष्ट्रीय कायद्याच्या सबंध क्षेत्रावर आणि विशेषत: न्याय्य संरक्षणाच्या कल्पनेवर, शोधज्योत धरावी लागेल.

हल्ली बरेच प्रबळ पाश्चिमात्त्य देश आक्रमणाची व्याख्या करायला नाखूष असल्याने ही व्याख्या करणे अधिकच अगत्याचे झाले आहे. हल्ली दंडेलीचा आंतर-राष्ट्रीय उपयोग वाढत चालला असल्याने आक्रमणाची नक्की व्याख्या झाली तर आक्रमणावर व न्याय्य स्वसंरक्षणावर जी बजबाबवार विधाने केली जातात त्यांना पायबंद बसेल. या व्याख्येमुळे आंतरराष्ट्रीय जनमताला एखाद्या देशाच्या वाग-णुकीचे अधिक चांगले नियमन करता येईल. हे नियमन हाच सध्याच्या आंतर-राष्ट्रीय नियमांचा सर्वांत महत्त्वाचा भाग आहे.

पाकिस्तानचे अॅटर्नी जनरल शेख फियास महंमद : एखाद्या देशाच्या भौगोलिक सीमेच्या अथवा राजकीय स्वातंत्र्याच्या विरुद्ध कोठलेही शांतताभंजक कृत्य करणे म्हणजे आक्रमण होय. आक्रमण ही प्रकट गोष्ट असते, म्हणून काटेकोरपणे पाहता वेब्स्टरने उल्लेखिलेल्या पूर्वतयारीचा किंवा धमकीचा आक्रमणात अंतर्भाव करता येणार नाही. यूनोच्या जाहीरनाम्यावरून आक्रमण म्हणजे एखाद्या देशाच्या भौगो-लिक सीमेचे अथवा राजकीय स्वातंत्र्याचे बळजबरीने केलेले उल्लंघन अशी आक्र-मणाची व्याख्या करता येईल. जाहीरनाम्याच्या पहिल्या कलमात युनोचे उद्दिष्ट सांगितले आहे. त्यांतील शब्दप्रयोगावरून असे अनुमान काढता येईल की शांततेचा भंग झाल्याखेरीज ते आक्रमण म्हणता येणार नाही.

O



जयमाला काळे
राजा मयेकर

छाया : अरुण राजदत्त

अनेक राजकीय प्रश्न सुटतात वा मागे पडतात, कलाकार मात्र विनाकारण खर्ची पडतात.

मी स्वत: शिवसेनेचा सैनिक किंवा सहप्रवासी नाही. तरी पण एखाद्या कलामाध्यमातून अन्य कोणत्याही विचारप्रणालीप्रमाणे समजा या विचारप्रणालीचा प्रचार त्या माध्यमाची योग्य ती बूज ठेवून कोणी रसाळपणे केला तर मला तो एक प्रेक्षक किंवा श्रोता म्हणून चालेल 'आंधळं दळतंय' हे साबळे पार्टीचे आधीचे 'मुक्त नाटच' हे या प्रकारच्या प्रचाराचे उदाहरण. प्रचार आपण पाहता पाहताच या कानाने ऐकून त्या कानाने सोडून दिला आणि करमणूक घेतली. ती भरपूर होती. काही दर्जेदार, काही सस्ती; काही चमकदार, काही बालिश; काही प्रोज, काही संगीत-रंगीत. बोलून चालून 'मुक्त-नाटच;' त्यात अमुकच असावे, तमुक नसावे अशी चोखंदळ अपेक्षा का म्हणून ठेवायची? कोठून तरी अडीच तीन तास चांगले गेल्याशी कारण, राजा मयेकर

# रातराणी

आणि शाहीर साबळे या दोघांनी मिळून तेवढी तरतूद ' आंधळं दळतंय ' मध्ये बव्हंशी केली होती. त्या आधारावर या पार्टीचे नवे ' असुनि खास मालक घरचा ' परवा मुंबईतील रवींद्र थिएटरात पाहायला गेलो.

थिएटरच्या दाराशी पोलिस बंदोबस्त होता. या कार्यक्रमाला शिवसेनाप्रमुख बाळ ठाकरे येणार; त्यांच्या संरक्षणार्थ हा आहे असे कळले. कार्यक्रमाची जाहीर वेळ होऊन गेली तरी शिवसेनाप्रमुखांसाठी बाहेर जबाबदार कार्यकर्ती मंडळी बघ्यांसह आणि थिएटरात शेकडो प्रेक्षकांसह कार्यक्रम खोळंबलेला होता. नंतर ठाकरे आले ते कार्यक्रमाच्या आरंभानंतर केव्हातरी आणि चाललेला कार्यक्रम विसरून थिएटरा-तल्या शेकडो प्रेक्षकांनी जोरदार टाळ्या वाजवून त्यांना उत्थापन दिले. मध्यंतरात ठाकरे यांचे मराठी माणसावरचे भाषणही झाले. ठाकरे यांच्याच सांगण्यावरून हा

## असुनि खास मालक

कार्यक्रम प्रत्यक्षात आला असे उल्लेख व्यासपीठावरून शाहीर साबळे यांनी कृतज्ञतेने केले. ठाकरे यांना निष्ठेचे आश्वासन दिले.

या साऱ्यामुळे एका रंजनात्मक कार्यक्रमाला आल्याच्या जाणीवेऐवजी संघटनेच्या मेळाव्याला आल्यासारखे मला तरी सारखे वाटत होते.

प्रत्यक्ष कार्यक्रमाने हा ग्रह पक्का केला. ' आंधळं दळतंय ' चा मुक्त बाज ' असुनि खास 'ला नव्हता. म्हणजे तंत्रदृष्टया ते मुक्त होते– नाटकातला मेलो-ड्रामा, वगातले विनोद, व्याख्यानबाजीतली टाळ्याची वाक्ये, लावण्या– म्हम्बा साम्बा–कथाकली, भरतनाटयम् असे सगळे आणि अधिक बरेच त्यात केवळ निमि-त्ताचे निमित्त करून भरले होते; पण विषयापुरते एका प्रश्नापेक्षादेखील एका

**विजय तेंडुलकर**

विचारप्रणालीला ते करकचून बांधलेले होते. केवळ एका प्रश्नाशी बांधलेले रंजन-माध्यम पुष्कळ गहिरे आणि मोकळे रंगू शकते याचे उदाहरण 'आंधळं दळतंय'. विचारप्रणालीचाच गंडा बांधलेले तेच रंजनमाध्यम कसे एकसुरी, क्वचित् आक्रस्ताळे आणि जखडलेले होते त्याचे उदाहरण 'असुनि खास मालक'. त्यातही ही विचारप्रणाली एका मर्यादित कक्षेसाठी आणि तात्पुरत्या उद्दिष्टासाठीच असली म्हणजे या माध्यमावरही ही बंधने अपरिहार्यपणे पडतात. 'मालक घरचा'ने सोयीसाठी कथेचे एक तमाशा फडाचे रूपक घेऊन ते राबवून आणि अखेरी तेही तोडून बीपीसीसी विरुद्ध मुंबई महापालिकेच्या निवडणुकांचा उघड उघड पुकारा केला तेव्हा टाळ्या मिळाल्या त्या शिवसेनेच्या विचारप्रणालीला. मुक्त-नाट्याला मुक्त-प्रचाराचे स्वरूप आले होते आणि कलावंत एका राजकीय संघटनेचे प्रवक्ते उरले होते.

रूपकाच्या स्वरूपातले कथानक सांगायचे तर दादा आणि म्हादा (साबळे–भालेकर) ही जोडगोळी एका फडाची चालक-मालक. पण कंत्राटदार एक गुजराती शेठ, (मयेकर) मंदोदरी मुंबईकरीण या नाचणाऱ्या मुख्य बाईसकट उत्पन्नाची साय खाऊन या मंडळीला राबवीत असतो. भिगरी उंबरगावकरीण ही दुसरी नाचणारी 'सायडिंग' ला आणि मंदोदरी मुंबईकरीण 'मेन लायनी' वर अशी त्याच्या लंपटपणाची गाडी दोन लायनींवरून धावत असते. मंदोदरीवरून, तो एकटा विरुद्ध फड असा तंटा उभा राहतो. पुढे दिल्लीहून नारूबाबा म्हणून चौदा 'फडां'चा मुख्य येतो आणि बरीच गोलमाल करून अखेर मंदोदरीला आपणच ठेवणार–स्वतंत्र–असा निवाडा देतो. हा निवाडा कुणालाच मान्य न होऊन सवालजबाबांचा एक सामना होऊन नारूबाबा, मंदोदरी मुंबईकरीण फडाची नाचणारी आणि म्हादाची कायदेशीर बायको असल्याचा निर्णय देतो. मुंबई(करीण) फडाला मिळते. पैसेवाल्या गुजरात्याचा पराभव होतो. तो उंबरगाव(करणी)ला घेऊन चडफडत जातो. इथे या मुक्त-नाट्याचा एक भाग संपतो. संयुक्त महाराष्ट्राला मुंबई मिळाली येथवरचा हा रूपकात्मक कथाभाग झाल्यावर उंबरगावकरीण गुर्जर पोषाखात येऊन शेठने आपल्याला फार छळल्याचे उपरतिपूर्वक सांगते. येथून द्वितीयार्ध सुरू होतो. दाक्षिणात्य 'अण्णा' (मयेकर) येतो. फडाचा चालक दादा मुंबई(करणी)ला कॉस्मॉपॉलिटन करण्याच्या छंदाने पछाडला जाऊन अण्णा आणि त्याच्या 'उपऱ्या' नर्तक, झोपडपट्टीवाल्या वगैरे जातभाईंना हवा तसा धिंगाणा घालू देतो. निखळ लावणी-तमाशाचा 'मऱ्हाटी' बाज टाकून मुंबईकरीण भरत-नाट्यम्–ऱ्हम्बा साम्बा–गर्बा आणि भांगड्याचे 'थेर' सुरू करते. (प्रेक्षक इथे छान ताल धरीत होते;) पण तमाशाचा एक जुना वयोवृद्ध रसिक हे असह्य होऊन याविरुद्ध ओरडा आरंभतो. मऱ्हाटी बाण्याचा पुकारा करतो. (प्रेक्षकांनी यालाही पसंतीच्या टाळ्या मारल्या.) उपऱ्यांच्या आक्रमणाने 'फडा'तले मराठी बंधू बेकार

होऊन मुंबईकरणीचा फड सोडून देशोधडी जातात. मुंबईकरणीचा मालक म्हादा संभ्रमित, हताश होतो. त्याची कानउघाडणी होऊन "शेवटी 'उपऱ्यां'च्या हकालपट्टीची गर्जना होते. त्यासाठी बीपीसीसी विरुद्ध कार्पोरेशन निवडणुका जिंकण्याच्या घोषणा होतात.

असे हे उत्तरोत्तर मुक्तपणे राबवले गेलेले तमाशाचे रूपक आणि अशी ते संपूर्णपणे टाकून केली गेलेली या मुक्तनाटचाची उघडीवाघडी कार्पोरेशन निवडणूक-राजकारणात्मक अखेर.

रूपकाबरोबर त्यातल्या व्यक्तिरेखादेखील प्रचारार्थ फार राबवल्या गेल्या. मग त्या प्रातिनिधिक राहण्याऐवजी सांकेतिक, एकांगी आणि निष्प्राण झाल्या. प्रचाराची आणि टाळयांची वाक्ये उच्चारण्यासाठी योजिलेली केवळ चार तोंडे बनल्या. राजा मयेकर यांच्यासारखा अत्यंत चतुर आणि गुणी कलाकार प्रामुख्याने अंगविक्षेपांचे विनोद करून प्रेक्षकांना येन केन प्रकारेण हसवण्यात गुंतून पडला. शाहीर


**डोंगरे अप्सरा हेअर ऑईल** तर्फे होणाऱ्या

**"नववधू प्रियदर्शिनी केशभूषा"**

स्पर्धेत भाग घेऊन आकर्षक बक्षिसे मिळवा

**स्पर्धेची ता. २३ फेब्रुवारी १९६८**

षण्मुखानंद हॉल, मुंबई नं. २२

*आकर्षक बक्षिसे*

१. बजाज कुकिंग रेंज ओव्हनसहित
२. एवरेस्ट वॉशिंग मशीन
३. मर्फी ट्रान्झिस्टर रेडिओ
४. रिको डोमेस्टिक मिक्सर
५. इलेक्ट्रिकल हेअर ड्रायर
६. बजाज मोठा प्रेशर कुकर
७. इलेक्ट्रिकल कॉफी परकोलेटर
८. बजाज लहान प्रशर कुकर
९. बजाज डीलक्स अॅटोमॅटिक इस्त्री इलेक्ट्रिकल
१०. बजाज डीलक्स टोस्टर

प्रवेशपत्रिका भरून पाठविण्याची शेवटची तारीख १ फेब्रु. १९६८

*प्रवेश-पत्रिका अप्सराच्या बाटलीबरोबर मिळेल.*

बृहन्मुंबई व ठाणे जिल्ह्याकरिता फक्त

**के. टी. डोंगरे आणि कं, पुणे प्रा. लि.**

८२, नगीनदास मास्तर रोड, मुंबई नं. १

साबळ्यांचा गोड गळा जेमतेम सवालजबाबात सुरात बोलला. सुहास भालेकर प्रातिनिधिक सरळ मनाचा मऱ्हाटी माणूस म्हादा म्हणून तुलनेने अधिक उठून दिसले. तेच या मुक्त-नाट्याचे दिग्दर्शकही होते. नाचणारणी बऱ्या नाचल्या पण तमासगिरणींचा कडक ठसका त्यांच्या नृत्यांत दिसला नाही; त्याची उणीव त्या रूपाने आणि गोडव्याने भरून काढताहेतसे वाटले.

प्रकाश मळकर्णेकरांचे नेपथ्य या माध्यमाला साजेसे साधे, सुटसुटीत आणि देखणे होते. लावण्यांच्या चाली रूढ थाटाच्या आणि मधुर होत्या. लावण्यांची शब्दयोजना चटपटीत होती.

परंतु एकंदरीने साबळे पार्टीचे मुक्त-नाट्य प्रचाराखाली जरूर त्याहून अधिक खर्ची पडले आहे, असे वाटले. आठवण झाली ती नेमकी कम्युनिस्टादी पक्षांच्या जुन्या कलापथकांची. यात खूप गुणी कलावंत असत परंतु कलामंचाचे प्रचार-पीठ होऊन या कलावंतांच्या गळ्यांतून, मुखांतून, अभिनयांतून आणि नृत्यांतून निघे तो कोरडा ठणठणीत तारसप्तकातला तात्कालिक प्रचार. ते राजकीय प्रश्न सुटले वा मागे पडले — या प्रचाराला त्याचे नाममात्रच मिळाले तर श्रेय— आणि ते दैवी कलागुण तात्पुरत्या राजकारणी महत्त्वाकांक्षांच्या सेवेत कायमचे खर्ची पडून संपले उरले आहे, ते गुण वागवणाऱ्या एकेका मनस्वी कलावंतात एक वैफल्य—उघड वा छुपे—पण निश्चित.

शाहीर साबळे, राजा मयेकर, सुहास भालेकर आणि त्यांच्या सहकाऱ्यांचे असे होणार नाही अशीच माझ्यासारख्याची अपेक्षा. ◻

# गीत सौभद्र

' हा तर केवळ साखरेचाच साखरभात, भात नाही ही एक तकलीफच आहे ' एक संगीत प्रेमी

संगीत नाटकांच्या तूर्तच्या-नव्या सुगीत दोन संगीता दिग्दर्शक प्रकर्षाने लोकप्रिय झाले आहेत. एक वसंत देसाई आणि दुसरे जितेंद्र अभिषेकी. पैकी अभिषेकींचे संगीत-दिग्दर्शन जुन्या नाट्यसंगीताच्या संपन्न परंपरेतून नव्या मातबर वाटा काढण्याच्या बंडखोर प्रयत्नात सातत्याने भासते ('कट्यार काळजात घुसली ') तर जुनाच नाट्यसंगीताचा बाज कालानुरूप आणि स्वतःच्या व लोकांच्या आवडी-निवडीनुरूप नवी भर घालून जुन्या वजनाने पुन्हा



। जयमाला शिलेदार । रामदास कामत ।

मांडण्याचा ध्यास वसंत देसायांच्या संगीतदिग्दर्शनात जाणवतो. याचा प्रत्यय नव्याने मिळाला तो 'ललित कलादर्श'ने हिरकमहोत्सवात सादर केलेल्या 'गीत सौभद्रा'त: बिर्ला मातुश्री सभागारातील हा सलामीचा प्रयोग पाहण्या-ऐकण्याला रसिक नाट्यप्रेमी अहमहमिकेने आणि उत्सुकतेने हजर होते. कारण परंपरेत, आपल्या संगीत आणि गद्य अंगांनिशी पक्के दृढमूल झालेले आणि शिवाय आजतागायत लोकप्रियदेखील असलेले अण्णा किर्लोस्करांचे 'सौभद्र' नव्या पूर्ण-संगीत रूपात मांडणे मुळीच सोपे नव्हते किंवहुना ते एक धाडसच होते.

बिर्ला मातुश्री सभागारात त्या रात्री सादर झाले ते मूळचे संपूर्ण 'सौभद्र' नव्हे, तर तो होता मूळ संहितेचा उणापुरा दीड अंक. केवळ हा दीड अंकच पूर्ण-संगीत रूपात सुमार साडेतीन तास चालला. सोयीसाठी या दीड अंकाचे तीन अंक करण्यात आले होते आणि या नव्या अ-पूर्ण 'सौभद्रा'ची प्रस्तावना रंगमंचावर येऊन केली ती खुद्द संगीत-दिग्दर्शक वसंत देसाई आणि प्रयोगाचे सूत्रधार भालचंद्र पेंढारकर यांनी. उरलेले 'सौभद्र' स्वतंत्रपणे पुढे सादर करण्याचा संकल्प दोघांनी सोडला आणि या धाडसी प्रयोगाचा पडदा वर गेला. 'राधाधरमधुमिलिंद जय जय'चा मधुर गजर करीत नारदमुनी (मास्टर दामले) रंगमंचावर अवतरले. नंतर अर्जुन (रामदास कामत) आला. जुन्या साक्यादिंड्यांचे चरण चढ्या स्वरात दणाणले.

'लग्नाला जातो मी' रंगले. या अंकाची अखेर झाली ती नारदाच्याच जुन्या लोकप्रिय 'पावना वामना' वर.

अंक रंगला परंतु काही गोष्टी लक्षात आल्या. पैकी एक अशी की 'सौभद्रा'तल्या गतिमान खेळकर गद्याची लज्जत इथे हरवली होती. हे गद्यही पद्याइतकेच महत्त्वाचे आणि रुचकर आहे हे त्याच्या अभावाने कळू लागले. त्याऐवजी आले ते ग. दि. माडगूळकरांचे नवे पद्य– का, कसे ते कुणास ठाऊक–पण जुन्या पद्यात मिसळत नव्हते; वेगळे पडत होते. केवळ शब्दांनीच नव्हे तर स्वरांनीदेखील. किंबहुना शब्द-स्वरांचा हा नवा मेळच जुन्या मेळापासून अनेक जागी विलग वाटत होता. परिणामी एकसंघ परिणाम होण्याऐवजी दुहेरी परिणाम घडत होता. नवा भाग श्रवणीय वाटला तर जुना नेहमीप्रमाणे अतीव मधुर आणि आकर्षक ठरला होता. जुन्याची सर नव्याला नाहीच असे म्हणण्याचा सनातनी मोह माझ्यासारख्या नव्याच्या चाहत्यालाही होऊ पाहत होता म्हणजे पाहा !

दुसऱ्या अंकात सुभद्रा (जयमाला शिलेदार) मूर्च्छित अवस्थेत रंगमंचावर दिसली. राक्षस ( सुकुमार नागोटकर ) गायला. नंतर मूर्च्छा टाकून सुभद्रा गायली. अर्जुन आला. गाण्यांची मेजवानीच सुरू झाली. यात जुने मोजके होते. नवेच अधिक होते. जयमाला शिलेदार आणि रामदास कामत या नव्याला कसून न्याय देत होती. जुन्या पदांच्या तवियतीने नवी पदे गायली गेली. परंतु या अंकाअखेरी वाटले ते पहिल्या अंकाअखेरसारखेच. जुना पद्य-स्वरांचा मेळ अवीट होता. केवळ सवयीने वा भक्तीने नव्हे तर अगदी निर्विकल्पपणे जुने-नवे ऐकून असे वाटले. केवळ वैचित्र्य आणि श्रवणीयतेपलीकडे नवे सरकत नव्हते. गळे तेच, नाटक तेच, पण फरक जाणवत होता यात शंका नव्हती. आणि शिवाय मूळच्या गद्याची फार आठवण होत होती.

तिसऱ्या अंकात कृष्ण ( राम मराठे ) आला. वक्रतुंड ( चंदू डेगवेकर ) त्याच्या जोडीने गायला. या अंकातल्या वक्रतुंडाच्या तोंडच्या ठसकेदार पद्याला मूळ गद्याहून बढिया खुशखुशीतपणा जाणवत होता तरीही मूळच्या संवादांची गोडी या स्वरबद्ध पद्य संवादात आली नाहीच. येथवर केवळ संगीताच्या निखळ मालिकेमुळे एक प्रकारचा गतिहीन एकसुरीपणाही या प्रयोगाला आला आहे असे वाटले. प्रत्येक पद्य संवाद तानपलटयांनी आणि पुनरावृत्त्यांनी सुरेल पण घोटाळता होऊन प्रयोगाचा एकूण ओघ अति-संथ झाला होता. त्यात रंगमंचावर फारशी हालचाल नव्हती. फार तर दोन आणि अनेकदा एकच पात्र रंगमंचावर जागच्या जागी वावरत होते. पाहण्यासारखे काही नव्हते आणि केवळ ऐकण्यासारखे तेवढेच उरले होते; त्यातही फारसा रुचिपालट किंवा 'रिलीफ' नाही असे वाटत होते.

माझ्या पलीकडचे एक वयस्क संगीतवेडे गृहस्थ उद्गारले, 'हा तर केवळ साखरेचाच साखरभात वाढला आहे– भात नाहीच ! ही एक तकलीफच आहे...'

दुसरे नाट्यप्रेमी ज्येष्ठ सद्गृहस्थ 'चंगळ आहे– लयलूट आहे' असा दिलखुलास अभिप्राय व्यक्त करून गेले पण ते तिसऱ्या अंकात त्यांच्या आसनात नव्हते. व्यक्तिश: मला वाटले ते असे की संगीतिका आणि संगीत नाटक हे दोन वेगवेगळे प्रकार मानून दोन्हींचे शब्द-स्वर-लेखन आणि प्रयोग केले जावेत. संगीत नाटकाला गद्य संवाद हाच रुचिपालट किंवा 'रिलीफ' असतो. गद्याला अंगचीच एक गती आणि ओघही असतो. परंतु संगीतिकेत गद्याअभावी रुचिपालटाची, गतीची, ओघाची काही निराळी व्यवस्था योजण्यात आली पाहिजे. न रेंगाळणाऱ्या गतिमान घटना, त्यासाठी आवश्यक तर फिरता रंगमंच, अनेक लहानमोठी चित्रविचित्र पात्रे त्यांच्या पूर्वनियोजित हालचाली, आणि मुख्यत: दुडके, गतिमान पद्य तशाच स्वरलेखनासहित—अशी काहीशी ती व्यवस्था होऊ शकेल. उदाहरणार्थ 'सौभद्रा'लाच मग त्यातले संथगती दीर्घ प्रवेश मोडून अधिक स्थळे, वैचित्र्य, जरूर तर पात्रे द्यावी लागतील. यात मग जुन्या 'सौभद्रा'तील संगीत सौंदर्यस्थळे पुन्हा नव्याने आणता येतील, पण ती नव्या गतिमान पुनर्रचनेत.

परंतु पाश्चात्त्य 'ऑपेरा'च्या विशुद्ध शास्त्रीय संगीतमय धर्तीवरच आपल्या संगीतिका जाणार असतील तर 'ललितकलादर्श'चे 'गीतसौभद्र' ही त्याची चुणूक म्हणावी लागेल. पण उणीव निघेल ती इतकीच की माडगूळकरांचे पद्य 'पदे' म्हणून अधिक प्रसादयुक्त व बंदिस्त आणि त्याच्या चाली होत्या त्याहूनही अधिक वजनदार गायनी धर्तीवरच्या हव्या होत्या.

याहूनही महत्त्वाची उणीव ही की असा केवळ शास्त्रोक्त संगीताचा जलसा ऐकण्यासाठी श्रोतेही तसेच संगीतातले दर्दी हवे होते. नाटकांच्या आम्हा प्रेक्षकांचे तिथे काही काम नव्हते. चक्रतानेवर टाळ्या हाणण्यापलीकडे आम्हांला शास्त्रातले कळते काय?

O

आमच्याकडे येणाऱ्या कवितांची संख्या भरपूर आहे. त्यामुळे त्यासंबंधीचा पत्रव्यवहार ज्या वेगाने हवा तसा होऊ शकत नाही. त्यातून डिसेंबर १९६८ पर्यंतच्या कवितांची निवड पूर्ण झाली असल्याने या पुढील कवितांची दखल घेणे, किंवा त्यासंबंधीचा पत्रव्यवहार करणे जवळ जवळ अशक्यच आहे. तसेच 'माणूस'कडे पाठवलेल्या लेखासोबत पुरेसे टपाल हशील जोडावे.

—संपादक

**संध्याकाळची वेळ !**
**हावरा प्लॅटफॉर्म !**
**तुफान गर्दी !**
**गर्दीतील ती काळी-बुटकी**
**व्यक्ती कोण ?**
**तिचे नाव ? पत्ता ?**
**ती जिवंत आहे का ?**
**सारेच काही गूढ.**



४ डिसेंबर १९३३ ! अमरेंद्र चंद्र पांडे या नावाची एक व्यक्ती या दिवशी कलकत्याच्या एका हॉस्पिटलमध्ये प्लेगने तडकाफडकी मृत्यू पावली. म्हणजे त्याचा मृत्यू काखेतल्या प्लेगच्या गाठीमुळे झाला, असे हॉस्पिटलच्या डॉक्टर्सनी निदान केले.

सर्वसाधारणपणे प्लेगने किंवा तत्सम संसर्गजन्य रोगाने मरणारांच्या मृत्यूसंबंधात पोलीसखात्याकडून खास चौकशी अशी केली जात नाही. तथापि, अमरेंद्र चंद्र पांडेच्या आकस्मिकरीत्या झालेल्या मृत्यूसंबंधात काही एक प्रकारचे गूढतेचे नि संशयाचे वलय निर्माण झाल्याने त्याच्या मृत्यूची खास चौकशी करण्याची आवश्यकता निर्माण झाली. आणि या चौकशीच्या निष्कर्षानुसार गुन्हेगारीच्या अतर्क्य विश्वात चित्तथरारक नि

\- - - - - - -

**चित्तरंजन घोटीकर**

\- - - - - - -

अति भयानक अशा कथानकाच्या उपपत्तीची बीजे शोधून काढण्यात आली. अमानुष अशा घटनांचे नि मानवी कृतीचे धागेदोरे अमरेंद्राच्या या अकल्पित मृत्यूच्या बुडाशी विणले गेले असल्याचे सिद्ध झाले.

दोन सावत्र भावांपैकी अमरेंद्र चंद्र पांडे हा धाकटा भाऊ ! बंगालमधील ' पाकूर संस्थान 'च्या अफाट इस्टेटीचा एक वारसदार ! १९२९ मध्ये ' पाकूर 'चा संस्थानाधिपती निधन पावल्यावर या गडगंज इस्टेटीची सामायिक मालकी, वारसाहक्कानुसार, अमरेंद्र नि त्याचा थोरला भाऊ विनयेंद्र चंद्र पांडे यांच्याकडे चालत आली. विनयेंद्र या वेळी २७ वर्षांचा होता. अमरेंद्र १६ वर्षांचा होता; कोवळा पोर होता. ' पाकूर 'च्या धनदौलतीबरोबरच या दोघा भावांकडे त्यांच्या मावशीच्या–देवगडच्या राणी सुरजावती देवीच्या–इस्टेटीची सामायिक वारसदारीही कायद्यानुसार आली होती; हिंदू कायद्याच्या विशिष्ट तत्त्वानुसार ते त्यांच्या मावशीच्या देवगडच्या दौलतीचेही भागीदार होते.

## अमरेंद्राला प्लेगचे इंजेक्शन कोणी दिले?

वडिलांच्या मृत्यूनंतर विनयेंद्र चंद्राने धनदौलतीच्या नि यौवनाच्या उन्मादात एकदम बेछूट नि स्वच्छंदी जीवन जगण्यास सुरुवात केली. वडिलांच्या मृत्यूनंतर एका हिंदू एकत्र कुटुंबातील तो कर्ता पुरुष झाला होता. तथापि, हाती आलेल्या प्रचंड धनदौलतीची वारेमाप उधळपट्टी करण्यास त्याने सुरुवात केली. संस्थानांचे राजकुमार नाही तरी दुसरे काय करतात ! त्यातच ज्वानीच्या ज्वराने विनयेंद्राची साथ-संगत केली होती. आपल्या वाटयास आलेल्या अफाट संपत्तीचा व्यवस्थित सांभाळ करण्याऐवजी बालिकाबाला नावाच्या एका रूपसुंदरी नर्तिकेच्या तो नादी लागला. त्याच्या या स्वैराचारी वर्तणुकीने नि उधळपट्टीमुळे इतर कुटुंबियांना नि खुद्द राणी सुरजावती देवीलाही चिंता निर्माण झाली. त्याचबरोबर त्यांचा संतापही अनावर झाला. खुद्द अमरेंद्र नि विनयेंद्र या भावांत सख्य नव्हते. आपल्या धाकटया भावाच्या शिक्षणाची नि चरितार्थाची विनयेंद्राने चालविलेली आबाळ हीच गोष्ट दोघा भावांमधील कुरबुरीचे प्रमुख कारण होते.

१९३१ मध्ये अमरेंद्र कायद्याने सज्ञान झाला. त्याच्या वयाला १८ वर्षे पूर्ण झाली. त्याला आपल्या वारसाहक्काची चांगलीच जाणीव झाली. इस्टेटीतला आपला वाटा नि हक्क प्रस्थापित करण्याकरिता त्यान त्या दिशेने निश्चित पावले टाकण्यासही सुरुवात केली. आणि दोघा भावांत असूयेची नि सत्तावाटपाची भिंत उभी

राहिली. १२ मे १९३२ रोजी अमरेंद्राने आपल्या वाटयास आलेल्या धनदौलतीच्या मालकीचे एक अधिकारपत्र तयार करून, विनयेंद्राच्या हुकमतीखाली कधीही न दबल्या जाणाऱ्या आपल्या खास विश्वासातल्या व्यक्तींना त्याने ते बहाल केले. आता मात्र दोन भावांमधल्या सत्तालालसेच्या नि धनलोभाच्या नाटकाची नांदीच सुरू झाली होती. अत्यंत चाणाक्षपणाने नि अक्कलहुशारीने, १९३२ च्या नोव्हेंबरपासूनच, अमरेंद्राने आपल्या हक्काच्या जपणुकीच्या दृष्टीने कायदेशीर सल्ला घेण्यासही सुरुवात केली.

विनयेंद्राच्याही स्वैराचारात खंड पडला नव्हता. आपल्या वागणुकीने त्याने आपल्या भोवती एक प्रकारचे संशयाचे पटल निर्माण केले होते. संशयाचे एक जाळेच त्याच्या भोवती हळूहळू विणले जात होते. अमरेंद्राने तयार केलेले त्याच्या वाटयाच्या इस्टेटीचे 'पॉवर ऑफ अटर्नें' रद्दबातल करण्याचे दृष्टीने विनयेंद्राने त्याचे जरी मन वळविले तरी विनयेंद्राच्या वागण्यात सरळपणा नसल्याचा दाट संशय निर्माण होण्यासारख्या घटना घडत गेल्या. आपले ईप्सित साध्य करण्याकरिता लागणारा आस्थेवाईकपणा त्याच्याजवळ बिलकूल नाही, असाच संशय निर्माण होणाऱ्या अनेक गोष्टी त्याच्या हातून घडत गेल्या. १९३२ च्या ऑक्टोबरमध्ये बंगालमध्ये दुर्गापूजेचा उत्सव सुरू झाला होता नि त्या वेळी दोघेही भाऊ आपल्या मावशीच्या देवगडच्या घरी होते. एक दिवस संध्याकाळी सहज फेरफटका मारून दोघे भाऊ घरी परत आले नि चक्कर येऊन एकाएकी अमरेंद्र आजारी पडला. डॉ. सुरेंद्रनाथ मुकर्जींना ताबडतोब बोलविण्यात आले. त्यांनी अमरेंद्राला धनुर्वात होण्याचे निदान केले. मोठया चिंतेचे वातावरण निर्माण झाले. धनुर्वात! होय! अमरेंद्राला धनुर्वात होण्याची शक्यता डॉ. मुकर्जींनी बोलून दाखविली. एकाएकी असे काय घडले? डॉ. मुकर्जींनी अमरेंद्राला त्वरित धनुर्वात-विरोधक इंजेक्शन दिले. तथापि, काळजी वाटणाऱ्या अशा परिस्थितीत, अमरेंद्राच्या या आजारपणात, विनयेंद्र भावाकरिता काय करीत होता? तो मुळी होताच कुठे तिथे? आपल्या एका कंपौंडर मित्राबरोबर तो एकदम अदृश्य झाला होता. तो पाकूर येथे गेला असावा या समजुतीवर त्याला तार करण्यात आली नि "आपल्या नेहमीच्या 'कुटुंबाच्या डॉक्टर 'ना घेऊन ताबडतोब यावे" असे त्याला तारेने कळविण्यात आले. तारेप्रमाणे झटपट तरतूद करण्याऐवजी विनयेंद्र कलकत्त्यास गेला नि तिथून डॉ. तारानाथ नावाच्या डॉक्टरना घेऊन आला.

या डॉक्टर तारानाथना वाचकांनी विसरू नये. पुढे घडणाऱ्या अमानुष घटनात गोवली गेलेली डॉ. तारानाथ ही एक महत्त्वाची वल्ली होती, एवढेच तूर्त ध्यानात ठेवावे. या डॉ. तारानाथनी येऊन काय केले? तर डॉ. मुकर्जींनी सुरू केलेली धनुर्वात–विरोधक उपाययोजना त्वरित स्थगित केली नि मॉर्फियाचा सल्ला दिला. वरकरणी पाहणारांना डॉ. तारानाथनी सुचविलेल्या उपाययोजनेत तत्त्वतः तशी

चूक दिसली नसती. किंबहुना, अमरेंद्राच्या त्या विशिष्ट व्याधीवर मॉर्फियाच कदाचित् अधिक उपयुक्त ठरण्याचीही शक्यता होती. तथापि, मॉर्फिया सुचविण्यांत डॉ. तारानाथचा सरळ हेतू नसावा नि त्यांत काहीतरी चुकत असावे, निदान त्यांच्यामनात काहीतरी काळेबेरे असावे, असा चाणाक्ष नि जागरूक असलेल्या सुरजावती देवीला तेव्हाच वास आला. मॉर्फियाचा उपचार बरोबर नसावा अशी एक स्पष्ट शंका तिच्या मनात डोकावली. संशयाची पाल तिच्या मनात चुकचुकली.

या दीर्घ आजारपणात अमरेंद्राची प्रकृती पार ढासळली. त्याच्या हृदयास अशक्तपणा आला. १९३३ च्या एप्रिलपर्यंत त्याची परिस्थिती, सुधारण्याऐवजी खालावत चालल्याची स्पष्ट चिन्हे दिसत होती. उतार पडत नव्हता; आराम पडण्याचे तर दूरच राहो !

## ' पूर्णा थिएटर '

अमरेंद्राच्या या आजारपणात विनयेंद्र स्वस्थ बसला नव्हता. त्याच्या विलक्षण संशयास्पद उलाढाली चालूच होत्या. पांडे कुटुंबाच्या रोकड रकमा अलाहाबाद बँक नि इतरही अन्य बँकांत होत्या. विनयेंद्राने या रकमा भराभर काढण्यास सुरवात केली. कोर्टाकडून त्याने वारसाहक्काचे सर्टिफिकेट मिळविले आणि त्याच्या जोरावर पांडे कुटुंबाने दिलेली कर्जे तो भराभर कायदेशीर रीत्या वसूल करू लागला. बँकेमधून त्याने तेरा हजार रुपये काढले. १९३२ च्या ऑक्टोबरमध्ये दोन भावांच्यांत झालेल्या समझोत्यानुसार दोघांची सामायिक रक्कम रुपये सतरा हजार बँकेंत ठेवण्यांत आली होती. ही मोठी रक्कमही काढण्याचे विनयेंद्राने भगीरथ प्रयत्न चालविले. मृत्यूच्या दारी पडलेल्या अमरेंद्राच्या कानावर या गोष्टी येताच त्याने, तशा विकलांग अवस्थेतही, बँकेकडे, १७–११–१९३२ रोजी, ही रक्कम विनयेंद्रास काढू देण्यास आपला लेखी विरोध नोंदविला. त्यानुसार ही रक्कम विनयेंद्रास देण्याचे बँकेने त्वरित स्थगित केले. दोघा भावांत आधीच निर्माण झालेली वितुष्टाची भिंत या कृतीमुळे आणखी घट्ट झाली. त्यांच्यांतले संबंध अधिकच ताणले गेले. विनयेंद्र डिवचला गेला. त्यांच्यांतील बंधुत्वाचे तारू वैमनस्याच्या खडकावर आपटून फुटण्याच्या अवस्थेपर्यंत गेले. शेवटी कुटुंबाच्या संपूर्ण धनदौलतीची रीतसर नि कायदेशीर रीत्या विभागणी करण्यात यावी, असे दोघांनी परस्पर विचाराने ठरविले. हे वाटपपत्र ' पाकूर ' येथे कायम करण्यात यावे, असेही दोघांनी ठरविले.

वाचक हो ! आता आपण इथून थोडे मागे जाऊ या !

कलकत्त्याच्या वास्तव्यात, एक दिवस संध्याकाळी, अमरेंद्र आपल्या ज्योतीमयी नावाच्या मैत्रिणीबरोबर नि तिच्या काही मित्रांबरोबर ' पूर्णा थिएटर 'मध्ये सिनेमाला गेला. योगायोग असा की, त्याच वेळी, त्याच थिएटरमध्ये, त्याच शोला, विनयेंद्रही आला होता. विनयेंद्राबरोबर त्या वेळी त्याचा एक ' मित्रही ' होता. हा मित्र ' किंचित बुटका, काळयासार वर्णाचा नि खादीधारी ' होता. वस्तुतः बंगाल-

मधले तीनचतुर्थांश लोक अशाच घाटाचे, वर्णाचे नि ह्याच खादीच्या पेहेरावात असतात. तथापि, विनयेंद्राचा अशाच वर्णनाचा मित्र त्याच्याबरोबर सिनेमाला त्याच वेळी आला होता ही गोष्ट खरी! 'आपण त्याला पुन्हा पाहिल्यास सहज ओळखू शकू,' असे आव्हानपूर्वक सांगणारी मंडळीही होती. विनयेंद्राचा हा 'बुटका, काळा नि खादीधारी' मित्र कोण होता? त्याचे नाव काय होते? त्याचे विनयेंद्रा-बरोबर त्याच वेळी, त्याच बोलपटाला येण्याचे प्रयोजन काय होते? का विनयेंद्रांच्या सूचनेवरूनच तो त्याच्याबरोबर आला होता? बघू या!

१९३३ च्या २६ नोव्हेंबर रोजी आपल्या भाच्यास–अमरेंद्रास–बरोबर घेऊन राणी सुरजावती देवीने कलकत्ता सोडण्याचे ठरविले. ते निघण्याच्या आदल्या दिवशीच संध्याकाळी विनयेंद्रास याचा सुगावा लागला. "मी तुम्हांस पोहोचविण्यास स्टेशनवर येईन" असा निरोप विनयेंद्राने मावशीला पाठविला. भावा-भावांमधले बिथरलेले संबंध विचारात घेता विनयेंद्राच्या या निरोपाने सुरजावती देवीला क्षणभर परमावधीच्या आश्चर्याचा धक्काच बसला. तथापि, झाले गेले विसरून सलोखा पुन्हा प्रस्थापित करण्याचे हेतूने विनयेंद्राने कदाचित् हे पाऊल टाकले असावे असे तिने आपले समाधान करून घेतले. तिला वाटले, कितीही नि काहीही झाले तरी विनयेंद्र नि अमरेंद्र भाऊच आहेत; एकाच रक्ताचे आहेत; विनयेंद्र उधळ्या नि बाहेरख्याली असला तरी तो दुष्ट नाही; खलप्रवृत्तीचा नाही; निर्दय नाही. शिवाय त्याचे आपल्याशी तरी वाकडे नाही; फार प्रेम नसले तरी दुष्टावाही नाही. अमरेंद्राबरोबरच तोही आपल्या देवगडच्या इस्टेटीचा एक कायदेशीर वारसदार नाही का?

## तो धक्का

मावशीस उपरिनिर्दिष्ट निरोप पाठवून विनयेंद्र हावऱ्यास गेला. याही वेळी त्याच्याबरोबर त्याचा वरील खास मित्रही होताच! 'बुटका, काळयाशार वर्णाचा नि खादीधारी!' रात्रीच्या मुक्कामानंतर दुसऱ्या दिवशी, मावशी नि अमरेंद्र कलकत्त्याहून निघण्याच्या थोडा वेळ अगोदर, विनयेंद्र त्याच्या या 'खास मित्रासह' हावरा स्टेशनवर येऊन पोचला होता, नि ते दोघेही मावशीची आणि विनयेंद्राची वाटच पाहत होते. थोड्याच वेळात सुरजावतीदेवी, अमरेंद्र, त्याची वनमाला नावाची एक बहीण आणि सुरजावतीदेवीची पुतणी अनिमा इतकी मंडळी दाखल झाली. अमरेंद्र सर्वांत पुढे होता. विनयेंद्र त्याच्या मित्रासह या सर्वांच्या स्वागतालाच जणू उभा होता. अमरेंद्र त्याच्या मंडळीबरोबर फलाटावरही येऊन दाखल झाला.

हावरा स्टेशनवर त्या वेळी तुडुंब गर्दी झाली होती. त्या गर्दीतच विनयेंद्राची नि अमरेंद्राची गाठभेट झाली. या प्रचंड जनसमुदायातून वाट काढीत पुढे जात असताना अमरेंद्रास कुणा एका बुटक्या व्यक्तीचा धक्का लागला. निदान तसा धक्का

लागल्याचा अमरेंद्रास भास तरी झाला. त्याचबरोबर आपल्या उजव्या दंडास काहीतरी खरचटल्याचीही एक संवेदना त्यास झाली. तथापि, जोराचा धक्का लागल्यावर काही वेळानेच आपल्या दंडास खरचटल्याची जाणीव त्यास झाली. या सर्व प्रकारात त्यास धक्का मारणारी ती बुटकी, काळी नि खादीधारी व्यक्ती त्या तुफान गर्दीच्या कोलाहलात केव्हाच गडप झाली; अदृश्य झाली; तिच्यासारख्याच बुटक्या नि काळ्या असलेल्या असंख्य माणसांत दिसेनाशी झाली. त्याच्यासारखीच अनेक बुटकी माणसे त्या वेळी फलाटावर होती.

"मला कोणी तरी धक्का दिलाय नि दंडावर सुई टोचल्यासारखेही वाटत आहे," असे मनातल्या मनात म्हणत अमरेंद्राने, त्या गर्दीतच, हाताची उजवी बाही वरपर्यंत गुंडाळली. पाहतो तो खरेच सुईसारखी अणकुचीदार वस्तू टोचल्याची नि रक्ताचे थेंबही ठिबकल्याची खूण त्याच्या दंडावर होती.

तथापि, त्याने या घटनेकडे दुर्लक्षच केले. ही अशी कोणती मोठी गंभीर घटना होती की त्याने तिची विशेष दखल घ्यावी ? फलाटावर अलोट गर्दी होती नि गर्दीत धक्केबुक्के लागणारच की ! कदाचित् कोणाच्या तरी कोटाची अथवा कुडत्याची एखादी पिनही लागली असेल? कदाचित् एखादा किडाही चावला असण्याची शक्यता होती. अमरेंद्राने या 'क्षुल्लक' घटनेकडे दुर्लक्ष केले. नि तो गर्दीतून वाट काढीत पुढे चालू लागला. "अगदीच मामुली गोष्ट आहे ही !" अशी विनयेंद्राने त्यावर मल्लीनाथीही केली.

तथापि, दोघा भावांमधले संबंध माहीत असणारांना मात्र, आणि सुरजावतीदेवीलाही, अमरेंद्राच्या हालचालीमागे, त्याला लागलेल्या धक्क्यामागे नि त्याच्या दंडावरच्या खरचटण्यामागे काहीतरी काळेबेरे असल्याचा वास तेव्हाच आला. त्यांनी अमरेंद्राला कलकत्त्यासच राहण्याचा सल्ला दिला. तथापि, विनयेंद्राला मात्र या अशा मामुली घटनेमध्ये काळजी करण्यासारखे नि जाण्याचा बेत स्थगित करण्यासारखे काहीच कारण दिसेना. तथापि, सुरजावतीदेवीने जाण्याचेच ठरविले. अमरेंद्राने कलकत्त्यासच राहण्याची कल्पना तिला न रुचल्याने त्याच्यासह ही सर्व मंडळी ठरलेल्या गाडीने पाकूरला निघून गेली.

२९ नोव्हेंबर १९३३ रोजी अमरेंद्र कलकत्त्यास परत आला. का ? अमरेंद्राच्या कमलाप्रसाद पांडे नावाच्या एका खास स्नेह्याने त्यास तातडीचे पत्र पाठवून कलकत्त्यास बोलावून घेतले. त्या दिवशी हावरा स्टेशनवर असलेल्या तुफान गर्दीत हा कमलाप्रसाद पांडेही होता नि विनयेंद्राच्या त्या वेळी झालेल्या वर्तणुकीने त्याच्या मनात संशयाने घर केले होते. घडलेल्या एकंदर प्रकाराच्या बुडाशी सरळपणा नसून 'त्या धक्क्यामागे नि खरचटण्यामागे' काहीतरी खलनायकाची नांदीच असली पाहिजे अशी या कमलाप्रसादची बालंबाल खात्री झाली होती. म्हणूनच त्याने अमरेंद्राला पाकूरहून परत बोलावून घेतले.

अमरेंद्र २९ नोव्हेंबरला कलकत्त्यास परत आल्यावर या कमलाप्रसादने डॉ. नलिनिरंजन सेनगुप्ता नावाच्या एका विश्वासातील निष्णात डॉक्टरकरवी अमरेंद्राची कसून वैद्यकीय तपासणी करविली. या तपासणीनंतर ही खरचटल्याची खूण साधीसुधी नसून, काहीतरी विषारी द्रव अमरेंद्राच्या शरीरात टोचले गेल्याचे त्यांच्या तेव्हाच लक्षात आले. डॉ. सेनगुप्तांनी सल्ला दिल्यावरून अमरेंद्राने डॉ. संतोषकुमार गुप्ता नावाच्या रक्त तज्ज्ञाकरवी आपल्या रक्ताची तपासणी करून घेतली.

या रक्ततपासणीनंतर चारच दिवसांनी, म्हणजे ४ डिसेंबर १९३३ रोजी, अमरेंद्राचे हॉस्पिटलात तडकाफडकी निधन झाले.

या प्रकाराने स्तिमित झालेल्या डॉ. संतोषकुमार गुप्तांनी त्यानंतर पांढरे उंदीर व तत्सम प्राण्यावर रक्ताच्या पृथक्करणाचे विविध प्रयोग करून असे सिद्ध केले की, अमरेंद्राच्या रक्तात प्लेगचे जंतू फार मोठ्या प्रमाणात मिसळले गेले होते. त्यानुसार त्यांनी 'सार्वजनिक आरोग्य खात्याच्या' अधिकाऱ्याकडे आपल्या प्रयोगाची नि अमरेंद्राच्या मृत्यूस झालेल्या निश्चित कारणांची माहिती दिली.

४ डिसेंबर १९३३ ला झालेल्या अमरेंद्राच्या मृत्यूची–संशयास्पद मृत्यूची–पोलिसांत वर्दी दिली गेली नव्हती. कुठपर्यंत ? तर २२ जानेवारी १९३४ पर्यंत. मृत्यूनंतरच्या मध्यंतरीच्या काळात, भाऊबंदकीमुळे पाकूरच्या धनदौलतीची विल्हेवाट लागण्यापेक्षा, ही सर्व मालमत्ता नि तिचे व्यवहार शासनाकडेच सुपूर्त करावे की काय याचा विचार कुटुंबियांनी चालविला. अनेक गोष्टींबरोबर बंगालमधल्या एका धनाढ्य नि खानदानी कुटुंबाची प्रतिष्ठा पणास लागणार होती.

सर्व गोष्टींचा साकल्याने विचार करून कमलाप्रसाद पांडे याने कलकत्त्याच्या डेप्युटी पोलीस कमिशनरकडे एक लेखी अर्ज करून आपल्या मित्राच्या संशयास्पद मृत्यूसंबंधात कसून चौकशी त्वरित केली जावी अशी मागणी केली. ही विनंती मान्य होऊन या चौकशीच्या कामी, शरद्चंद्र मित्र नावाच्या एका गुप्त हेर खात्यातील खास पोलीस अधिकाऱ्याची नियुक्तीही झाली. ही चौकशी मुंबई व कलकत्ता येथे अत्यंत त्वरेने, काळजीपूर्वक आणि फार गुप्तपणे उरकण्यात आली नि त्यातून विस्मयजनक आणि अतिचित्तथरारक अशा घटनांच्या कटाचा सुगावा लागला.

१२ मे १९३२ रोजी–म्हणजे ज्या दिवशी अमरेंद्राने कुटुंबातील आपल्या मालकीच्या वाटपाचे अधिकारपत्र आपल्या विश्वासातील व्यक्तींच्या नावे तयार केले होते त्याच दिवशी–डॉ. तारानाथ या विनयेंद्राच्या खास विश्वासातील डॉक्टरने मुंबईच्या हाफकिन इन्स्टिट्यूटला तार करून आपल्या प्रयोगशाळेत प्रयोग करण्यासाठी प्लेगची जहरी लस पाठविण्याबद्दल लिहिले होते. या तारेत डॉ. तारानाथनी आपल्या नावापुढे " डी. टी. एम्. " (डिप्लोमा इन् ट्रॉपिकल् मेडिसिन्) अशी अक्षरे असलेली पदवी जोडली होती. तथापि, ही पदवी धारण करण्याचा डॉ. तारानाथना

मुळीच अधिकार नव्हता. त्यांनी ती मिळविलेली नव्हती. तथापि, ही पदवी लावूनही, हाफकिन इन्स्टिटयूटने त्यांना ही लस देण्याचे नाकारले, आणि बंगालच्या सर्जन-जनरलच्या अनुमतीशिवाय अशी लस देता येत नाही, असेही कळविले.

यानंतर डॉ. तारानाथ कलकत्त्याच्या डॉ. उकीलना भेटले आणि 'आपण प्लेगवर संशोधन करून उपाय शोधून काढला आहे,' अशी बतावणी करून, त्यांनी डॉ. उकील यांच्या प्रयोगशाळत प्रयोग करण्याची अनुमती मिळविली. डॉ. उकील यांनी डॉ. तारानाथांच्या शब्दांवर विश्वास ठेवला नि त्यांना आपल्या प्रयोगशाळेत काम करू देण्यास अनुमती दिली. तथापि, आपल्या निरीक्षणाखालीच हे प्रयोग करता येतील अशी अटही डॉ. उकील यांनी घातली. डॉ. उकीलांच्या प्रयोगशाळेतील प्लेगाची लस हाफकिनमधूनच मिळवलेली होती. या लसीवर प्रयोग करण्यांत डॉ. तारानाथना अपयश आल्यावर त्यांनी अधिक लस मागविण्याकरिता डॉ. उकील यांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. तथापि, डॉ. उकीलांनी ते नाकारले.

१९३३ च्या सुरुवातीला डॉ. तारानाथनी डॉ. उकीलांच्याकडून एक ओळखपत्र मिळविले. हे ओळखपत्र डॉ. उकीलांनी हाफकिनच्या प्रमुख अधिकाऱ्यास देण्याकरिता डॉ. तारानाथांजवळ दिले होते. या ओळखपत्रात डॉ. तारानाथांची 'एक जंतु–शास्त्रज्ञ' अशी ओळख करून देण्यात आली होती. त्याखेरीज, डॉ. तारानाथांनी प्लेगवर संशोधन करून शोधून काढलेल्या उपाययोजनेसंबंधी आणि तिच्या प्लेग-निवारक उपयुक्ततेवर त्यांना अधिक संशोधन करण्याकरिता आवश्यक त्या सोयी उपलब्ध करून द्याव्यात, अशीही विनंती डॉ. उकीलांनी या पत्रात हाफकिनला केली होती. तसेच, या संशोधनाचा प्लेगसारख्या भयंकर व्याधीवर निश्चितपणे उपयोग होईल असाही विश्वास डॉ. उकील यांनी व्यक्त केला होता.

तथापि, डॉ. उकीलांचे हे पत्र–ओळखपत्र–बरोबर घेऊन प्रत्यक्षात मुंबईस आला तो मात्र विनयेंद्रच ! डॉ. तारानाथ नव्हे ! विनयेंद्र मुंबईत 'ओरिएंट हॉटेलांत' उतरला व त्याने 'टागोर कॅसल लेन' असा आपला कलकत्त्याचा पत्ता हॉटेलच्या रजिस्टरमध्ये नोंदविला. वस्तुतः विनयेंद्र कलकत्त्यात या पत्त्यावर मुळीच राहत नव्हता. कलकत्त्याचा हा पत्ता होता डॉ. तारानाथ यांचा ! दुसऱ्या दिवशी विनयेंद्र डॉ. नायडूंना भेटला नि त्यांनी या डॉक्टर नायडूंना डॉ. उकीलांचे ओळखपत्र दाखविले. डॉ. तारानाथ हे आपले स्नेही असून त्यांनी आपल्यास मुद्दामच अगोदर पाठवून दिले असून, त्यांच्या ( डॉ. नायडू ) मार्फत हाफकिनमधे काही सोयी उपलब्ध होऊ शकतील किंवा नाही याबद्दल चौकशी करण्यास सांगितले आहे असेही विनयेंद्राने डॉ. नायडूंना सांगितले. त्यावर "आपल्या मित्रानी यासंबंधात हाफकिनच्या प्रमुख अधिकाऱ्यांना प्रथम पत्र पाठवून त्यांची अनुमती घेतली पाहिजे" असे डॉ. नायडूंनी विनयेंद्राला खणखणीतपणे बजावले. या मखलाशीत अपयश

[पृष्ठ ५८ वर]

# चारित्र्य

त्या दिवशी ऑफिसात सगळयांना एक सूचना मिळाली –'... यापुढे जो क्लार्क ऑफिसात दहानंतर येईल, त्याने ऑफिसरच्या खोलीत जाऊन त्यांच्यासमोरच हजेरी-पुस्तकावर सही करावी...'

सगळयांच्यावर बाँबगोळा पडल्यासारखं झालं. साऱ्यांची त्रेधातिरपीट उडाली. प्रत्येकापुढे प्रश्न उभा राहिला. साऱ्यांचे चेहरे चिंताग्रस्त दिसू लागले. प्रत्येकाने मार्ग शोधण्याचा प्रयत्न केला पण व्यर्थ.

जे नेहमी उशीरा येत असत त्यांच्या पोटात भीतीचा गोळा उभा राहिला. वेळेवर येणारेही अस्वस्थ झाले– 'समजा, एखाद्यावेळी उशीर झालाच, तर.... ?'

माझ्यासारखे सिटी बसवर अवलंबून राहणारे-देखील भयंकर घाबरले.

सिटी बसवर कोणाचाही विश्वास नव्हता. एखाद्या वेळी बस वेळेवर आलीच तरी ऑफिसात पोहोचू शकण्याबाबत शंकाच होती. वेळेवर पोहोचल्यावर सगळयांना हायसं वाटायचं.

आपापल्या परीने प्रत्येक जण जरूर विचार करीत होता, मार्ग शोधीत होता. पण सगळयांनी मिळून तोडगा शोधण्याची कल्पना कुणाच्याही डोक्यात आली नाही. काही दिवस सर्वांचा गोंधळ उडाला होता. पण मग मात्र शांतता पसरली. बहुतेक सर्व क्लार्क्स व ऑफिसर्स साहेबांच्या खोलीत जाऊन आले. साहेबांच्या शिव्या खाल्ल्या पण कोणी कोणा-जवळ काही बोलला नाही. साहजिकच होतं.

लेखक

**ईश्वर गुरमुखाणी**



एके दिवशी मलादेखील उशीर झालाच. अपराध्यासारखा जाऊन साहेबांच्या समोर उभा राहिलो. मला पाहूनच साहेब भडकले. मी तुटपुंज्या भाषेत खूप युक्तिवाद केला – ' सर, यात माझा काही दोष नाही. रस्त्यात बस......'

' नादुरुस्त झाली ! असंच ना ? ' –साहेबांनी फाइलीत पाहत मध्येच विचारले.

' होय.. .' –मी भीत भीत नम्र आवाजात अपराधाचं समर्थन केलं– ' खरंच साहेब, बस नादुरुस्त झाल्यामुळे...... '

' मि. अशोक, तुम्ही तरी दुरुस्त होता ना ? '

' पण सर...–'

ही थाप आता खूप जुनी झाली आहे. आता काही नवीन शोधून काढा. काय ? '– ते उपहासाने म्हणाले.

' सर.... ' – मी आवंढा गिळला.

' आज ठीक आहे. पण यापुढे मी काही ऐकणार नाही. समजलात ? तुम्ही जाऊ शकता.'

* *

कालचं साहेबांचं झिडकारणं अजून विसरलो

अनुवादक

**लछमन हर्दवाणी**

नव्हतो तो दुसऱ्या दिवशी पुन्हा उशीर ! मनात खूप आलं की आज रजाच घेऊन टाकावी. पण राहवलं नाही. पैसे खर्चून ऑफिसपाशी आलोय्. कशाला रजा ? त्याच विचारात असताना जाऊन साहेबांच्या समोर उभा राहिलो.

'या ! आजदेखील पुन्हा बस नादुरुस्त झाली नाही काय ? –' त्यांनी माझ्याकडे किलकिलत्या नजरेने पाहत विचारले.

'येस सर.... सर, आपला विश्वास बसणार नाही; साहेब. पण खरोखरच आजदेखील......'– मी चाचरत म्हणालो.

'माझ्या विश्वासाचं काय ? आधी तुमचा स्वतःवर तरी विश्वास आहे का पहा ! '– चष्मा टेबलावर ठेवीत ते म्हणाले.

'माफ करा सर, पण आपण अप्रत्यक्षरीत्या माझ्या चरित्र्यावर शितोडे उडवीत आहात. हे उचित......'

'व्हॉट ? क्लार्क आणि चारित्र्य ? '–साहेब उर्मटपणे हसले.

'सर, आपण हे योग्य बोलत नाही. '– मला थोडी चीड आलेली होती.

'अस्सं ! म्हणजे आता बोलावं कसं याचा धडाही तुमच्याकडून शिकावा लागेल मला ? तुमच्यासारख्या क्लार्ककडून ? '– त्यांनी शेवटच्या वाक्यातील प्रत्येक शब्दावर जोर देत टेबलावर मूठ आपटली.

'प्लीज सर, आपण आपले शब्द मागे घ्या, नाही तर......'–अपमानामुळे माझं मस्तक तडतडलं.

'नाही तर काय ? –' त्यांचा आवाज सबंध खोलीत घुमला.

'नाही तर......परिणाम वाईट होईल ..'– मी थोडा वेळ गप्प राहून म्हणालो.

'यू स्टुपिड ! गेट आऊट ..'– साहेब उसळून म्हणाले. ते संतापाने थरथरत होते.

मी तरातरा निघून गेलो.

* *

त्या घटनेला अजून एक आठवडादेखील झाला नव्हता. मी बस-स्टॉपवर बसची वाट पाहत उभा होतो. ऑफिसची वेळ केव्हाच होऊन गेली होती. पण बसचा अजून पत्ता नव्हता. ऑफिसात जावंसं वाटेना म्हणून एका मित्राला रजेचा अर्ज देऊन घरी निघून गेलो.

दुसऱ्या दिवशी वेळेवर ऑफिसात आलो. वातावरण तंग जाणवलं. प्रत्येक जण स्मित करीत होता. मला काही अर्थबोध होईना. शेवटी एका मित्राला विचारलं–

'काय रे, आज अशी भयाण शांतता ? काय झालं ? '

वस्ताद, तुझ्या अर्जाने भयंकर वादळ निर्माण करून टाकलंय् !'

—तो मिस्किलपणे हसला.

'म्हणजे ? '

'अरे, अर्जात काय लिहिलं आहेस, लक्षात आहे ?...'

मग तो माझ्या अर्जातील प्रत्येक शब्द रिपीट करीत म्हणाला –'......कारण की, बस दहापर्यंत आलेली नाही म्हणून ऑफिसात पोहोचणं अशक्य आहे. म्हणून आपल्या ऑफिसरच्या खोलीत गुन्हेगारासारखा उभा त्यांचे अनुचित आणि असह्य शब्द ऐकण्यापेक्षा रजा घेणंच योग्य आहे......ऐकलंस ? '

'पण त्यात खोटं काहीच नाही. सत्य तेच लिहिलंय्. '

'असेल. पण मन दुखविणारं सत्य आहे. '– माझा मित्र माझाच दोष दाखवीत म्हणाला.

'सत्य नेहमीच कटू असतं आणि कठोरसुद्धा. '– मी.

'ते खरं रे, पण तुझा अर्ज वाचून साहेब भडकलेत् ना ! तुला 'नमस्कार' सांगितलाय् ! '

'नमस्कार' चा अर्थ मला माहीत होता. मी ठामपण म्हणालो—

'मीदेखील तत्त्वाचा पक्का आहे यार. नोकरी गेली तरी चालेल, पण....'

* *

बोलवणं आलं. मी साहेबांच्या समोर उभा होतो.

'काल आला नाहीत, मि. अशोक –' ते उपरोधाने स्मित करीत म्हणाले.

'पण त्यासाठी अर्ज पाठविला होता, सर. '– मी सरळ म्हणालो.

'तो मिळाला, पण तुम्हांला ऑफिस म्हणजे काय म्युनिसिपालिटी वाटली काय ? जे मनात आलं ते लिहून टाकलं.'– त्यांच्या मस्तकात एकदम तिडीक उठली.

'माफ करा सर, मला काम करण्यासाठी पगार मिळतो. तुमच्या शिव्या ऐकण्यासाठी नव्हे. येतो मी. '

'पण मला हे सांगा, रजेसाठी का हेच कारण होतं ? दुसरी काही कारणं नव्हती ? '

'सॉरी सर, मी आधीच तुम्हांला सांगितलंय् की केवळ याच कारणास्तव मी येऊ शकलो नाही. न येण्याचं दुसरं काहीच कारण नव्हतं. '– मी खरं तेच म्हणालो.

'मि. अशोक, मला फालतू गोष्टी ऐकायच्या नाहीत. वेळ नाही मला. मला फक्त एवढंच तुम्हांला सांगायचं आहे की तुम्ही अर्ज परत घ्या. दुसरं कारण दाखवून नवीन अर्ज लिहून द्या......'–त्यांनी दम देऊन डाव साधण्याचा प्रयत्न केला.

'सॉरी सर, मला असं करता येणार नाही. '– मी आपल्या निर्णयावर कायम.

'व्हॉट ? करता येणार नाही ? म्हणजे ? '– ते रागावले व तणतणू लागले.

'साधा अर्थ आहे. जे योग्य होतं, सत्य होतं तेच अर्थात लिहिलंय्–'– मी क्रोध आवरीत म्हणालो.

'व्हाय डोंटच्यू अंडरस्टँड, यू फुल ? हे कायद्याच्या विरुद्ध आहे. आणि नियमभंग करणाऱ्याला नोकरीतून काढण्यात येतं. समजलं ? '– त्यांचा चेहरा थरथरू लागला.

मला धडा देण्यासाठी त्यांनी पुन्हा दम भरण्याचा व्यर्थ प्रयत्न केला.

'तुम्ही काहीही म्हणा, पण ही हकिगत आहे. त्यात मी बदल करू शकत नाही.'

'तुम्हांला तुमच्या नोकरीची काळजी नाही वाटत?'– त्यांनी आता सरळ प्रश्न केला.

'जरूर वाटते. पण शेवटी सत्याचा विजय होणार याचाही विश्वास वाटतो.'

'तुमचा युक्तिवाद ऐकून मला तुमची दया येईल, असं वाटतंय् तुम्हांला?

'मी ही तुमच्याकडून दयेची भीक मागतोय् असं वाटतंय् तुम्हाला? मी आजपर्यंत कुणाकडून दयेची भीक मागितली नाही; मागणार नाही. माझ्या विरुद्ध जे करायचं असेल–खुशाल करा, पण शेवटी तुम्हांला कळेल की क्लार्कलाही चारित्र्य नावाची एक वस्तू असते; त्याचीही काही तत्त्वं असतातच. आणि तत्त्वासाठी तो सर्व सहन करू शकतो. चारित्र्य फक्त ऑफिसरांची मिरासदारी नव्हे...'– मी आवेशात म्हणालो.

'यू आर फूल...मला जर तुमच्या कुटुंबाची कीव आली नसती तर......'– त्यांनी आपली दुर्बलता लपविण्याकरिता पुन्हा एक नवीन डाव साधण्याचा प्रयत्न केला.

'माफ करा; पण आपल्याला माझ्या कुटुंबावर मेहरनजर करण्याचं काहीच कारण नाही.'– मी डाव ओळखून उपरोधाने स्मित करीत म्हणालो.

सर्व उपाय करून शेवटी साहेब थकले. मग मात्र ते भयंकर हवालदिल झाले. माझ्याकडे पाहत राहिले. जराशानं वैतागून पुटपुटले–

'प्लीज मि. अशोक, अर्ज परत घेऊन दुसरं कारण दाखवा.'

'पण का?'– मी प्रकरणाला लांबविण्याचा प्रयत्न केला.

'तुम्हांला माहीत नाही. तो अर्ज रेकॉर्डवर असल्याने माझ्या चारित्र्यावर कायमचा डाग राहील.' ते काकुळतीला आले होते.

'ठीक आहे. तुम्ही म्हणताय् तसंच करतो.'– मी जणू काही त्यांच्यावर उपकारच करीत आहे अशा आवाजात म्हणालो. 'थँक्यू मि. अशोक.'

खोलीतून बाहेर पडणार तोच त्यांनी हाक मारली 'हे हजेरी-पुस्तक बाहेरच ठेवा. आता कुणालाही माझ्याकडे यायची जरूर नाही.'

# कोयना

काल
आज
उद्या

आकाशात धुळीचे लोट उडवत ट्रकचे ते भले मोठे धूड पाटणच्या परिसरात येऊन थडकलं. ट्रक विसावून आतील माणसं खाली उतरण्यापूर्वीच बाहेरच्या भूकंपग्रस्तांनी ट्रकला वेढा दिला.

बाजूच्या कोपऱ्यात उभा राहून मी पाहत होतो. " मिलिन्द सेवा संस्था, मुंबई– भूकंपग्रस्तांना मदत " पाटीवरून डोळे फिरवून होईपर्यंत ट्रकभोवती जमलेल्या गर्दीला काहीशी शिस्त आली होती. मंडळी रांगेत उभी राहिली. स्वयंसेवकांचा ताफा आतून खाली उतरला आणि भूकंपग्रस्तांना साहाय्य देण्याचे कार्य सुरू झाले. एक रग, एक कंदील, एक दिवसाच्या शिध्याचे पुडके व चार रुपये रोख; रांगेतून शिस्तीने माणसे येत होती. पदरी पडलेले घेऊन बाजूला होत होती. हां हां म्हणता ट्रक रिकामा झाला. सत्कार्याचे पुण्य पदरी पडल्याचे समाधान स्वयंसेवकांच्या चेहऱ्यावर दिसत होते. सर्व ताफा गाडीत चढण्यापूर्वी हळूच एकाजवळ गेलो. चौकशी सुरू केली.

नाव सांगितलं माधव जोशी. मुंबईतील विद्यार्थिवर्गामधून हिंडून रोख रक्कम गोळा केली व चारशे कुटुंबांना पुरेल इतके सामानाचे सेटस् घेऊन मंडळी कोयनेकडे आल्याचे समजले.

– – – – –

शरद गोखले

– – – – –

सहज विचारले, 'बाबा, किती दिवस मदत गोळा केलीस?' उत्तर आले, 'कोयनेच्या पहिल्या धक्क्याची वार्ता आल्यापासून अहोरात्र खपतोय. मी आणि आमची अन्य पन्नास-पाऊणशे माणसे. आता मदत पोचती केल्यावर फार समाधान वाटते बघा.' असं काहीसं म्हणत स्टार्ट झालेल्या ट्रकमध्ये माधवने उडी टाकली.

भूकंपग्रस्तांचं, आणि त्यांना मदत करणारांचंही पहिलं दर्शन घडलं, ते या पद्धतीनं.

केवळ नमुना म्हणून पाहिलं इतकंच. खरी उत्सुकता होती खुद्द कोयनानगरामध्ये जाण्याची. पाच वर्षांखाली कोयनानगर पाहिलं, ते त्याच्या पूर्ण वैभवात आणि आज जात होतो ते त्याचे छिन्नविच्छिन्न अवशेष पाहायला. वृत्तपत्रांतील वृत्तांमुळे मनासमोर निर्माण झालेलं कोयनानगरचं चित्र, कल्पनेतही नको वाटणारं होतं, आणि तरीही मन ओरडत होतं– "चलो कोयनानगर."

स्वाभाविकपणेच बरोबरच्या सहकाऱ्यांना विनंती केली. आता मध्ये थांबणे नको. गाडीची वाटचाल वेगात सुरू होती आणि बाहेर दिसणारं भेसूर चित्र टिपण्याचा प्रयत्न नजर करीत होती. दोन-चार मैलांचा टप्पा ओलांडला की एखादी पाटी दिसे राममळा, आंबेघर. पाटीखाली लिहिलेले असे–संपूर्ण गाव भूकंपामुळे उध्वस्त–मदतकेंद्र चालू. पाटी वाचून जरा पुढे जावे, तो शेकडो माणसे, चांगले धडधाकट बाप्येसुद्धा रस्त्याच्या कडेला घोळक्याने उभे असलेले दिसत. पाटणापासून कोयनेला पोचेपर्यंत अनेक ठिकाणी हा प्रकार पाहिला. मोठ्या धक्क्यानंतर चांगल्या तीन आठवड्यांनी मी जात होतो, म्हणून असेल कदाचित् परंतु माणसांचे असे निर्जीव घोळके पाहण्यात माझ्या मनाला फारसं रुचलं नाही.

पाटण ते कोयना या रस्त्याचं स्वरूपही भेसूर झालेलं दिसलं. पुलांची पडझड, रस्त्याला भेगा, यामुळे वांझोळच्यापासून काही अंतरावर बाजूची झाडी मोकळी करून कामचलाऊ रस्ता मोकळा केलेला दिसला. कोयनेला पोचेपर्यंत अशा प्रकारचा रस्ता तीन-चार ठिकाणी आढळला.

आमचे वाहन थांबवून मी रस्त्याच्या कडेला असलेल्या तंबूवर पाटी वाचली, एस. टी. स्टॅंड–कोयनानगर. दोन-चार एस. टी. चे बंब बाजूला विसावत होते. तेथून पुढे पायी जाणंच शहाणपणाचं, असा विचार करून वाटचाल सुरू केली. कोयनानगर आणि पाटणच्या बाजूने येणारा रस्ता यांना जोडणारा पूल अखंड उभा होता; ओलांडून कोयनानगरच्या परिसरात प्रवेश केला. उद्ध्वस्त घरांसंबंधीचं नावीन्य आणि शोक ओसरला होता. ओढ होती माणसांना भेटण्याची, विनाशातून निर्मितीचे प्रयत्न करणारांची गाठ घेण्याची.

## जुलमाचा राम-राम

खुद्द कोयनानगर ही मुख्यत्वे करून सरकारी कर्मचाऱ्यांची वसाहत. अर्थात वसाहत म्हटल्यावर येणाऱ्या आनुषंगिक व्यवसायांची बाजारपेठ येथेही होतीच. पण आज

मनुष्यवस्ती जी थोडी फार आढळली ती केवळ कर्मचाऱ्यांची. इतरेजनांना मज्जाव होता, बंदोबस्ताची ही कामगिरी एस. आर. पी. चे पोलिस चोख पार पाडत होते. एकंदर बंदोबस्ताचे काम समाधानकारक वाटल्याने यांच्यापैकी काही मंडळींना भेटण्याचा निर्णय तेव्हाच घेऊन टाकला आणि सरकारी कर्मचाऱ्यांच्या वसाहतीकडे–अर्थात तंबूच्या–मार्गस्थ झालो. पहिले भेटले ते ज्युनिअर इंजिनियर ए. व्ही. डोंगरकर. थोडाफार परिचय झाल्यावर मुद्द्याकडे वळलो. खरं सांगायचं म्हणजे आजही इथे रहावं असं कर्मचाऱ्यांना वाटत नाही. इथली नोकरी म्हणजे आता पुष्कळांच्या बाबतीत जुलमाचा राम राम आहे. मी विचारले, 'व्यक्तिशः तुमच्या बाबतीतही असंच आहे का ?' उत्तर आले नाही. 'धरणाच्या सुरक्षिततेसंबंधी मला किंवा बहुसंख्य कर्मचाऱ्यांना किंचितही शंका वाटत नाही, आता अगदीच काही विपरीत झालं तर एक सोडा पण आम्हांला धास्ती वाटते या धक्क्यांची. जरा धक्के थांबले असं वाटतं ना वाटतं तो पुढील दणका येतो. त्यामुळं होतं काय, माणूस आपले स्वास्थ्य हरकून बसतो.' डोंगरकरांच्या समोर बसलेल्या इसमाकडे पाहिल्यावर त्याचा प्रत्यय येत होता. या तंबूतून बाहेर पडलो, रिकामा रस्ता तुडवत काहीशा विचित्र मनःस्थितीत विचार करत चाललो होतो. एका तंबूतून तावातावाने भांडण्याचा आवाज आला म्हणून तिकडे वळलो. कोयनानगरची व पर्यायाने स्वतःच्या भवितव्याची चर्चा चालू होती. जीवनमरणाच्या प्रश्नात रंगलेल्या मंडळींना माझे अस्तित्व प्रथम जाणवले नाही आणि जेव्हा जाणवले तेव्हा रंगत कमी होतीसे वाटले, म्हणून स्वतःची जुजबी ओळख करून दिली आणि त्यांना जास्तीत जास्त मोकळेपणे बोलते करण्याचा प्रयत्न केला.

कोयनानगर कर्मचाऱ्यांच्या संघटनेचे काही पदाधिकारी या मंडळींमध्ये होते. पंधरा-पंधरा वर्षे नोकरी केलेले. या नगरासंबंधी आत्मीयता असलेली ही मंडळी, शासनाचा गलथानपणा सांगताना जशी संतापत, तशीच भूकंपापूर्वी उपलब्ध होत असलेल्या अनेकविध सोईंचा न विसरता उल्लेख करीत.

मोठ्या भूकंपापूर्वी दोन महिने–म्हणजे तेरा सप्टेंबरला चांगला जोरदार दणका कोयनानगरने अनुभवला. धक्क्यांना काहीशा सराईत असलेल्या या मंडळींनाही या वेळची तीव्रता जीवघेणी वाटली. आपापसातील चर्चेनंतर निर्णय घेण्यात आला, कुटुंबे येथून हलवावीत. या ज्यादा खर्चासाठी शासनाकडे परतफेडीचे बोलीने आगाऊ पगार मागण्यात आला. प्रकरण मुंबईपर्यंत पोचले आणि आश्चर्य म्हणजे कल्पनेपेक्षा आधी, असा पगार मागणाऱ्या कर्मचाऱ्यांना तो देण्यात यावा अशा आज्ञाही आल्या. त्याप्रमाणे कर्मचाऱ्यांचे अर्ज आले. वेळीच रक्कम हाती येती, तर पाच-पंचवीस कुटुंबांना त्याचा लाभ निश्चित मिळाला असता. पण ते होणे नव्हते. अन्यथा मुंबईचा शिक्कामोर्तब होऊनही हा अकारण विलंब का ? झाली गोष्ट होऊन गेली. करणारानेही कोणी मुद्दाम केले असेल असे नाही. पण चुकीचे प्राय-

श्चित्त पाचपंचवीस कुटुबांना भोगाव लागत आहे याचीच हळहळ. घरे सर्वांचीच गेली, अनेक घरची माणसे गेली, वृत्तपत्रांनी उगवत्या प्रभाती वृत्त छापले. भयानक वार्तेने हादरून गेलेली आजूबाजूची अनक मंडळी कोयनेला आली. ' काही अपवाद वगळता, या बध्यांचा आम्हांला विलक्षण त्रास झाला. वसंत साने नावाचे कर्मचारी सांगत होते— ' स्वतःचे दुःख विसरून आम्ही इतरांना मदत करीत होतो. काल ज्यांच्यावरोबर गप्पा मारल्या, अशा स्नेही-सोबत्यांचे मृत देह पाहताना भडभडून येत होतं. वेळीच आलेल्या आप्तांच्या ताब्यात अनेक मृत देह दिले आणि उरलेल्या अनेकांना त्यांची माणसं वेळेवर न आल्यानं आमच्या हातांनी भडाग्नी दिला आणि आम्ही कोयना सोडली. वृत्तपत्रांतील प्रकटने वाचून डिसेंबर २६ तारखेला रुजू झालो. ज्यांनी येणे आवश्यक होते अशा मंडळींपैकी केवळ ५ टक्के लोक पहिल्या दिवशी हजर झाले.

नंतर हळूहळू उपस्थिती सुधारली. आवश्यक ते काम संपल्यावर कर्मचारी अजूनही आपापसात भूकंप झाला कसा याची चर्चा करतात, दररोज नवीन तज्ज्ञ नवीन अनुमान घेऊन पुढे येतो.

## तज्ज्ञांचे अंदाज

हैद्राबादच्या भूस्तरांतर्गत विषयासंबंधी अभ्यास करणाऱ्या संस्थेचे प्रमुख डॉ. हरी नारायण, यांच्या मते दक्षिण पट्टा सुरक्षित आहे ही कल्पना आता सोडून दिली पाहिजे.

कोयना धरणामुळे, आणि दक्षिण पट्ट्यातील अन्य धरणांमुळे संबंधित भू-विभाग दाबला जाऊन निर्माण होणाऱ्या भूस्तरांतर्गत शक्तीमुळे हा भूकंप झाला असावा, असे मत भूस्तर संशोधक संघटनेचे प्रमुख डॉ. एम. एस. कृष्णन यांनी व्यक्त केले. पश्चिम किनाऱ्यावर काही भूस्तरांतर्गत क्रांतिकारी हालचाली चालू असाव्यात असेही त्यांनी सूचित केले.

पाटबंधारे व वीज खात्याचे केंद्रीय मंत्री के. एल. राव यांनी श्री. कृष्णन यांच्या विधानाबाबत मतभेद व्यक्त केले. पाण्याच्या दाबामुळे काही किरकोळ ' शॉक्स ' जाणवणे शक्य असले तरी कोयनेच्या भूकंप-धक्क्याचा पाणीसाठ्याशी संबंध जोडण्यास ते तयार नाहीत मात्र अन्य कोणतेच सबळ कारणही त्यांनी दिलेले नाही.

डॉ. ए. आर. चंद्रशेखर यांनी केंद्रीय मंत्र्यांना पाठिंबा दिला आहे. तसेच या धक्क्याचा आणुस्फोट-चाचणीशी संदर्भ जोडणेही हास्यास्पद असल्याचे स्पष्ट केले आहे. जमिनीखाली केलेल्या अणुस्फोटापेक्षा हा भूकंप अनेक पटींनी भयावह होता, असे त्यांनी सांगितले आहे.

मुंबईच्या ॲटॉमिक एनर्जीमधील एक तज्ज्ञ डॉ. डी. एन. वाडिया झालेल्या भूकंपाचे स्पष्टीकरण करीत नसले तरी या भूकंपामुळे कोयनेच्या परिसराचा ' भूकंपग्रस्त प्रदेश ' म्हणून उल्लेख करणे त्यांना मान्य नाही. अनपेक्षित व मोठ्या शक्तीच्या या

भूकंपाचा अभ्यास करणे ते पसंत करतात. त्यांच्या मते गेल्या २०० वर्षांत भारतामध्ये लक्षणीय स्वरूपाचे ७८ भूकंप झाले, परंतु त्यातील एकही महत्त्वपूर्ण धक्का विंध्य व सातपुडा पर्वतांच्या दक्षिणेकडील भागात जाणवला नव्हता. कोयनेच्या परिसरामध्ये बसलेला मोठा धक्का, तसेच १३ सप्टेंबरचा लक्षणीय धक्का व त्यापूर्वीचे अनेक धक्के यांचे मूळ उगमस्थान अरबी अथवा ॲटलाण्टिक समुद्रात असले पाहिजे असे डॉ. वाडिया यांचे म्हणणे आहे. दूरपर्यंत पोचणाऱ्या शक्तिलहरींतून कोयनेच्या परिसरात धक्के जाणवतात. मोठ्या धक्क्यानंतर काही महिनेपर्यंत या धक्क्यापेक्षा कमी शक्तीचे धक्के जाणवणे, ही नैसर्गिक प्रक्रिया असल्याचेही श्री. वाडिया यांनी स्पष्ट केले आहे. या सर्वांचे तात्पर्य एकच; कोयनेच्या भूकंपासंबंधी, डोणाचिलीजवळील भेगेसंबंधी, सांगलीजवळील चमत्कारिक धुरासंबंधी आणि या भूकंपाच्या संदर्भात झालेल्या निसर्गप्रकोपाबाबत तज्ज्ञांमध्ये एकमत नाही हेच खरे. या विविध मतप्रदर्शनामुळे सरकारी कर्मचारीही कारणमीमांसा लावण्याचा प्रयत्न करतात. कोयनेच्या परिसरातील माती पाणी लगेच शोषून घेते. स्वाभाविकपणेच धरणाखालील भागातही पाणी शोषण्याची ही प्रक्रिया सतत चालू असणार. आत शोषल्या गेलेल्या अशा पाण्याची वाफ होत असली पाहिजे. आणि या वाफेच्या प्रचंड शक्तिसामर्थ्यामुळे व तिच्या सतत बाहेर येण्याच्या प्रयत्नामुळे हे धक्के जाणवत असले पाहिजेत; असे बहुसंख्य कर्मचाऱ्यांना वाटते. अशा परिस्थितीत स्वाभाविकपणे त्यांना तेथे राहणे पसंत नाही. फक्त अत्यंत आवश्यक स्टाफ कोयनानगरला ठेवण्यात यावा अशीही त्यांची मागणी आहे.

मदतकार्यासंबंधी विचारणा केली असता ज्ञानप्रबोधिनी, आनंद मार्ग, नॅशनल ख्रिश्चन असोसिएन यांचा प्रामुख्याने उल्लेख झालेला आढळतो. अर्थात आपल्या कर्मचाऱ्यांनी निदान वसाहतीमध्ये तरी कोणत्याही खाजगी व्यक्तीची वा संस्थेची मदत घेऊ नये अशी शासनाची अपेक्षा आहे.

सरकार सध्या तुम्हांला कोणती मदत देते ? असा सवाल मी एका कर्मचाऱ्याला विचारता त्याने सांगितले– ‘ १५ डिसेंबर १९६७ ते १४ जानेवारी १९६८ पर्यंत कामावर आलेल्या सर्व कर्मचाऱ्यांना पूर्ण मोफत भोजन व चहा देण्यात येत आहे. चार-सहा जणांमध्ये मिळून एक गोदरेज कपाट व प्रत्येकाला एक कॉट देण्यात आली आहे. (सांगली अधिवेशनाची कृपा).’

‘मदतीसंबंधी तुमच्या अन्य अपेक्षा काय काय ?’ असे विचारले असता त्यांच्यातील एक दिगंबर गुजर म्हणाले ‘ आमच्या मागण्या मांडणारे पत्रक आम्ही नुकतेच मुख्यमंत्र्यांना दिले आहे. ’

कोयनानगर पुन्हा वसवायचे असेल, तर याहीपेक्षा प्रखर भूकंप तडाख्यातही टिकून राहतील अशी घरे बांधण्यात यावी. अत्यंत आवश्यक स्टाफ कोयनेत ठेवावा. इथे काम करणाऱ्या सर्व कर्मचाऱ्यांना ‘ धोका स्वीकारण्याबद्दलचा भत्ता ’ देण्यात

यावा, तसेच त्यांचे सर्वांचे विमेही उतरवण्यात यावेत. नुकत्याच झालेल्या भूकंपामध्ये ज्यांना मृत्यू आला आहे, अशा कर्मचाऱ्यांच्या कुटुंबियांची सर्व देखमाल शासनाने करावी.

खुद्द कोयनानगरला भूकंपाचा सर्वांत जबरदस्त तडाखा बसला. असे असूनही कोयनेपासून रत्नागिरीपर्यंतचा व साताऱ्यापर्यंतचा परिसर मदत देण्याच्या दृष्टीने एकाच मापाने मोजणे योग्य नाही. कर्मचाऱ्यांचे हे म्हणणे निश्चितपणे पटणारे आहे. कारण त्यांनी उल्लेखिलेल्या सर्व भागाचा फेरफटका मी नंतर केला, आणि माझी अशी खात्री झाली, की मदतीची सर्वांत जास्त गरज खुद्द कोयनानगरमध्येच आहे.

कोयना सोडण्यापूर्वी मुख्य इंजिनिअर श्री. पी. एस. आपटे यांना भेटलो. भूकंपावर काही तोडगा काढू आणि सध्याच्या उद्ध्वस्त कोयनानगरमधून–निसर्गाशी झुंज घेत ठामपणे उभे राहील, असे नवीन नगर उभारू, अशी त्यांची प्रेरणा आहे. भूकंप ही कायमची भीती आहे यावरही त्यांचा विश्वास नाही. भूकंप-परिस्थितीसंदर्भात शासनाने १९६३ साली नेमलेल्या मंडळाचे श्री. आपटे सदस्य आहेत. त्यामुळे भूकंपविषयक परिस्थितीचा त्यांचा अभ्यास दांडगा आहे. वेळ पडल्यास भूकंपासही तोंड देऊ शकतील अशी घरे उभारून पुनश्च कोयनानगर उभारण्याची स्वप्ने ते पाहत आहेत. कोणत्या पद्धतीने उभारलेली घरे येथे टिकून राहू शकतील याचा अभ्यास ते सध्या करत आहेत.

कोयनानगर सोडण्यापूर्वी धरणाच्या भिंतीपर्यंत जाऊन धरण सुरक्षित असल्याची खात्री करून घेतली. धरणाला असलेल्या ' शो टॉवर 'ला काही तडे गेले असल्याने तो उतरवण्यात येणार आहे. हा मजकूर प्रसिद्ध होईपर्यंत हे काम पूर्णही झाले असेल.

पोफळी आणि अलोरा, ही सरकारी व महाराष्ट्र वीज मंडळाचे प्रतिनिधी असलेली अन्य प्रमुख केंद्रे. भूकंपाचा जबरदस्त तडाखा याही भागाला जाणवला आहे. स्वाभाविकपणेच येथील कर्मचाऱ्यांच्या अडचणी व अपेक्षा सर्वसाधारणपणे कोयनानगरमधील कर्मचाऱ्यांप्रमाणेच आहेत. फरक इतकाच, की मोठ्या धक्क्यापूर्वी सरकार स्वस्थ बसल्याबद्दल कोयनेच्या कर्मचाऱ्यांमध्ये जेवढा संताप आढळतो, तितक्या संतापाने पोफळी, अलोरा येथील कर्मचारी बोलत नाहीत. कोयनानगरचे श्रीकान्त पाळव यांचे थोरले भाऊ या धक्क्यामुळे मृत्युमुखी पडले. एक बहीण अपंग झाली.

## अक्षम्य दुर्लक्ष

भरपूर पूर्वसूचना मिळूनही शासनाकडून कोणतीही पूर्वतयारी झाली नाही याबद्दल ते विलक्षण संतापाने बोलत होते. १९६१ च्या उत्तरार्धापासून धक्के सुरू झाले. १९६२ नंतर त्याचे प्रमाण वाढू लागले. १९६४ अखेर धक्क्यासंबंधी आम्ही येथील नागरिकही काही ठोकताळ बसवू लागलो. १९६६ नंतर या प्रकाराचे गांभीर्य विलक्षण वाढले.

शासनाकडून १९६३ साली या प्रकरणाची प्रथम दखल घेतली गेली. याच वर्षी पी. एम. माने, एम. एस. बलसुंदरम्, एन. एस. टंडन, व पी. एस. आपटे यांची समिती नेमण्यात आली. कोयनेला भूकंप बसल्यास कोणत्या स्वरूपाची दक्षता घ्यावी, यासंबंधी सूचना करण्याची कामगिरी या तज्ज्ञांकडे सोपवण्यात आली. समितीने अद्यापि आपला अहवाल सादर केला नसला, तरी गेल्या चार वर्षांतील चर्चेचा गोषवारा सरकारी दप्तरात नोंदवण्यात आला आहे. कोयना-परिसर सर्वसाधारणपणे भूकंपदृष्ट्या सुरक्षित पट्ट्यामध्ये येतो असा या गोषवाऱ्याचा सूर आहे.

तज्ज्ञांना जे जाणवले नाही ते नागरिकांना जाणवत राहिल्याने भूकंपविषयक माहितीची नोंद राहावी म्हणून कोयनानगरच्या परिसरातील सरकारी कर्मचाऱ्यांनी भूकंपानंतर घडलेल्या घटनांच्या नोंदी फॉर्म्समध्ये कराव्यात अशी अपेक्षा होती. धक्क्यांचे प्रमाण वाढत होते. फॉर्म्सही भरले जात होते. परंतु कोणतीच उपाययोजना होत नसल्याने सर्व प्रकाराला विलक्षण हास्यास्पद स्वरूप प्राप्त झाले होते. १९६६ नंतर धक्क्याची शक्ती आणि परिसर या दोन्हीमध्ये वाढ होऊ लागली. पोफळी-चिपळूणपर्यंत, इकडे पाटण-कराडपर्यंत धक्के पोचू लागले. आणि १३ सप्टेंबरच्या शक्तिवान धक्क्याने जणू पूर्वसूचनाच दिली. परंतु किरकोळ दुरुस्तीखेरीज शासनाने काहीही केले नाही. या धक्क्याने कोयनानगर घाबरले होते. शासनाकडून मदतीची–माहितीची अपेक्षा होती. निदानपक्षी यापेक्षा प्रखर भूकंप झाल्यास कोणत्या दक्षता घ्याव्यात याची जाणीव जनतेला करून देणे अगत्याचे होते. परंतु घाबरलेल्या जनतेला हाही दिलासा मिळाला नाही. आणि मग ११ डिसेंबरच्या प्राणघातक तडाख्याने मृत्यूचे आणि विध्वंसाचे जीवघेणे तांडव केले. शासनाने वेळीच दक्षता घेतली असती तर निदान मनुष्यहानीचे प्रमाण कमी झाले असते असे अजूनही वाटते.

११ डिसेंबरच्या तडाख्याने झालेल्या हानीला तोड नाही. या अपरिमित हानीचा निश्चित आकडाही काढता येणार नाही.

**उद्योगधंदे :** भूकंपाच्या या एकाच धक्क्याने वीजप्रवाह बंद पडून मुंबई-पुण्याच्या उद्योगपरिसराची घडी विसकटवून टाकली. केवळ मुंबईच्या परिसरातील उद्योगक्षेत्रातील उत्पादनहानीचा आकडा काही कोट रुपयांपर्यंत जाईल. या काळामध्ये काम नसल्यामुळे मुंबईच्या ७ लाख कामगारांना सक्तीने घरी बसावे लागले. या वर्गाचे प्रतिदिनी ३० लाख रुपयांचे नुकसान झाले.

**शेती :** दक्षिण महाराष्ट्रातील सुमारे १·५ लाख एकर जमिनीवरील ज्वारी, ऊस, भाजीपाला व फळे या पिकांना विजेवरील पंप न चालल्याने पाणी देण्याचा प्रश्न बिकट होऊन बसला. या भागातील शेतीचा मोठा हिस्सा पंपाने उपसल्या जाणाऱ्या पाण्यावर अवलंबून आहे. पंप बंद पडल्याने कोल्हापूर जिल्ह्यातील ५० हजार तसेच सातारा व सांगली जिल्ह्यांतील ३० हजार एकरांतील उसाला

पाणी मिळू शकले नाही. या भागातील उभ्या पिकांची किंमत ३७ कोटींच्या घरात जाते. महाराष्ट्रातील ७५ हजार इलेक्ट्रिक पंपांपैकी दक्षिण महाराष्ट्रातील ३० हजार पंप्स विजेअभावी बंद होते.

**मनुष्यहानी :** भूकंपामध्ये निश्चितपणे मनुष्यहानी किती झाली याचा मी कसोशीने मागोवा घेतला. अनेक घरांतील व विविध भागांतील लोकांना यासंबंधी माहिती विचारली. माझी अशी समजूत झाली की, कोणत्याही परिस्थितीत हा आकडा २५० पेक्षा जास्त नाही. यातही स्त्रिया, व मुली यांचे प्रमाण जास्त असून सुमारे २४ कुटुंबांच्या संदर्भात कुटुंबप्रमुखाचा मृत्यू झाल्याचे आढळून आले.

या भूकंपहानीची झळ सुमारे तीन लाख लोकांना कमीजास्त प्रमाणात पोचली. कोयनानगर केंद्र धरून सलगच्या २५ मैल परिसरातील सुमारे १२०० घरे-झोपड्या, पूर्णतया जमीनदोस्त झाल्या.

केवळ याच मालमत्तेची किंमत सुमारे १५ कोटी रुपये होते. कोयनानगरच्या ११ हजार लोकसंख्येपैकी ७ हजार धरण-योजनेतील कर्मचारी आहेत. यातील प्रत्येकाला काहीना काही झीज सोसावी लागली आहे. खुद्द कोयनानगरमध्ये हनुमान-मंदिराचा अपवाद वगळता अन्य इमारती जमीनदोस्त झाल्या आहेत. आणि नजीकच्या सुमारे २०८ गावांमधून कमीअधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे.

दुर्दैवाने कोयना धरण फुटले तर काय, असा प्रश्न मी कोयना धरणावर दीर्घ काळ काम केलेल्या एका वरिष्ठ इंजिनिअरला विचारला. "–विलक्षण वेगाने विनाशी घोडदौड करणाऱ्या या पाणलोटाने किमान ८० मैलांच्या परिसराचा केवळ तीन तासांत पूर्ण विध्वंस करून टाकला असता."

पोफळी–अलोरा परिसरातही हानीचे प्रमाण फार मोठे आहे. या भागातील विभागीय आयुक्त श्री. जी. ए. शर्मा म्हणाले– 'चिपळूण, खेड आणि संगमेश्वर या तीन तालुक्यांत तीन कोटी रुपयांवर नुकसान झाले आहे. पोफळीच्या सरकारी इमारतींपैकी ७५ टक्के इमारती निकामी झाल्या आहेत. चिपळूण, संगमेश्वर आणि खेड तालुक्यांतील सुमारे १२२ खेड्यांतील १० हजारांवर घरे राहण्याच्या दृष्टीने निरुपयोगी झाली आहेत.'

नुकसानीचे हे हृदयविदारक स्वरूप महाराष्ट्राला नवीन. त्यातून कोयना धरण-योजना म्हणजे महाराष्ट्राचे अभिमानस्थान. भूकंपाच्या व लोकविलक्षण हानीच्या वार्ता वृत्तपत्रांनी देशभर फैलावताच काही तासांतच मदतीचा ओघ सुरू झाला. झालेल्या हानीचा फायदा समाजकंटकांनी उठवू नये व येणाऱ्या मदतीचे सुसूत्र वाटप व्हावे, गरजवंतांना साहाय्य व्हावे, यासाठी प्रारंभीच्या काळामध्ये लष्कराचे सहकार्य घेण्यात आले आणि काही कालावधीनंतर ही जबाबदारी स्टेट रिझर्व्ह पोलीस दलावर टाकण्यात आली. या दोन्ही दलांनी आपले कार्य अचूक ओळखून ते जाणीवपूर्वक पार पाडले.

एस. आर. पी. चे प्रमुख केंद्र पाटण येथे असून कोयनानगर, पोफळी व अलोरा येथे त्यांची उपकेंद्रे आहेत. खाजगी व सरकारी वाहनांना तसेच अन्य व्यक्तींनाही कोयनानगरवरून पुढे पोफळीकडे जाताना पास घ्यावा लागतो. पाटण ते अलोरा या भागात सुमारे ७५० एस. आर. पी. चे पोलीस काम करीत असून त्यांचे नेतृत्व कमाण्डण्ट आर. एस. सावंत यांच्याकडे आहे.

## मदतवाटप

सरकारी यंत्रणेमार्फत व खाजगी संस्थांतर्फे व काही वृत्तपत्रांतर्फे मदतीचे कार्य हिरीरीने करण्यात येत आहे. प्रारंभीच्या काळात शासनाची मदत येण्यापूर्वीच अन्न, वस्त्र, औषधे ही तात्कालिक मदत पोचवण्याचे कार्य अनेक सामाजिक संस्थांनी केले. छोटया खेडयांतून मदत पोचणे अत्यंत आवश्यक आहे याची जाणीव ठेवून या संस्थांनी कार्य केले. आजही तेथे अनेक संस्था मदतकार्य करीत असून निदान १५ जानेवारीपर्यंत बहुतेक संस्थांचे कार्य चालू राहील असे दिसते.

भूकंपाने निर्माण झालेल्या अनेक प्रश्नांपैकी येणाऱ्या मदतीचे सुसूत्र व योग्य प्रकारे वाटप हा प्रश्न सर्वांत गुंतागुंतीचा आहे. आणि या प्रश्नाची उकल मुळीच समाधानकारकपणे झालेली नाही.

भूकंपाने हादरवून सोडलेला परिसर फार मोठा असल्याने अल्पावधीत या सर्व भागाची मदतवाटपाच्या दृष्टीने सुसंबद्ध पाहणी करणे सर्वथैव अशक्य होते. अशा परिस्थितीत विलक्षण हानी झालेल्या पाटण-कोयनानगर परिसरावर मी माझे लक्ष केंद्रित केले.

या भागाची हानी मोठी असल्याने स्वाभाविकपणे भूकंपपीडितांसाठी साहाय्य करणाऱ्या बहुतेक सर्व सामाजिक संस्थांची केंद्रे या भागात पाहावयास मिळाली.

लगोलग मदत व आलेल्या मदतीचे सुयोग्य वाटप या दृष्टिकोनातून ज्ञान-प्रबोधिनी, नॅशनल ख्रिश्चन असोसिएशन व आनंद मार्ग या संस्थांनी केलेले कार्य विशेष डोळ्यांत भरते. या संस्थांच्या काही केंद्रांवर जाऊन तेथील अधिकाऱ्यांची मी मुद्दाम भेट घेतली. ज्ञानप्रबोधिनीने कोयना-बाजारपेठेसमोर चालवलेल्या केंद्रावर पी. पी. मोटे (सोलापूर) यांची भेट झाली. ते म्हणाले–' आमचे विद्यार्थी व कार्यकर्ते मिळून आम्ही सुमारे १४० कार्यकर्ते या भागात मदतकार्य करीत आहोत. १३७ खेडयांतून १७ हजार लोकांपर्यंत या संस्थेने कापड, औषधे व धान्य यांची मदत पोचवली. दिलेल्या मदतीची नोंदही ठेवलेली आढळली.

मोठ्या ट्रक्स, जिप्स यांसारखी वाहतुकीची प्रभावी साधने, भरपूर मनुष्यबळ, यामुळे नॅशनल ख्रिश्चन असोसिएशनने केलेले काम चांगलेच नजरेत भरते. या संस्थेने चालवलेल्या एका मदतकेंद्रावर एफ. जोसेफ यांची भेट घेतली. पांघरुणे आणि धान्यवाटपाचे काम या संस्थेने फार मोठ्या प्रमाणावर केले आहे.

कितीही नाही म्हटले तरी या कार्याला मदतीबरोबर अन्य हेतूंचा वासही

निश्चितपणे येतो. आनंद मार्ग या संस्थेचे स्वरूपही धार्मिकच. मनुष्यबळ तोकडे असूनही या संस्थेने केलेले कार्य पाहून आश्चर्य वाटले. येराड, मगेरी, शिराळबाग, वांझोळे, हेळवाक, मिरगाव, अशा छोटया छोटया खेडयांपर्यंत मदत पोचवण्याचे कार्य या संस्थने केले. कंदील, भांडी, सतरंज्या व धान्य पोचवण्याचे कार्य या संस्थेने केले. अनेक खेडयांतील नागरिकांजवळ बातचीत केली असता सामाजिक संस्थांच्या कार्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

शासनाकडूनही मदतीचे वाटप जोरात सुरू असून भूकंप पट्टयातील २५ मैलांच्या परिसरातील क्षेत्रामध्ये ही मदत पोचवली जात आहे. मदतीचे स्वरूप खालीलप्रमाणे आहे.

कुटुंबातील माणसांपेक्षा एक पत्रा अधिक. ६ माणसांच्या कुटुंबाला ७ पत्रे, खेरीज ४ बांबू, ४ कळकाचे तुकडे, ४ मांडगे; माणशी चार किलो आटा व प्रत्येकी २२.५० रुपये रोख, याखेरीज घरेदारे उद्ध्वस्त झालेल्या कुटुंबांना प्रत्येक कुटुंबामागे २५० रुपये, ६ महिन्यांचा धान्यसाठा आठवडा–पद्धतीने, कंदील व माणशी एक पांघरूण देण्यात येत आहे.

पडलेल्या घरांची किंमत करून त्यांना काही प्रमाणात नुकसानभरपाई देण्यात येणार आहे असे सांगितले जात आहे. खेरीज पंतप्रधानांपासून ते सर्व पुढारी वारंवार भेटी देऊन दिलासा देत आहेत. या संदर्भात महसूलमंत्री श्री. बाळासाहेब देसाई यांची कामगिरी सर्वोत्कृष्ट आहे. दीर्घकाळपर्यंत भूकंपग्रस्त भागामध्ये राहून मदतकार्यात त्यांनी जातीने लक्ष घातले आहे. या विभागातील जनतेमध्येही त्यांच्याबद्दल विलक्षण आपुलकी आढळून आली. इतके असूनही कऱ्हाडच्या परिसरातून त्यांना ‘ घरचा आहेर ’ स्वीकारावा लागला ही बाब अलाहिदा.

मदतीचे हे सर्वसाधारण स्वरूप. मदतकार्यामध्ये अन्न, वस्त्र, भांडी, औषधे, आदी तत्कालीन मदतगृहे व निवासगृहे व पुनर्वसनाचे अन्य प्रश्न अशी दीर्घकालीन मदत असे दोन सुस्पष्ट भाग पडतात. पैकी तत्कालीन स्वरूपाचे मदतकार्य संपत आले आहे. सामाजिक संस्थांनी ही जबाबदारी प्रामुख्याने पार पाडली आहे. दीर्घकालीन मदतकार्याची जबाबदारी शासनाने स्वीकारणे आवश्यक आहे. पुनर्वसन–प्रश्नामध्ये मानसिक–पुनर्वसन हा फार महत्वाचा भाग आहे.

भूकंपाचे संकट महाराष्ट्रास नवीन आहे. स्वाभाविकपणेच लोक अजूनही भयभीत अवस्थेत आहेत. सातारा, कऱ्हाडसारख्या शहरांतूनही चांगली सुशिक्षित मंडळी रस्त्यावर तंबू टाकून झोपत आहेत. मग कोयनेच्या परिसरातील खेडेगावच्या अडाणी जनतेच्या मनामध्ये किती भीती असेल, याची अचूक कल्पना येते. त्यात हे भविष्यवाले अक्षरशः हैराण करीत आहेत. जबाबदार वृत्तपत्रेही भडक बातम्या प्रसिद्ध करून भयभीत नागरिकांच्या मनातील भीती कायम टिकवत आहेत.

मी कोयनानगरला गेलो होतो. त्या दिवशी होती अमावस्या आणि कोणी तरी

शहाण्याने अमावस्येला धरण फुटणार असे भाकित केलेले; ते खरे समजून सुमारे २६ मंडळी त्या रात्री पाटणपर्यंत मागे गेली. पुण्याच्या एका वृत्तपत्राने प्रसिद्ध केले होते– "धरण फुटल्यास २५ लाख लोक मरतील व कऱ्हाड शहरावर ६० फूट पाणी जाईल." बातमी कऱ्हाडमध्ये पोचली आणि सुमारे ५०० कुटुंबप्रमुखांनी आपली बायकामुले बाहेर पाठवली. जनमानसांतील ही भीती प्रथम दूर झाली पाहिजे. ही भीती नाहीशी होणे याला मी मानसिक-पुनर्वसन म्हणतो. धक्के कमी होत बंद होण्यावरच हे मानसिक-पुनर्वसन अवलंबून आहे. भूकंपाचे संकट या भागामध्ये काय-मचे होणार असेल, तरीसुद्धा जनतेला त्याची जाणीव दिली पाहिजे. भूकंपसंकटातून सहीसलामत बाहेर पडण्यासाठी आवश्यक ते शास्त्रशुद्ध शिक्षण दिले पाहिजे. घर-दार-गाव सोडून पळण्याची जी प्रवृत्ती या भागात आढळते ती कटाक्षाने दूर झाली पाहिजे.

## इथेही भिक्षांदेही

सामाजिक संस्थांनी जे मदतकार्य केले, त्यात अनेक गैरअनुभव आले. मिळाली त्याला भरपूर, नाही त्याला अजिबात नाही असा प्रकारही पाहावयास मिळाला. माझ्या डोळ्यांसमोर एकाच इसमाने तीन रग व पत्र्याची सोळा पाने गोळा केली. तर शिराळ पेठेतील एक म्हातारा – महादू विष्णू मांढकर, वय सुमारे ७०–कोणतीही मदत न घेता आपल्या लेकीसुनांसह नवे घर उभारत होता. त्याचा मुलगा गोपाळ धरणावर काम करतो. त्याचा दोन महिन्यांचा पगार या कुटुंबाने घरउभारणीत खर्च केला. अन्य मदतीची आपल्याला गरज नाही असे त्याने सांगितले. का ? विचा-रले तर म्हातारा म्हणाला, 'साहेब दैवी संकट, त्याला राजा काय करणार आणि तुम्ही लोक तरी काय करणार ?' कुठे हा म्हातारा आणि कुठे वांझोळा, दास्तान, राममळा, आदी ठिकाणच्या मदतकेंद्रांवर तासनतास खोळंबून वेळ दवडणारी तरुण मंडळी. राममळ्याच्या मदतकेंद्रावर तिघे दणकट तरुण शेतकरी गप्पा टाकत उभे होते. मी अन्य दोन केंद्रांची पाहणी करून पुन्हा तेथे आलो तरी मंडळी आहेतच. नावे विचारली – मारुती जाधव, उस्मान भोईर व शंकर देसाई. पहिला शेतकरी, दुसरा गवळी व तिसरा रिकामटेकडा असल्याचे समजले. दिवसभर केविलवाणे तोंड करून कोणत्या ना कोणत्या केंद्रासमोर उभे राहायचे. मिळेल ते घ्यायचे. पुन्हा दुसऱ्या दिवशी सकाळपासून हाच उपक्रम. कित्येक वेळा केंद्र चालवणाऱ्या मंडळींना ही अशी माणसे माहीत असतात. म्हणून सरकारी केंद्रावर चौकशी केली तर सुभाष पाटोळे नावाच्या इसमाने सांगितले, 'मला या मंडळींची चांगली माहिती आहे. इतकेच नव्हे तर अनेक केंद्रांभोवती अशी अनेक मंडळी पसरली आहेत. परंतु आम्हांला परिचित असणारी ही मंडळी बाहेरगावाहून येणाऱ्या अनेकांना अपरिचित असतात. स्वाभाविकपणेच बाहेरून येणाऱ्या मदतीचा मोठा वाटा ते आपल्या पदरात पाडतात !

ही भीकमागी वृत्ती नष्ट होणे जरूर आहे. त्यासाठी मदतकेंद्र चालवणाऱ्या सर्वांनीच

आपली मदत अचूक ठिकाणी पोचते की नाही याची दक्षता घेणे आवश्यक आहे.

शासकीय पातळीवरून होणाऱ्या मदतीमध्येही हा गलथानपणा आढळून आला सातार्‍याचा एक व्यापारी म्हणाला–' सहा महिन्यांत मदतीचे पत्रे बाजारात येतील आणि उंची स्वेटर्स व अन्य कपडयांची विक्री होईल.'

दीर्घकालीन मदत देतानाही कुटुंबाची भूकंपपूर्व आर्थिक अवस्था व भूकंपामुळे झालेले नुकसान यांच्या नोंदी पाहिल्यावरच मदत दिली जावी. ज्याचे घरदार साप पडूनही आर्थिक नुकसान ७०० ते १००० रुपयांपर्यन्त असते त्याला व ज्याचे घर दार गेल्याने नुकसान काही हजारांत आहे अशांना मदतीच्या तराजूमध्ये एकाच मापाने मोजणे अन्यायकारक ठरेल. कोणत्याही परिस्थितीत दीर्घकालीन मदतीची सांगड, झालेल्या नुकसानीच्या प्रमाणात घातली गेली पाहिजे.

घरबांधणीच्या दृष्टीने कामचलाऊ योजना म्हणून पत्र्यांच्या झोपडया उभारण्यासाठी साहित्य दिले जात असले तरी या भागातील पावसाचे प्रमाण १५० इंचांच्या आतबाहेर असल्याने या साहित्याने उभारलेल्या झोपडया कितपत टिकाव धरू शकतील हाही महत्त्वाचा भाग आहे.

देशाच्या सर्व भागातून मदतीचा ओघ सतत येत आहे, उभारणीच्या कार्यामध्ये देश तुमच्या पाठीशी आहे असा दिलासा पंतप्रधानांनी दिला आहे. शासन आणि सामाजिक संस्था आपले सामर्थ्य पणास लावून पुनर्वसनाचे काम करीत आहेत अशा परिस्थितीत साहेबांनी म्हटल्याप्रमाणे "धरणी हलली तरी मनुष्य हलणार नाही." असा निश्चय करून व आलेले संकट कायमच राहील असे गृहीत धरून आपण एकदिलाने कामास लागलो तर पुनर्वसनाचे प्रश्न सुटून आगामी काही वर्षांमध्ये कोयनेचा परिसर पुन्हा नवचैतन्याने खेळू लागेल. ○


पुरंदऱ्यांची नौबत

ब. मो. पुरंदरे

मूल्य साडेतीन रुपये

राजहंस प्रकाशन

४१९ नारायण, पुणे २




उत्तरार्ध लेखांक

३

घटना समितीचे विसर्जन हा लेनिनच्या दहशतवादाचा केवळ प्रारंभ होता.

देशात कोठेही विरोधी आवाज उमटता कामा नये अशी व्यवस्था करण्यासाठी लेनिनने 'चेका' ही नवी गुप्त पोलीस-संघटना उभारण्याचे ठरविले. झार-शाहीच्या काळात जे काम 'ओखाराना' करीत होती तेच काम करण्यासाठी 'चेका'चा जन्म होणार होता. फेलिक्स झेर्झिन्स्की या तरुणाकडे 'चेका'ची जबाबदारी सोपविण्यात आली. उंचापुरा आणि बळकट शरीर-यष्टीचा हा पोलिश तरुण सदैव हसतमुख असायचा आणि त्यामुळे त्याच्या मनाचा कोणालाही थांगपत्ता लागत नसे. त्याच्या या गुणावर खुष होऊनच लेनिनने त्याच्याकडे 'चेका'ची कामगिरी सोपविली होती. आपण धर्मोपदेशक व्हावे ही झेर्झिन्स्कीची बालपणीची इच्छा. वाढत्या वयाबरोबर ही इच्छा मागे पडली आणि तो काव्यक्षेत्राकडे वळला. एक उदयोन्मुख कवी म्हणून झेर्झिन्स्कीची वाहवा होत असताना तो लेनिनच्या

सहवासात आला आणि अल्पावधीतच त्याने लेनिनचे शिष्यत्व स्वीकारले. बोल्शेव्हिक क्रांतीनंतर झेर्झिन्स्कीने पीटर्स आणि लॅटासिस या सहकाऱ्यांच्या मदतीने 'चेका' ची उभारणी केली.

कोणाचीही मालमत्ता ताब्यात घेण्याचा आपल्याला अधिकार आहे, अशी नव्या बोल्शेव्हिक सरकारची धारणा होती. या कारवायांना कायदेशीर स्वरूप दिले नाही तर लोकात असंतोष निर्माण होईल हे ओळखून दलित जनतेच्या हितासाठी सोव्हिएट सरकार ही कृती करीत आहे, असे जाहीर करण्याची दक्षता लेनिन घेत असे. अशा रीतीने सरकारी पाठिंबा मिळाल्यानंतर बोल्शेव्हिक कार्यकर्त्यांना विरोधी पक्षीय कार्यकर्त्यांची मुस्कटदाबी करण्याचा परवानाच मिळाला.

राजकीय दहशतवादाबाबत लेनिनची भूमिका कोणती होती हे जाणून घेण्याच्या दृष्टीने शिगारेव्ह आणि कोकोशकीन यांच्या खुनाची घटना महत्त्वाची ठरते. शिगारेव्ह आणि कोकोशकीन हे दोघेही केरेन्स्कीचे सहकारी. घटना समितीचे विसर्जन करण्यात आल्याचा लेनिनने हुकूम काढल्यानंतर काही तासांच्या आतच त्या दोघांचा खून करण्यात आला. या घटनेमागे आपला मुळीच हात नाही हे दाखविण्यासाठी लेनिनने न्यायमंत्री आयसॅक स्टेनबर्ग याला बोलावून घेऊन खुनी इसमांचा तपास करण्याचा हुकूम दिला.

बाल्टिक समुद्रात उभ्या असलेल्या चायका या जहाजावरील दोघा खलाश्यांनी हा खून केला आहे, एवढी माहिती अगोदरच बाहेर आलेली होती. त्यामुळे लेनिनने स्टेनबर्गला सांगितले, 'बाल्टिकमधील नौदलाचं नेतृत्व डायबेन्कोकडे आहे. त्यामुळे तू त्याला स्मोल्नीमध्ये बोलावून घे.'

स्टेनबर्गच्या निरोपानुसार डायबेन्को स्मोल्नीमध्ये येताच स्टेनबर्गने त्याला विचारले, 'शिगारेव्ह आणि कोकोशकीन यांचा खून कोणी केला आहे यासंबंधी तुला काही माहिती आहे काय?'

स्टेनबर्गशी खरे बोलण्याचे डायबेन्को याला काहीच कारण नव्हते. तो म्हणाला, 'मी गुन्हेगारांचा तपास करतो. पण खरं सांगू का, राजकीय दहशत निर्माण करण्याशिवाय गुन्हेगारांचा या खुनामागे दुसरा कोणताही उद्देश नसावा. त्यामुळे हे असे प्रकार पुन्हा होऊ नयेत असे मी खलाश्यांना सांगतो. यापेक्षा आपण अधिक काय करू शकतो?'

राजकीय स्वार्थासाठी खुनासारखे पाशवी कृत्यही बोल्शेव्हिकांच्या दृष्टीने समर्थनीय ठरते याचा स्टेनबर्गसारखा डावा सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी प्रथमच अनुभव घेत होता.

शिंगारेव्ह आणि कोकोशकीन यांच्या खुनाबाबत चौकशी करण्यासाठी लेनिनचा चिटणीस बॉंख-ब्रुयेव्हिच, स्वत: स्टेनबर्ग आणि डायबेन्को यांची समिती नेम

ण्यात आली. खलाश्यांच्या प्रतिनिधींचाही या समितीत अंतर्भाव करण्यात आला होता. स्टेनबर्गच्या प्रयत्नामुळे या खुनाचे धागेदोरे उकलू लागले. मॅरिन्स्की रुग्णालयातील डॉक्टर, परिचारिका आणि पहारेकरी यांचे जाबजबाब घेण्यात आले. या जाबजबाबातून खुनी इसमांची नावे कळताच त्यांना न्यायासनासमोर खेचण्याचे स्टेनबर्गने ठरविले. मंत्रिमंडळाच्या बैठकीत स्टेनबर्गने त्या खलाश्यांच्या अटकेचा विषय काढताच लेनिन म्हणाला, 'बाल्टिकमधल्या खलाश्यांनी मला तार करून असं कळविले की, आम्ही सर्वांनी या प्रकरणाचा शांतपणाने विचार केला असून विरोधकामध्ये नव्या राजवटीबाबत दहशत निर्माण व्हावी यासाठीच हे खून करण्यात आल्याची आमची खात्री पटली आहे. त्यामुळे या खुनांबाबत अधिक चौकशी करण्याचं काहीच कारण नाही.

लेनिनने स्टेनबर्गला विचारले, 'अशा परिस्थितीत त्या दोन खुनी खलाश्यांना अटक करून आपण सर्व खलाश्यांना दुखविणं कितपत इष्ट ठरेल ?'

स्टेनबर्ग उत्तरला, 'आपण खुनी खलाश्यांना अटक केलीच पाहिजे. अशा प्रकारांचा आपण जर वेळीच बंदोबस्त केला नाही तर खलाश्यांची रक्ताची तहान वाढत जाईल आणि नंतर सरकारला त्याबाबत काहीच करता येणार नाही. हा धडधडीत खून आहे. नुसता राजकीय दहशतवाद नव्हे.'

स्टेनबर्गचे हे उद्‌गार ऐकताच सारेजण गप्प झाले. लेनिन आता काय बोलतो इकडे सर्वांचे लक्ष लागले होते.

लेनिन म्हणाला, 'मला नाही वाटत की सर्वसामान्य नागरिकांना या खुनाबद्दल काही आस्था आहे म्हणून. कोणत्याही शेतकऱ्याला किंवा कामगाराला विचारा त्याने शिगारेव्हचे नावसुद्धा ऐकलेले नाही असं तुम्हांला आढळून येईल.'

लेनिनच्या मंत्रिमंडळात डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचे जे मंत्री होते त्यांना लेनिनचा हा खास 'बोल्शेव्हिकी' युक्तिवाद पटणे शक्यच नव्हते. ते म्हणाले, 'गुन्हेगारांना पकडण्याचा न्यायमंत्र्याला अधिकार आहे. त्याच्या कारभारात इतर मंत्र्यांनी अडथळा आणता कामा नये. शिवाय जर एखाद्याने खून केला असेल तर त्याला शासन व्हायलाच हवे. गुन्हेगारांना पकडणे हे काही अवघड काम नव्हे.'

स्टेनबर्ग लेनिनला म्हणाला, 'या प्रकरणाबाबत मला जर संपूर्ण अधिकार देण्यात आले तर मी गुन्हेगारांचा सहज शोध करीन. मशीनगन घेतलेले लाल रक्षक माझ्याबरोबर द्या. मी खलाश्यांच्या बराकींना वेढा घालून गुन्हेगार सरकारच्या ताब्यात दिलेच पाहिजेत, अशी मागणी करतो. मशीनगन पाहिल्यानंतर खलाशी आपोआप नरम येतील.'

परंतु लेनिनने स्टेनबर्गला लालरक्षकांची मदत देण्याचे नाकारले आणि त्यामुळे गुन्हेगारांना अटक होऊ शकली नाही.

लेनिनच्या दहशतवादाचे हे भयानक स्वरूप पाहिल्यानंतर डाव्या सोशॅलिस्ट

रेव्होल्युशनरी पक्षाच्या सदस्यांना मंत्रिमंडळातून बाहेर पडण्याचे ठरविले. परंतु त्याबाबत घाई करून चालणार नव्हती. तीनआठवड्यांच्या आतच बोल्शेव्हिकांनी कोणालाही न विचारता ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे जर्मनीशी तह केला. तेव्हां डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाच्या सहनशीलतेला तडा गेला आणि स्टेनबर्ग प्रभृतींना मंत्रिमंडळात राहणे अशक्य झाले. डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाच्या मंत्र्यांनी आपल्या अधिकारपदांची त्यागपत्रे दिली.

जर्मनीबरोबर शक्य तितक्या लवकर तह करण्याचा आपला विचार असल्याचे बोल्शेव्हिकांनी सत्तेवर येण्यापूर्वीच जाहीर केले होते. चार वर्षांच्या युद्धकाळातील हालअपेष्टांमुळे रशियन जनता संत्रस्त झालेली होती. जर्मनीबरोबर रशियाने एकट्यानेच तह केला तर त्याचे कोणते आर्थिक व राजकीय परिणाम होतील याचा विचार करण्याचेही लोकांमध्ये त्राण उरलेले नव्हते. आपली हुकुमशाही राजवट स्थिर करण्यासाठी कसेही करून शांतता निर्माण करणे लेनिनच्या दृष्टीने आवश्यक होते. युद्ध संपताच जर्मनीत आणि जर्मनीच्या पाठोपाठ इतर पश्चिम युरोपीय देशांमध्ये कामगारक्रांती होईल, अशी लेनिनची अपेक्षा असल्यामुळे जर्मनी आज ज्या अटी पुढे करील त्या मान्य करण्यात रशियाचे काहीच नुकसान नाही असा त्याचा युक्तिवाद होता. त्यामुळे कोणत्याही अटींवर का होईना पण एकदा जर्मनीशी तह करून टाका असे लेनिनने ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे वाटाघाटीसाठी गेलेल्या आपल्या सहकाऱ्यांना सांगितले होते.

जर्मनीशी शांतता करारावाबत वाटाघाटी करण्यासाठी नोव्हेंबरच्या अखेरीस सोव्हिएट शिष्टमंडळ ब्रेस्ट लिटोव्हस्कला रवाना झाले. या शिष्टमंडळाचे नेतृत्व ट्रॉटस्की आणि जोफ यांच्याकडे होते. २७ डिसेंबर रोजी या वाटाघाटीचा वृत्तांत देताना पेट्रोग्राडमधल्या वृत्तपत्राने असे म्हटले होते की महायुद्धात जिंकलेला प्रदेश कायमचा कबज्यात ठेवण्याची किंवा कोणत्याही राष्ट्राच्या स्वातंत्र्याचे अपहरण करण्याची जर्मनीची किंवा तिच्या मित्रराष्ट्रांची इच्छा नसल्याचे सोव्हिएट शिष्टमंडळाला आढळून आले आहे.

परंतु वस्तुस्थिती तशी नव्हती.

कोणताही परकीय प्रदेश न बळकाविता किंवा नुकसानभरपाई न मागता जर्मनी सर्वांशी शांतता करार करण्यास तयार आहे याचा आपल्या दृष्टीने नेमका अर्थ कोणता आहे याचा जर्मन नेत्यांनी केलेला खुलासा बोलशेव्हिक पत्रांनी प्रसिद्ध केलेला नव्हता. प्रशियन लोकसभेचा सदस्य शेफर म्हणाला होता, ‘आपल्या वर्चस्वाबद्दल जर हिंदुस्थानात सार्वमत घेण्याची ब्रिटनची तयारी असेल तर आम्हीही व्हिल्ना आणि ग्रोडनो येथील जनतेचे सार्वमत घेऊ.. त्याचप्रमाणे इजिप्त आणि आयर्लंड यांना स्वयंनिर्णयाचा अधिकार देण्याची ब्रिटनने तयारी दर्शविली तर

जर्मनीने जिंकलेल्या बाल्टिक राष्ट्रांनाही तो अधिकार दिला जाईल.'

शेफरच्या वक्तव्यावरून जर्मनीची भूमिका स्पष्ट झाली होती. रशियाला कोणतीही खास सवलत द्यायची तिची तयारी नव्हती. परंतु बोल्शेव्हिक नेत्यांनी प्रारंभी जर्मनीची ही भूमिका आपल्या देशबांधवांपासून मुद्दाम लपवून ठेवली. आपण आपल्या पक्षीय स्वार्थासाठी जर्मनीपुढे शरणागती स्वीकारायला तयार झालो आहोत ही गोष्ट जर लोकांना कळली तर ते प्रक्षुब्ध होतील हे बोल्शेव्हिक नेत्यांना ठाऊक होते. म्हणून ट्रॉटस्कीने जाणूनबुजून विरोधकांवरच खोटेनाटे आरोप करावयास प्रारंभ केला. तो म्हणाला, 'जर एकदा चमत्कार होऊन सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्ष पुन्हा अधिकारावर आला तर 'बूर्ज्वा' समाजाचे रक्षण करण्यासाठी सैन्य वापरता यावे म्हणून हे लोक जर्मनीशी वाटेल त्या अटींवर तह करण्यास मागेपुढे पाहणार नाहीत.'

ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे जाण्यापूर्वी सैनिकांपुढे बोलताना ट्रॉटस्की म्हणाला होता, 'जर्मन साम्राज्यवादापुढे आम्ही मुळीच नमतं घेणार नाही. सन्माननीय अटींवर तह करण्याची जर्मनीने तयारी दाखविली तरच आम्ही त्या तहावर स्वाक्षरी करू; एरवी नाही.'

बोल्शेव्हिक राजवटीला देशांतर्गत स्थैर्य प्राप्त व्हावे म्हणजे कोणत्याही अटींवर तह करण्याची रशियाची तयारी आहे हे जर्मन नेत्यांना माहीत असल्यामुळे त्यांनी ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे वाटाघाटींना प्रारंभ होताच सांगितले–' पोलंड आणि लिथुआनिया हे दोन्ही देश व युक्रेन आणि श्वेत रशिया यांचा बराचसा भाग यापुढेही आपल्याच ताब्यात राहील. त्याचप्रमाणे युद्धातील नुकसानीची भरपाई म्हणून रशियाने जर्मनीला तीनशे कोटी रुबल्स दिले पाहिजेत.'

बोल्शेव्हिक राजवटीला हव्या असलेल्या शांततेची किंमत म्हणून जर्मनी अशा काही तरी कठोर अटी घालील याची लेनिनला कल्पना होती. परंतु ब्रेस्ट लिटोव्हस्कला गेलेल्या सर्वच प्रतिनिधींना याची काहीच कल्पना नव्हती. त्यामुळे जर्मनीच्या अटी ऐकताच शिष्टमंडळातील एक प्रतिनिधी जनरल रूकालोन याने तेथल्या तेथेच आत्महत्या केली तर प्रा. पोक्रोव्हस्की या प्रतिनिधीच्या डोळ्यांत अश्रू तरारले. त्याने ट्रॉटस्कीला विचारले, 'आपण जर एवढा मोठा प्रदेश जर्मनीच्या ताब्यात देणार असू तर मग आपण तिच्याशी सन्माननीय अटींवर तह केला असं कसं म्हणता येईल ?'

ट्रॉटस्की उत्तरला, 'आम्ही याचा पेट्रोग्राडला विचार करणार आहोत.' जर्मन प्रतिनिधींशी प्राथमिक बोलणी करून ट्रॉटस्की २०जानेवारी रोजी, पेट्रोग्राडला परतला. जर्मनीच्या अटींचा विचार करण्यासाठी दुसऱ्या दिवशी बोल्शेव्हिक

पक्षाच्या मध्यवर्ती समितीची बैठक भरली. लेनिन म्हणाला, 'एवढ्या मोठ्या भूभागावर पाणी सोडावं लागलं तरी हरकत नाही, पण जर्मनीशी तह केलाच पाहिजे.'

त्या वेळी लेनिनची कल्पना अशी होती की ज्याप्रमाणे रशियन सैनिक युद्धाला कंटाळले आहेत तसेच इतर राष्ट्रांचे सैनिकही कंटाळले असल्यामुळे आपण जर त्यांना आवाहन केले तर ते आपापल्या देशात रशियाच्या धर्तीवर क्रांती घडवून आणतील. येत्या काही दिवसांतच किंवा फार तर काही महिन्यांत बर्लिन, व्हिएन्ना, बूडापेस्ट, लंडन आणि पॅरिस या राजधान्यांवरही लाल ध्वज फडकू लागेल. पश्चिम युरोपमध्ये ही लष्करी क्रांती घडवून आणण्यासाठी आपल्याला प्रचाराकरिता अवधी मिळावा म्हणून साम्राज्यवादी जर्मनीच्या कोणत्याही मागणीला होकार द्यायला हरकत नाही. कारण एकदा का जर्मनीत लष्कराने समाजवादी क्रांती घडवून आणली की आजच्या या कराराला कोणताच अर्थ उरणार नाही.

लेनिनची ही विचारधारा ट्रॉटस्कीला मंजूर नव्हती. जर्मनीबरोबर युद्धही नाही आणि शांतताही नाही अशी आपण भूमिका घ्यावी असे त्याने सुचविले. या सूत्राचे स्पष्टीकरण करताना ट्रॉटस्कीने सांगितले, 'आपण जर्मनीबरोबर वाटाघाटींचा घोळ असाच चालू ठेवावा आणि आपली तयारी पूर्ण झाली की तहाच्या अटी उधळून लावून जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारावे. मधल्या काळात आपल्याला जर्मन सैनिकांमध्ये क्रांतीचा प्रचार करता येईल.'

मध्यवर्ती समितीच्या बैठकीत आणखीही एक सूचना पुढे आली. जर्मनी आणि तिची मित्रराष्ट्रे यांच्याविरुद्ध आताच 'क्रांतियुद्ध' पुकारावे असा या सूचनेचा मथितार्थ होता. अशा रीतीने मध्यवर्ती समितीत तीन विचारप्रवाह होते. त्यामुळे मतदान घेऊन निर्णय करावा असे ठरले. लेनिनच्या सूचनेला पंधरा, ट्रॉटस्कीच्या सूचनेला सोळा आणि क्रांतियुद्धाच्या सूचनेला बत्तीस मते पडली.

२४ जानेवारी रोजी मध्यवर्ती समितीची दुसरी बैठक भरली तेव्हाही जर्मनीच्या सर्व अटी आपण बिनशर्त मान्य कराव्यात या आपल्या आग्रहाचा लेनिनने पुनरुच्चार केला. तो म्हणाला, 'आपले सैनिक आता युद्धाला कंटाळले आहेत. आपल्याजवळ इतकं अपुरं घोडदळ आहे की शत्रूने आकस्मिक चढाई केली तर आपल्याला आपल्या तोफा चटकन मागेही नेता येणार नाहीत. उलटपक्षी बाल्टिकमधील बेटांवर उभं असलेलं जर्मन सैन्य इतकं सामर्थ्यसंपन्न आहे की त्याने मनात आणलं तर ते रेव्हल आणि पेट्रोग्राड सहज जिंकू शकतील. अशा परिस्थितीत युद्ध करणं म्हणजे आपण होऊन जर्मनीला आणखी बलिष्ठ केल्यासारखं होईल. तेव्हादेखील आपल्याला निमूटपणानं जर्मनी पुढे करील त्या कागदावर स्वाक्षरी करावी लागेल. जर्मनीच्या सध्याच्या अटी आपल्या दृष्टीने मानहानिकारक आहेत ही गोष्ट खरी असली तरी त्याबरोबरच आपण हेही ध्यानात ठेवलं पाहिजे की आता जर का पुन्हा युद्धाचा भडका उडाला तर त्यात बोल्शेव्हिक राजवटीची

आहुती पडेल आणि मग जर्मनीशी वाटाघाटी करण्यासाठी पेट्रोग्राडमध्ये दुसरं एखादं सरकार अस्तित्वात आलेलं असेल. आपल्याला रशियावरची पकड प्रथम घट्ट करायला हवी. त्यासाठी साहजिकच थोडासा अवधी लागणार, म्हणून म्हणतो, आपल्या राजवटीच्या अस्तित्वाची किंमत म्हणून आज जर्मनीबरोबर तह केलाच पाहिजे. मग तिच्या अटी कोणत्याही असोत.'

आपल्या भाषणाच्या शेवटी लेनिन म्हणाला, 'माझं तुम्हांला एवढंच सांगणं आहे की सध्या आपल्याला शांतता हवी आहे. आणि त्यासाठी करार करणे आवश्यक आहे. हा काही कायमचा करार नव्हे. उद्या जर्मनीत क्रांती झाली की तेथे उदयाला येणारे समाजवादी सरकार आपला प्रदेशही मागणार नाही आणि आपल्याला नुकसान-भरपाईदेखील द्यावी लागणार नाही. परंतु तोपर्यंत रशियातील बोल्शेव्हिक राजवट जिवंत तर राहिली पाहिजे ना! आणि म्हणूनच आपली सध्या एकच घोषणा हवी– 'शांतता, जर्मनीबरोबर शांतता, कोणत्याही अटीवर शांतता.'

स्टॅलिन, स्वेर्डलोव्ह, स्मिल्गा, आणि सोकोल्निकोव्ह यांनी लेनिनच्या भूमिकेचा पाठपुरावा केला. परंतु मध्यवर्ती समितीतील बहुसंख्य सभासद लेनिनच्या प्रतिपादनाशी सहमत नव्हते. क्रुपस्कायाने आपल्या आठवणीत नमूद केले आहे की 'केवळ मध्यवर्ती समितीचाच नव्हे तर पेट्रोग्राड आणि मॉस्को येथील प्रादेशिक समित्यांचाही इलिच (लेनिन) याला तीव्र विरोध होता. पेट्रोग्राडमधल्या डाव्या कम्युनिस्टांनी तर आपल्या 'कम्युनिस्ट' या साप्ताहिकातून इलिचवर हल्ले चढविण्यास प्रारंभ केला. डावे कम्युनिस्ट सांगू लागले, 'जर्मनीशी असला लाजिरवाणा तह करण्यापेक्षा आपण सत्ता सोडून दिलेली बरी. साम्राज्यवादी जर्मनीशी करार करून आपण आंतरराष्ट्रीय कामगार चळवळीशी द्रोह करणार आहोत.' इलिचच्या निकटवर्ती मित्रांचेही डाव्या कम्युनिस्टांसारखेच मत होते. ज्यांनी गेली कित्येक वर्षे इलिचबरोबर कार्य केले आणि जे अतिशय बिकट परिस्थितीतही त्याच्या पाठीशी उभे राहिले तेदेखील जर्मनीशी तह करण्याच्या त्याच्या सूचनेला विरोध करीत होते. इलिचभोवती फार मोठी पोकळी निर्माण झाली आहे असे मला त्या वेळी वाटले.'

जर्मनीच्या अटी मान्य केल्याने आपण आपल्या मूळ उद्दिष्टापासून दूर जात आहोत असे ट्रॉटस्कीप्रमाणे बुखारिन, उरिटस्की, लोमोव्ह व झेर्झिन्स्की यांचे मत होते. सर्वांनी आपापली मते व्यक्त केल्यानंतर मतदान घेण्यात आले. त्या वेळी लेनिनच्या बाजूने सात व ट्रॉटस्कीच्या बाजूने नऊ मते पडली. अशा रीतीने युद्ध चालू ठेवायचे नाही आणि तहही करायचा नाही ही ट्रॉटस्कीची सूचना मध्यवर्ती समितीने मंजूर केली.

शांतता-कराराबाबत रशिया दिरंगाईचे धोरण स्वीकारीत आहे हे आढळून

येताच जर्मन सेनानी जनरल हॉफमान याने १६ फेब्रुवारीला सोव्हिएट सरकारला खलिता पाठवून 'तहावर स्वाक्षरी करा; नाही तर युद्धाला तयार राहा असा' निर्वाणीचा इशारा दिला. जर्मनीचा हा खलिता मिळताच दुसऱ्या दिवशी मध्यवर्ती समितीची आणखी एक बैठक भरली. जर्मनीच्या अटी मान्य करून युद्ध टाळावे हे आपले मत अद्यापही कायम असल्याचे लेनिन, स्टॅलिन, स्वेर्डलोव्ह, स्मिल्गा आणि सोकोल्निकोव्ह या पाच सदस्यांनी सांगितले. ट्रॉटस्की, बुखारिन, लोमोव्ह, उरिटस्की, जोफ आणि क्रेटिन्स्की या सहा सदस्यांनी विरोधी मत नोंदविले. शेवटी जर्मनीशी तावडतोब करार करायचा की तिच्या नव्या आक्रमणाची वाट पाहायची असे जेव्हा विचारण्यात आले तेव्हा जर्मनीच्या हालचालींचे स्वरूप कळेपर्यंत थांबावे असे ठरले. चार वर्षांच्या युद्धामुळे थकलेले जर्मन सैनिक नव्या लढाईला तयार होणार नाहीत असा लेनिनचा कयास होता.

परंतु हा अंदाज साफ खोटा ठरला.

जर्मन सेना लढाईची तयारी करू लागली होती. त्यामुळे १८ फेब्रुवारीला मध्यवर्ती समितीची तातडीची बैठक बोलावण्यात आली. लेनिनचा आग्रह कायम होता. तो म्हणाला, 'आता चर्चा करण्यात वेळ घालवायला नको. जर्मनीबरोबर तावडतोब तह करून आपण मोकळं व्हावं हे चांगलं.'

या वेळीही आदल्या दिवशीसारखी सहा विरुद्ध पाच ही परिस्थिती कायम होती. एवढ्यात जर्मन सैन्याने आगेकूच सुरू केले असल्याची वातमी येऊन पोचली. लेनिन म्हणाला, 'आता तरी माझं ऐका. रशियाचा काही भूभाग शत्रूला देऊन टाकला तर काय बिघडतं हे काही मला समजू शकत नाही.'

बोल्शेव्हिक सत्ता स्थिर करणे हीच लेनिनची एकमेव व्यग्रता होती.

तो म्हणाला, 'रशियातले बोल्शेव्हिक सरकार नष्ट करा अशी जर जर्मनीने मागणी केली तरच आपण तिच्याशी लढू. ही एक मागणी सोडली तर जर्मनीच्या इतर साऱ्या मागण्या मंजूर करायला माझी तयारी आहे. जर्मनीच्या अटी मान्य केल्या तर लिव्होनिया आणि एस्टोनिया तिच्या ताब्यात जातील अशी आता कुणीशी तक्रार केली. हे प्रदेश देऊन जर बोल्शेव्हिक सरकार सुरक्षित राहणार असेल तर आपण मुकाट्याने हे प्रदेश सोडून द्यावेत. रशियानं आपलं सैन्य फिनलंडमधून हलविलं पाहिजे अशी जर जर्मनीनं मागणी केली तर तीदेखील आपण मंजूर करावी. फिनलंड, लिव्होनिया आणि एस्टोनिया यांच्यावर उदक सोडून आपण क्रांतीचे रक्षण करू या. जर्मनीनं सांगितलेल्या अटी मान्य करा असं माझं आग्रहाचं सांगणं आहे, ते यासाठीच.'

या बैठकीला मध्यवर्ती समितीचे तेरा सदस्य हजर होते. लेनिनचे भाषण आटोपल्यानंतर पुन्हा एकदा मतदान घेण्यात आले. लेनिनची सूचना सात विरुद्ध सहा

मतांनी मंजूर झाली. तत्काल सोव्हिएट सरकारच्या वतीने बर्लिनला तारेने कळविण्यात आले. ' ब्रेस्ट लिटोव्हस्क येथील वाटाघाटीत तुमच्या प्रतिनिधीने सुचविलेल्या अटी आम्हांला मान्य आहेत. आपल्या इतर काही अटी असतील तर त्यांचाही विचार केला जाईल. '

सोव्हिएट सरकारच्या या तारेला २२ फेब्रुवारी रोजी जर्मनीने जे उत्तर धाडले त्यात अटींची व्याप्ती वाढविण्यात आली होती. फिनलंडसह सर्व बाल्टिक देश जर्मन नियंत्रणाखाली आले पाहिजेत या मूळ मागणीत 'स्वतंत्र युक्रेन' ला रशियाने मान्यता दिली पाहिजे अशी भर घालण्यात आली होती.

जर्मनीची ही नवी अट कळताच बोल्शेव्हिक नेते चिडले. परंतु आता या त्राग्याचा काहीही उपयोग नव्हता. बोल्शेव्हिकांशी सत्तेत भागीदारी स्वीकारलेल्या डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाचा तर प्रारंभापासूनच जर्मनीशी एकट्या रशियाने वेगळा तह करण्यास विरोध होता. जर्मनीची ही नवी अट ऐकल्यानंतर हा विरोध अधिकच उफाळून आला. ब्रिटन, फ्रान्स, अमेरिका आदी देशांची मदत घेऊन आपण जर्मनीशी मुकाबला केला पाहिजे अशी या पक्षाने मागणी केली. आपण जर जर्मनीशी पुन्हा युद्ध सुरू केले तर फ्रान्स आपल्या पाठीशी खचित उभा राहील हे डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाला माहीत होते. कारण २१ फेब्रुवारी रोजी पेट्रोग्राडमधील फ्रेंच राजदूत नोलेन्स याने ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे ट्रॉटस्कीला तार करून कळविले–' रशिया जर जर्मनीशी युद्ध पुकारणार असेल तर फ्रान्स रशियाला आर्थिक व लष्करी मदत करावयास तयार आहे. '

जर्मनीच्या नव्या अटीचा विचार करण्यासाठी बोल्शेव्हिक पक्षाच्या मध्यवर्ती समितीची तातडीची बैठक बोलावण्यात आली. ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिका यांची मदत घेऊन जर्मनीविरुद्ध युद्ध पुकारण्याच्या डाव्या सोशॅलिस्ट रेव्होल्युशनरी पक्षाच्या सूचनेबाबत मध्यवर्ती समितीत दोन गट होते. ब्रिटन फ्रान्ससारख्या साम्राज्यवादी राष्ट्रांची मदत घेणे समाजवादी सरकारला शोभत नाही असे एका गटाचे म्हणणे होते. हा आक्षेप सर्वांनाच मान्य होता. परंतु दुसऱ्या गटाचे म्हणणे असे होते की केवळ तात्त्विक भूमिकेवरून विचार करण्याचे ठरविले तर कोणताच प्रश्न सुटणार नाही. प्रत्येक प्रश्नांची व्यावहारिक बाजूही विचारात घेतली पाहिजे. ब्रिटन, फ्रान्स आदी साम्राज्यवादी राष्ट्रांची समाजवादी राजवटीने मदत घेणे तत्त्वसंमत नसले तरी समाजवादी राजवट जिवंत ठेवण्यासाठी एका साम्राज्यवादी देशाबरोबर झुंजताना दुसऱ्या साम्राज्यवादी राष्ट्राची मदत घेण्यात काहीच गैर नाही अशी दुसऱ्या गटाची कारणमीमांसा होती.

ब्रिटन-फ्रान्सकडून आपण शस्त्रास्त्रे घ्यावीत असे ट्रॉटस्की आणि सोकोलिननोव्ह यांचे मत होते. लेनिन या बैठकीला प्रारंभी हजर नव्हता. त्याने चिठ्ठी धाडून असे कळविले होते की ब्रिटन फ्रान्ससारख्या साम्राज्यवादी दरोडेखोरांकडून शस्त्रास्त्रे

आणि अन्नधान्ये यांची मदत घ्यायला काहीच हरकत नाही हे माझे मत बैठकीत नोंदविले जावे. परंतु दुसऱ्या दिवशी लेनिनने आपल्या या भूमिकेत बदल केला. तो म्हणाला, 'क्रांती करण्यासाठी सिद्ध झालेल्या सेनेने कोणाचीही मदत घेता कामा नये. रशियाने जर तशी मदत घेण्याचे ठरविले तर मी प्रधानमंत्रिपदाचा व मध्यवर्ती समितीचा राजीनामा देऊन सरकार आणि पक्ष यांच्याविरुद्ध नवी चळवळ हाती घेईन. समाजवादी क्रांतियुद्धासाठी सैन्याची जरुरी आहे आणि आज आपल्या जवळ तेवढे लष्करी सामर्थ्य नाही. म्हणून जर्मनीच्या अटी मान्य करण्यावाचून आपल्याला अन्य पर्याय नाही.

लेनिनचे हे उद्‌गार ऐकताच बैठकीतील वातावरण तापले. त्याचे मत बऱ्याच जणांना मान्य नव्हते. परंतु प्रधानमंत्रिपदाचा राजीनामा देण्याचे त्याचे आव्हान स्वीकारण्याची कोणाचीही तयारी नव्हती. शेवटी जर्मनीची नवी अट मान्य करायची किंवा नाही यासंबंधी मतदान घेण्यात आले. लेनिन, स्टासोव्हा, झिनोव्हेव, स्वेर्डलोव्ह, स्टॅलिन, सोकोल्निलेव्ह आणि स्मिल्गा या सात जणांनी जर्मनीची अट स्वीकारावी असे आपले मत नोंदविले तर बुसनोव्ह, उरिट्स्की, बुखारिन आणि लेमोव्ह या चौघांनी आपला विरोध कायम असल्याचे सांगितले. ट्रॉटस्की, क्रेस्टिन्स्की, झेर्झिन्स्की आणि जोफ हे चार जण तटस्थ राहिले. ट्रॉटस्की म्हणाला, 'लेनिनचा दृष्टिकोण आम्हांला बिलकुल मान्य नाही. परंतु त्याने प्रधानमंत्रिपदाचा राजीनामा द्यावा असेही आम्हांला वाटत नाही. म्हणून आम्ही तटस्थ राहण्याचं ठरविलं.

३ मार्च १९१८ रोजी ब्रेन्ट लिटोव्हस्क येथे सोव्हिएट प्रतिनिधींनी जर्मनीने पुढे केलेल्या कागद-पत्रांवर मुकाट्याने स्वाक्षऱ्या केल्या. आपला आग्रह लेनिनने खरा करून दाखविला.

लेनिनच्या या वृत्तीने रशियन आणि जागतिक क्रांतीची फार मोठी हानी झाली आहे असे बुखारिन प्रभृतींचे मत होते. त्यामुळे जर्मनीबरोबरच्या शांतता-करारावर सोव्हिएट प्रतिनिधींनी स्वाक्षऱ्या केल्याची बातमी कळताच लेनिनविरोधी गटाने मंत्रिपदांचे व पक्षातील अधिकारपदांचे राजीनामे लेनिनकडे धाडून दिले. लेनिनला त्याबद्दल किंचितही खेद वाटला नाही. उलट विरोधकांवर मात केल्याच्या समाधानात तो मशगुल होता.

६ मार्च रोजी बोल्शेव्हिक पक्ष-सदस्यांचा मेळावा भरला होता. या मेळाव्यात दोन दिवसांच्या चर्चेनंतर लेनिनच्या भूमिकेवर शिक्कामोर्तब करण्यात आले. या वेळी लेनिन किती खुशीत होता यासंबंधी मेळाव्याला हजर राहिलेला एक बोल्शेव्हिक प्रतिनिधी लिहितो–'कोटाच्या गुंड्या सोडून आणि खिशात हात घालून लेनिन इकडे-तिकडे हिंडत होता. त्याच्या चेहऱ्यावरून आनंद उतू जात होता. एखादा प्रतिनिधी विरोधी मत मांडू लागला की लेनिन अधिक खूष होई. त्यातून

त्या विरोधकाने आपले म्हणणे तावा-तावाने मांडावयास प्रारंभ केला की लेनिन मोठ्याने हसू लाग. या विरोधाला आता काहीही अर्थ उरलेला नाही असा उपहासाचा ध्वनी त्या हास्यात अंतर्भूत होता. आपण राजीनामा देण्याची धमकी देताच सारेजण कसे गप्प बसले हा अनुभव लेनिनच्या महत्त्वाकांक्षी मनाला सुखवीत होता.

दुसऱ्या दिवशी लेनिनने या मेळाव्यापुढे प्रदीर्घ भाषण करून विरोधकांचा खरपूस समाचार घेतला. प्रतिनिधींना उद्देशून तो म्हणाला, ' माझे टीकाकार तुम्हांला सांगतात की नामुष्की पत्करून मी शांतता खरेदी करीत आहे. होय, त्यांचं म्हणणं खरं आहे. ते सांगतात की वेळ पडली तर मी पेट्रोग्राड सोडीन, मॉस्को सोडीन. होय, त्यांचं तेही म्हणणं खरं आहे. मी व्होल्गापर्यंत माघार घेईन किंवा त्याहूनही विकट प्रसंग आला तर व्होल्गाच्या पलीकडे थेट एकाटेरिनबर्गपर्यंत मागे जाईन. काय वाटेल ते करीन, पण क्रांती वाचवीन. तुमची इच्छा काय आहे ते मला एकदा कळू द्या.

' आम्ही जर्मनीशी केलेला करार लाजिरवाणा आहे अशी टीका करणाऱ्यांना मला असं विचारायचं आहे की टिलसिट येथे अॅलेक्झांडरने नेपोलियनशी केलेला करार काय कमी लाजिरवाणा होता ! परंतु थोड्याच दिवसांनंतर इतर करारांसारखीच त्या कराराची गत झाली ना? राष्ट्राराष्ट्रामधला कोणताच करार शेवटपर्यंत पाळला जात नाही असाच इतिहासाचा दाखला आहे. आज आपण माघार घेत आहोत ही गोष्ट खरी आहे. पण चढाईप्रमाणेच माघार घेतानाही शौर्याची गरज असतेच ना ; जगातील कामगारवर्गाने आमच्या मदतीला यावं अशी माझी अपेक्षा आहे. तसं झालं की जागतिक समाजवादी क्रांतीला प्रारंभ झालाच म्हणून समजा. आता होणारी क्रांती जागतिक स्वरूपाचीच असेल याबद्दल मला शंका नाही.

' अर्थात ही क्रांती लवकर होणार आहे या भ्रमात मी नाही. निकोलस आणि रासपुटीन यांच्या भूमीत क्रांती घडवून आणणं सोपं होतं. परंतु जेथे भांडवलशाही प्रगत झाली आहे आणि लोकशाही रुजली आहे अशा देशांत चटकन क्रांती होईल असं मानणं हास्यास्पद ठरेल. जागतिक समाजवादी क्रांतीचा शुभारंभ होण्यापूर्वीच्या अवघड कालखंडातून आपण सध्या वाटचाल करीत आहोत. म्हणून या वेदना ही मानहानी– सारं काही मुकाट्यानं सोसलं पाहिजे. '

लेनिनच्या भाषणानंतर मेळाव्याचा सूरच बदलून गेला. ब्रेस्ट लिटोव्हस्कच्या कराराला मान्यता देणारा ठराव ७८४ विरुद्ध २६१ मतांनी संमत झाला.

ब्रेस्ट लिटोव्हस्क येथे करण्यात आलेल्या कराराचे स्वरूप रशियाच्या दृष्टीने उपमर्दकारक आहे याची लेनिनला चांगली जाणीव होती. परंतु तो करार पाळा-

वयाचा नसल्यामुळे त्याचा गंभीर विचार करण्याची त्याला गरज वाटत नव्हती. या कराराकडे पाहण्याची लेनिनची दृष्टी अशी होती. यासंबंधीची आठवण त्सासोव्हाने लिहून ठेवली आहे. ती लिहिते– ' कराराचा मसुदा घेऊन काराखान ब्रेस्ट लिटोव्हस्कहून पेट्रोग्राडला आला. लेनिनने तो वाचावा अशी त्याची इच्छा होती. परंतु लेनिन एकदम उसळून म्हणाला, ' या कागदावर कुठे स्वाक्षरी करावयाची आहे तेवढं मला सांग. मी हा करार वाचणार नाही आणि पाळणार नाही.'

या कराराने आपला पंचवीस टक्के प्रदेश आणि जवळ जवळ निम्मी लोकसंख्या रशिया गमावणार होता. परंतु लेनिनला त्याची यत्किंचितही फिकीर नव्हती. हा करार पाळण्याची आपल्यावर पाळी येणार नाही याबद्दल तो निश्चित होता.

आणि झालेही तसेच. ब्रेस्ट लिटोव्हस्कच्या करारानंतर सहा-सात महिन्यांच्या आतच ब्रिटन, फ्रान्स आणि अमेरिका यांच्या एकत्रित सामर्थ्यापुढे जर्मनीस शरणागती स्वीकारावी लागली आणि हाती आलेला रशियाचा सारा प्रदेश तसाच सोडून देणे भाग पडले.

जर्मनीचा पराभव झाल्यामुळे लेनिनची एक मोठी डोकेदुखी दूर झाली. सत्तेवरची पकड घट्ट करण्यासाठी त्याला आता भरपूर सवड मिळणार होती.

(क्रमशः)

## आंतरराष्ट्रीय अर्थकारण

मद्रासला नुकत्याच झालेल्या अर्थशास्त्रज्ञांच्या मेळाव्यासाठी आलेल्या परदेशी तज्ज्ञांपैकी डॉ. बेनिटो लगार्डा यांनी ' आशियाची आर्थिक एकता ' या विषयावर काही सखोल विचार मांडले. आशियाई देशांनी उत्पादनाच्या व विक्रीच्या क्षेत्रात एकमेकांशी आर्थिक सहकार्य केले पाहिजे, परंतु त्यात अधिक प्रगत देश लहान देशावर आर्थिक वर्चस्व चालविण्याची शक्यताही आहे. या सबंध प्रदेशाचा विकास साधण्यासाठी सगळ्यांनी एकत्र येण्याच्या आधी लहान प्रमाणावर परंतु आंतरराष्ट्रीय स्वरूपाचा प्रयत्न करून पाहणे अधिक वास्तववादी ठरेल. आशियाखंड हा एक भू-प्रदेश समजला जात असला तरी या प्रसंगातील जनतेत मूलभूत एकता असेलच असे नाही. तेव्हा सबंध आशिया एकत्र आणण्याचा प्रयत्न करण्यापेक्षा लहान प्रमाणावर गट-योजना करणे अधिक वास्तववादी ठरेल.




# आम्ही हरलो, आम्ही जिंकलो !

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या ॲडिलेड आणि मेलबोर्न येथील पहिल्या दोन कसोटी सामन्यांत भारतीय क्रिकेट संघाने सणसणीत मार खाल्ला. केंद्रीय शिक्षणमंत्री डॉ. त्रिगुण सेन यांनी त्यापूर्वीच एक झणझणीत इशारा देऊन यापुढे आवश्यक तो दर्जा नसल्यास आंतरराष्ट्रीय क्रीडा-स्पर्धांत भारतीय संघांनी भाग घ्यावा की नाही याचा गंभीर विचार करावयास लागेल असे सांगितले. पण भारतीय क्रिकेट-समीक्षक आणि क्रिकेट-रसिक डॉ. सेन यांच्या उद्‌गारांना दाद द्यावयास तयार नाहीत. ते फार म्हणजे फारच आशावादी आहेत. आता पुढचा कसोटी सामना केव्हा येईल, मग त्या वेळी आपले खेळाडू कसे चमकतील, याची रात्रंदिवस चर्चा करताना ते आढळतील. चारपैकी एक कसोटी सामना जरी आम्ही जिंकला तरी पुरे आहे असे ते म्हणतील आणि प्रत्येक कसोटी सामन्यात आमचे पितळ उघडे पडत चालले तरी क्रिकेटशौकिन त्यातली चांगली तेवढीच बाजू उचलत राहतील.

चंदू बोडर्यांचे सर्वसमावेशक नेतृत्व त्यांना दिसेल, रुसी सुरतींचा अष्टपैलू खेळ त्यांना आवडेल. अबीद-अल्लींची छानदार गोलंदाजी त्यांना मनपसंत वाटेल. इंजिनियर–वाडेकर यांच्या फलंदाजीतला नोकझोक त्यांना आकर्षित करेल, पतौडी विरुद्ध ऑस्ट्रेलिया असे उद्‌गार ते काढतील, प्रसन्नांचे ऑफ्ब्रेक्स त्यांना वेडे करतील. सारे सारे काही होईल ! परंतु भारतीय क्रिकेटमधील किंबहुना भारतीय खेळातील मूलभूत दोष

मनोहर रेगे

काय आहेत याचा बारकाईने विचार करून त्यावर रामबाण उपाय शोधण्याच्या दृष्टीने ते कधीही प्रयत्न करणार नाहीत. नेत्याने संघातील खेळाडूंची मानसिक घडण जाणून त्यांना एकत्र आणावे आणि सलोख्याने वागवावे असे आमच्या भारतीय क्रिकेट कंट्रोल बोर्डाला कधी वाटणार नाही. आघाडीला शतक फडकावणारा फलंदाज क्षेत्ररक्षणात पाच झेल सोडणार आहे आणि पोट सावरीत पळणार आहे ही त्यांची लंगडी बाजू ते कधी विचारात घेणार नाहीत. अमुक नेता असेल तर आमचे सहकार्य मिळणार नाही अशा संकुचित भावनेने खेळणाऱ्या फलंदाजांच्या मैदानावरील दुष्कृत्याबद्दल बोर्ड त्याला कधी शासन करणार नाही. सारांशानेच सांगावयाचे झाल्यास निवडलेले सर्व खेळाडू सांघिक भावनेने आणि समान ध्येयाने खेळतात की नाही याचा आम्ही कधीच अभ्यास करू शकत नाही. म्हणूनच भारतीय खेळाडू जेव्हा स्वत:साठी खेळतो तेव्हा तो आंतरराष्ट्रीय कीर्तीचा बनतो आणि स्वत:च्या इच्छा–आकांक्षा मारून राष्ट्रासाठी किंवा संघासाठी तो खेळू पाहतो तेव्हा त्याचे जगात हसू होते.

पण सर्व मूलभूत गोष्टींचा विचार आमचे क्रीडा-समीक्षक आणि क्रिकेट-रसिक कधीच करणार नाहीत. नुसता फुकटचा आशावाद उरी बाळगून ते भारताच्या उज्ज्वल भवितव्याचे स्वप्न मनात रेंगाळवीत बसतील. एका नाटकातील श्रीबाबांच्या नादी लागलेल्या दाजीसाहेबांना त्या बुवाला अटक झाली तरी त्याच्यातले वाईट काही दिसत नाही. उलट त्या बुवाच्या जटेतला केसच तो पवित्र मानीत बसतो. क्रिकेटवेड्या भारताला आमचे खेळाडू कितीही निकृष्ट पातळीवर गेले तरी वाईट दिसणार नाहीत. क्रिकेट-शौकिन म्हणतच राहतील की ऑस्ट्रेलियातील चार कसोटी सामने आम्ही हरलो म्हणून काय बिघडले ? न्यूझीलंडच्या खेळपट्टीवर आम्ही एक तरी कसोटी सामना जिंकूच जिंकू.

— — —

# स्वतंत्र अस्तित्व

— — —

मनमाडच्या कबड्डी स्पर्धेच्या बक्षीस-समारंभाच्या आरंभी अखिल भारतीय कबड्डी महामंडळाचे चिटणीस श्री. शंकरराव तथा बुवा साळवी यांचे प्रास्ताविक भाषण झाले त्यात ते म्हणाले, "केवळ येथील देवस्थाने आणि सृष्टिसौंदर्य पाहण्यासाठी खेळाडूंनी वेळ घालवू नये तर खेळावर लक्ष केंद्रित करावे. कबड्डी संघटना महत्त्वाची आहे. तेव्हा भिंतीवर डोके आपटून घेण्याचा त्यांनी प्रयत्न करू नये." या उद्गारांचा संदर्भ मला लागला तो असा: एक संघ वेळेवर आला नाही म्हणून श्री. साळवींनी तो बाद ठरवला. लगेच घावगळ सुरू झाली. महाराष्ट्र राज्य

कबड्डी संस्थेच्या पदाधिकाऱ्यांनी त्या संघाला माफीपत्र लिहून द्या असे सांगितले. आम्ही तोंडी दिलगिरी व्यक्त करण्यास तयार आहोत असे त्या संघाच्या चिटणिसांनी वारंवार सांगितले. पण संघटनेच्या कार्यकारी सदस्यांनी दाद दिली नाही. शेवटी औपचारिक चार ओळी लिहून दिल्यानंतर तो वाद मिटला.

ज्या संघाने तीन वेळा नाव पुकारूनही आपली हजेरी दर्शविली नाही ते खरोखरीच दोषाला पात्र आणि संस्थेच्या निर्णयाला बांधील होते. पंचाचा निर्णय संघटनेने मानला ही गोष्ट चांगली झाली. नंतर प्रकरण निवळून दिलगिरीवजा चार ओळी लिहिल्यानंतर वादावर पडदा पडला. हाही एक चांगला शेवट झाला असे म्हटले पाहिजे. परंतु चिटणीस साळवींच्या उद्गारांचे काय ? त्यातील आशयाकडेच मी आता वळतो.

खेळाडूंनी खेळावर लक्ष केंद्रित करावे, सतत शिकत राहून वैयक्तिक कौशल्य वाढवीत राहावे आणि संघभावनेने खेळून आपल्या संघाचे, प्रांताचे किंवा देशाचे नाव उज्ज्वल करावे हे एकदम मान्य. खेळाडूंना विविध ठिकाणांहून एकत्र आणून उभे करणे आणि त्यांना खेळापुरते जगविणे हे संघटनेचे महत्त्वाचे कार्य असते. त्याबद्दल दुमत होण्याचे कारणच नाही. पण खेळाडू काही संघटनेचे गुलाम नसतात. त्यांच्या स्वातंत्र्याला तुम्ही काही प्रमाणात मर्यादा घालू शकता हे खरे. तथापि त्यांच्या प्रत्येक हालचालीवर हाती सत्ता आहे म्हणून तुम्ही नियंत्रण आणू पाहाल तर ते खेळाडूंना मान्य होणार नाही. साळवींनी कृपया याची नोंद घ्यावी.

दुसरे असे की प्रेक्षक क्रीडांगणावर येतो ते खेळाडूंचे क्रीडाकौशल्य अनुभवण्यासाठी. कोण कसा दिसतो, कोण कसा हालतो आणि सामन्याचा एकंदर नूर काय आहे किंवा निर्णय काय लागणार आहे याच्या पलीकडे त्याची बौद्धिक मजल जात नसते. निरीक्षक फार तर संघटनेच्या कार्यकर्त्यांकडे लक्ष ठेवतील. म्हणूनच महाराष्ट्र किंवा अखिल भारतीय कबड्डी संस्थांच्या कार्यकर्त्यांनीदेखील खेळाडूंचे स्वतंत्र अस्तित्व काही प्रमाणात मानले पाहिजे. त्यांना लगाम घालून तुम्ही ऊठसूट जर त्यांना झोडपत बसलात तर खेळ सुधारण्याऐवजी तो अधोगती मार्गावर घसरत जाईल.

महाराष्ट्र राज्य कबड्डी संस्थेत जिल्ह्यांना किंवा खेळाडूंना काय प्रतिनिधित्व आहे, याचा श्रीयुत साळवींनी एकदा जाहीर खुलासा केला तर बरे होईल. तसे त्यांना योग्य प्रतिनिधित्व दिले जात नसेल तर ते आजच देणे योग्य ठरेल. कार्यकर्ते आणि खेळाडू यांच्या संघटित प्रयत्नानेच खेळांचा विकास होणार आहे. प्रत्येक खेळाचे खेळाडू, पंच, कार्यकर्ते, प्रेक्षक, गुणलेखक, निरीक्षक आणि इतर हितचिंतक हे महत्त्वाचे घटक असतात. केवळ हाती सत्ता आहे म्हणून खेळाडू, पंच आणि प्रेक्षकांना तुम्ही दमदाटी करू लागलात, तर कबड्डी आंतरराष्ट्रीय होईल पण त्यामागे या तीनही घटकांचे नैतिक सहकार्य तुम्हांला कधीच लाभणार नाही. सर्वांनीच आता आत्मनिरीक्षण करावे. त्यात लेखक स्वतःसुद्धा आहेत याची मला जाणीव आहे. ○

# भिंतीच्या तुंबड्या

सुधाकर राजे

## □ भुंकण्याचा जन्मसिद्ध हक्क

फ्रान्समधील एका गावातील नगरपालिकेच्या अध्यक्षाने असा हुकुमनामा काढला आहे की गावात गोंगाट फार आहे, सबब कुत्र्या-मांजरांना ओरडण्याची बंदी करण्यात येत आहे, तेव्हा त्यांच्या मालकांनी त्यांच्या मुसक्या बांधून ठेवाव्यात. कमाल आहे! ज्या कुत्र्याच्या जिण्यात भुंकण्याला स्थान नाही त्याच्या जिण्यात अन् कारकुनाच्या मुकाट जिण्यात फरक तो काय राहिला? अन् मांजराने म्याँव नाही करायचे तर काय कुत्र्याने करायचे? माझ्या मते प्रस्तुत नगरपालिकाध्यक्षाने काही जालीम उपाय योजले तर कुत्र्या-मांजरांच्या मुसक्या न बांधताच त्यांच्या गावात शांतता नांदेल.

पहिला उपाय म्हणजे त्याने भाषण-बंदी करावी. हिंदुस्थानात तरी राजकीय नेते मंडळी रात्रंदिवस जेवढा गोंगाट करीत असतात तेवढा इतर कोठलेही जनावर करीत नाही याची खात्री करायला कोठलेही वर्तमानपत्र, कोठल्याही दिवशी, कोठल्याही पानावर उघडले तरी पुरे होईल. दुसरा उपाय म्हणजे गिरणीकामगारांना संप करण्याची सक्ती करण्यात यावी, गिरण्या बंद म्हणजे यंत्रांचा खडखडाट बंद—म्हणजे शांतता. हिंदुस्थानात शब्दार्थाने शांतता प्रस्थापित करण्यासाठीच आपली शांतता-प्रेमी कामगार मंडळी संप, घेराओ, मोर्चा इत्यादी नव्या-जुन्या उपायांची शर्थ करीत आहेत. अन् शेवटचा अत्यंत जालीम पण तितकाच यशस्वी उपाय म्हणजे दुष्काळ. हुकमी दुष्काळ पाडण्याचे भारतीय कसब ज्याला साधले त्याच्या गावात स्मशान-शांततेला तोटा नाही.

## □ सूक्ष्म दृष्टीला दिसणारा देश

फक्त भारतीय राज्यकर्त्यांनाच अज्ञानांत आनंद वाटतो अशी आतापर्यंत माझी समजूत होती. पण ती चुकीची ठरली आहे. विसकॉन्सिन् नावाच्या अमेरिकन प्रांतराज्याच्या विधानसभेत "ऱ्होडेशिया देशाला स्वातंत्र्य मिळाल्याने अभिनंदन पाठवावे" असा ठराव चर्चेला निघाला तेव्हा तो बहुमताने फेटाळला गेला, कारण काही विधानसभा-सदस्य म्हणाले— "हा ऱ्होडेशिया देश कोठे आहे हे आम्हांला माहीतदेखील नाही. मग आम्ही त्यांचे अभिनंदन का करायचे?" अगदी बरोबर!

काही देश पृथ्वीच्या नकाशावर शोधून काढायला तर मॅग्निफाइंग ग्लासच हवा. निदान जाड भिंगांचा चष्मा वापरल्याशिवाय ज्याचा पत्ता लागायचा नाही अशा देशांना अभिनंदन पाठविण्यात अर्थ काय ? राजकारणी माणूस सूक्ष्म दृष्टीचा असावा लागतो म्हणतात. निदान काही सूक्ष्म देश शोधून काढण्यासाठी त्याची दृष्टी सूक्ष्म हवी यात वाद नाही.

## ☐ पंक्चर न होणारा हत्ती

" ज्ञान आणि मनोरंजन " हा फॅशनेबल डबल हेतू साध्य करण्यासाठी खास मासिकच का काढावे लागते याचा अजून मला उलगडा झालेला नाही. मला वाटते रोजच्या वर्तमानपत्रांत भरपूर ज्ञान आणि मनोरंजन असते– ज्ञान बातम्यांत अन् मनोरंजन जाहिरातींत. उदाहरणार्थ, परवाच एक जाहिरात वाचली की म्हैसूर सरकारतर्फे हत्तींचा लिलाव होणार आहे. आता बोला नव्हे, बोली करा ! अस्मादिकांची सायकल हल्ली नहमी नेहमी पंक्चर होते, तेव्हा ती टाकून देऊन हपिसांत जाण्यासाठी एखादा हत्ती स्वप्नात घेऊन टाकावा काय; याचा विचार करायला आता हरकत नाही. म्हणजे खर्डेघाशाच्या घराशी गजान्त-लक्ष्मी झुलली नाही तरी त्याच्या हपिसाशी सर्वांत पुढे साहेबाची मोटार, तिच्या मागे इतरांच्या सायकली अन् सर्वांत मागे ज्युनियर-मोस्ट अस्मादिकांचा हत्ती अशी गजान्त-लक्ष्मी झुलेल. आता आजच्या रेशनिंगच्या जमान्यात या हत्तीला खायला काय घालायचे हा प्रश्न आहे खरा, पण हिंदुस्थानात माणसाचे पोट आश्वासनांनी भरते तर त्यांच्या हत्तींचे भरायला काय हरकत आहे ?

## ☐ नाजूक निढळाचा घाम

एका वर्तमानपत्रात वाचकांच्या पत्रव्यवहारात एक अजब पत्र छापून आले आहे पत्रात म्हटले आहे की एका पश्चिम जर्मन तरुणीला भारतीय तरुणाशी लग्न करण्याची इच्छा आहे. त्याचे उत्पन्न दरमहा साडतीन हजार रुपयांच्यावर असावे– गरज पडल्यास मुलगी स्वत: नोकरी करील. पाहिलेत, गरज कशाला म्हणतात याचे एवढे सापेक्ष उदाहरण क्वचितच मिळेल. हिंदुस्थानात साडेतीन हजार रुपये पगार असणाऱ्या माणसाला कशा-कशाची बरं ' गरज ' वाटत असेल ? पहिली म्हणजे मोटरगाडी दरवर्षी बदलण्याची. दुसरी म्हणजे लोणावळा-मसूरीला ' समर कॉटेज ' नावाचा बंगला बांधायची. तिसरी म्हणजे दर महिन्याच्या ऐवजी दर आठवड्याला हॉस्टेल पार्टी द्यायची. अन् चौथी म्हणजे फॅमिली-व्हेकेशनसाठी अधून-मधून युरोप-अमेरिका ट्रिप मारायची. एवढ्या अत्यावश्यक गरजा भागविण्यासाठी या गरीब बिचाऱ्या माणसाच्या बायकोला नाजूक निढळाचा घाम गाळून त्याच्या साडेतीन हजार रुपड्यांत हजार-दीड हजाराची भर घालावी लागणारच. ○

# अमरेंद्राला इंजेक्शन कोणी दिले.... [ पृष्ठ २३ वरून ]

आल्याने विनयेंद्र त्याच दिवशी संध्याकाळच्या मेलने कलकत्त्यास परत गेला.

तथापि, जुलैमध्ये विनयेंद्र पुन्हा मुंबईस आला. या खेपेस तो "सी-व्ह्यू" हॉटेलमध्ये उतरला. या हॉटेलातही त्याने तोच 'टागोर लेन' हा कलकत्त्याचा पत्ता नोंदविला. आल्यानंतर त्याने प्लेगची लस मिळविण्याकरिता भगीरथ प्रयत्न सुरू केले. हाफकिनच्या दोन नामांकित पशुवैद्यांची त्याने भेट घेतली नि आपल्या नियोजित कार्याच्या सफलतेकरिता, एक अति महत्त्वाचा दुवा म्हणून, व 'मृदंगा मुखलेपेन करोति मधुरध्वनिम्' या सर्वमान्य नियमास अनुसरून, त्याने या दोन डॉक्टरांचे हात भरभरून रकमांची लाच देऊन दाबण्याचाही प्रयत्न केला. तथापि, या वेळीही त्याच्या पदरात अपयशच पडले. मात्र यापैकी एका डॉक्टरकडून त्याने, प्लेगची लस आर्थर रोड हॉस्पिटलच्या 'संसर्गजन्य रोग-निवारक खात्याकडून' उपलब्ध होऊ शकते, इतकी माहिती मिळविली.

या माहितीच्या आधाराने विनयेंद्राने आर्थर रोड हॉस्पिटलच्या डॉ. पटेलांची गाठ घेतली आणि डॉ. तारानाथांना आपल्या प्रयोगशाळेत प्लेगावर संशोधन करू देण्याबद्दल त्यांनी डॉ. पटेलांचे मन वळविण्याचा प्रयत्न केला. यांत मात्र विनयेंद्राला यश मिळाले. परिणामी डॉ. पटेल यांनी आपले दुय्यम डॉ. मेहेता यांच्याशी डॉ. तारानाथांची ओळख करून दिली. डॉ. मेहेतांच्या सहकार्याने हाफकिनमधून प्लेगचे जिवंत जंतू असलेली लस मिळविण्यात डॉ. तारानाथांना सुदैवाने यश मिळाले.

डॉ. तारानाथ ७ जुलै १९३३ रोजी मुंबईस आले होते. तथापि, त्यानंतर पाचच दिवसांनी ते कलकत्त्यास परत गेले. ते डॉ. पटेलांच्या प्रयोगशाळेत उंदरांवर प्लेग-संबंधात करीत असलेले प्रयोग अपुरेच राहिले होते. आपण काही तातडीच्या महत्त्वाच्या कामाकरिता कलकत्त्यास परत जात असून त्वरित परत येऊ, असेही डॉ. तारानाथांनी डॉ. मेहेता यांना कलकत्त्यास जाण्यापूर्वी सांगितले. तसेच, प्रयोगशाळेत काम करू दिल्याबद्दल आपली कृतज्ञताही डॉ. पटेलांना कळविण्याबद्दल त्यांनी डॉ. मेहेतांना विनंती केली.

## सर्व नाटक

तथापि, डॉ. तारानाथ काय किंवा विनयेंद्र काय, दोघांनाही मुंबईस परत येण्याचे आता कारणच काय होते? ज्या 'अति महत्त्वाच्या' विशिष्ट हेतूने ते मुंबईस आले होते तो विनासायास साध्य झाला नव्हता काय? मग त्यांनी परत मुंबईस काय म्हणून यावे? डॉ. तारानाथांना प्लेगवर खरोखरच संशोधन करायचे होते काय? त्यांनी प्लेगवर खरोखरच संशोधन करून उपाय शोधून काढला होता काय? आणि त्यांना खरोखरच प्लेगवर उपाय शोधून काढून मानवतेवर मोठा उपकारच करायचा होता, तर या कार्याशी सुतराम संबंध नसलेल्या विनयेंद्रासारख्या

माणसाच्या साथ-संगतीची त्यांना आवश्यकता का वाटावी ? आणि विनयेंद्राची तरी प्लेगची लस भगीरथ प्रयत्न करून मिळविण्याची एवढी धडपड कशाकरिता होती ? कलकत्त्यासारख्या दूरच्या ठिकाणाहून मुद्दाम मुंबईस येऊन, खोटे नाटे पत्ते देऊन हाफकिनशी संबंध असलेल्या वेगवेगळ्या डॉक्टर्सशी संपर्क साधण्यात त्याचा शुद्ध हेतू होता की काय? छे ! छे ! हे सर्व नाटक होते !

कलकत्त्याच्या डेप्युटी पोलीस कमिशनरनी पुऱ्या केलेल्या चौकशीच्या आधारावर सज्जड पुराव्यानिशी, विनयेंद्र नि डॉ. तारानाथ यांची धरपकड होऊन त्यांच्यावर अमरेंद्राच्या खुनाचा आरोप ठेवण्यात आला. त्यांच्याबरोबर आणखीही त्यांच्या दोघा साथीदारांवर हाच आरोप ठेवण्यात आला.

## ज्युरींचा निर्णय

हा खटला कलकत्त्याच्या सेशन्स जज्जासमोर ज्यूरींच्या सहकार्याने सुरू झाला. अमरेंद्राचा खून करण्याचा कट विनयेंद्र नि डॉ. तारानाथ यांनी केला होता नि त्या नुसार दोन सहकाऱ्यांच्या मदतीने त्यांनी अमरेंद्राचा खून केला. एका अज्ञान व्यक्तीच्या सहकार्याने २६ नोव्हेंबर १९३३ रोजी, संध्याकाळी, हावरा स्टेशनवर, तुफान गर्दीचे निमित्त साधून, अमरेंद्राच्या दंडात इंजेक्शनच्या सुईने जहरी जंतू असलेली प्लेगची लस सफाईदारपणे टोचण्यात आली नि त्यामुळेच अमरेंद्राचा मृत्यू झाला, हे सर्व सिद्ध होण्यास अडचण पडली नाही. 'विनयेंद्र आणि डॉ. तारानाथ यांनीच अमरेंद्राचा खून केला' असा ज्यूरींनी एकमताने निर्णय दिला. सेशन्स जज्जही या मताशी सहमत होते.

विनयेंद्र आणि डॉ. तारानाथ यांना फाशीची शिक्षा सुनावण्यात आली.

तथापि, सेशन्स जज्ज नि ज्यूरी यांचा निर्णय वरीलप्रमाणे होता तरी बलवत्तर दैव मात्र विनयेंद्राच्या नि तारानाथांच्या बाजूचेच असावे ! कसे ?

आपल्या फाशीच्या शिक्षेविरुद्ध तारानाथ आणि विनयेंद्र यांनी हायकोर्टाकडे अपील करून दाद मागितली. न्यायमूर्ती विल्यम्स् आणि न्यायमूर्ती नसीम अल्ली यांच्या पुढे ही सुनावणी सुरू झाली. कलकत्त्यातील सर्व जनतेची उत्सुकता या खटल्यामुळे उफाळून आली होती. एन्. के. बसू या नाणावलेल्या बॅरिस्टरनी विनयेंद्र नि तारानाथ यांचे वकीलपत्र घेतले. त्यांना आठ तज्ञ वकिलांचीही मदत होती. शासनातर्फे बंगालचे अॅडव्होकेट-जनरल कोर्टात उभे राहिले. सेशन्स जज्जांच्या निर्णयावर दोन महत्त्वाच्या मुद्द्यांवर प्रहार करण्यात आले. एक म्हणजे सेशन्स जज्जांनी ज्यूरीची दिशाभूल केली आणि दुसरे म्हणजे कायद्याने निषिद्ध असलेला पुरावा सेशन्स जज्जांपुढे सादर करण्यात आला आणि सेशन्स जज्जांनीही त्यावर विश्वास ठेवण्यात घोडचूक केली.

न्यायमूर्ती विल्यम्स् आणि न्यायमूर्ती नसीम अल्ली यांनी हे दोन्ही मुद्दे धुडकावून लावले आणि प्लेगच्या जहरी इंजेक्शनमुळेच अमरेंद्राचा मृत्यू झाला असा

सेशन्स जज्जांचा निर्णय कायम केला. कोणा अज्ञात व्यक्तीच्या मार्फत हे कृत्य उरकण्यात आले, हेही मत मान्य करण्यात आले. न्यायमूर्ती नसीम अल्लींचे यावरचे भाष्य फारच उद्‌बोधक नि मनोरंजकही आहे.

ते नमूद करतात: " अमरेंद्राच्या रक्तात फार भयंकर नि विषारी असे प्लेगचे जंतू टोचण्यात आले नि त्यानेच तो मेला असे सबळ पुराव्यानिशी सिद्ध झाले आहे, याबद्दल माझी बालंबाल खात्री पटली आहे. तथापि हे प्लेगचे इंजेक्शन कुठून नि कसे उपलब्ध होऊ शकले ? याकरिता सादर करण्यात आलेला पुरावा विचारात घेतला पाहिज.

(१) सबंध भारतात मुंबईची ' हाफकिन ' हे एकमेव वैद्यकीय संशोधनकेंद्र आहे की जिच्या मार्फत, जून १८९६ पासून, प्लेगवर नि तत्सम रोगांवर आणि विविध प्रकारच्या लसींवर अहोरात्र संशोधन चालू आहे.

(२) योग्य त्या अधिकाऱ्यांनी अनुमती दिली तर हाफकिन शासकीय आणि तत्सम संशोधन प्रयोगशाळांना या लसींचा पुरवठा करू शकते.

(३) खाजगी संस्थांना आणि व्यक्तींना अशी प्लेगची लस हाफकिन कधीही देत नाही.

(४) हाफकिनने १९३२ मध्ये कलकत्त्याच्या डॉ. उकीलना प्लेगची लस संशोधनाकरिता पुरविली होती. तथापि, ही लस प्रयोगानंतर पूर्णपणे नष्ट करण्यात आली होती.

(५) १९३३ च्या जानेवारी नि फेब्रुवारी महिन्यांत हाफकिनने कलकत्त्याच्या " स्कूल ऑफ ट्रॉपिकल मेडिसिन " या संशोधन केंद्राला प्लेगच्या लसीच्या चार बाटल्या दिल्या होत्या. यांपैकी तीन सीलबंद बाटल्या २ ऑक्टोबर १९३४ पर्यंत जशाच्या तशा अवस्थेत नीट टिकल्या होत्या. आरोपी डॉ. तारानाथ यांना प्लेगची लस कलकत्त्यात उपलब्ध होऊ शकली नाही नि त्याकरिता त्यांना मुंबईस धाव घ्यावी लागली. मुंबईत आल्यावर डॉ. तारानाथांना जी प्लेगची लस गवसली तीत प्लेगचे जिवंत जंतू होते. उपलब्ध पुराव्यावरून हे सिद्ध झाले आहे की, ऑर्थररोड हॉस्पिटलच्या अधिकाऱ्यांच्या अनुमतीशिवाय नि त्यांच्या अपरोक्ष ही लस लंपास करण्यासाठी त्यांनी अत्यंत वाममार्गांचा अवलंब केला होता नि लस घेऊन ते कलकत्त्यास परत गेले होते. जुलै १९३३ मध्ये नेलेली प्लेगची लस नि त्यातील जंतू नोव्हेंबर १९३३ पर्यंत जिवंत ठेवता येतात, असेही पुराव्याने सिद्ध झाले आहे. आणि असे करण्यात डॉ. तारानाथांना यशही आले होते. "

## कायद्याची दिरंगाई

अमरेंद्राच्या अमानुष खुनाच्या हेतूबद्दल नि भयानकतेबद्दल दोन्ही न्यायमूर्तींच्या मनांत बिलकूल संदेह उरला नव्हता. तसेच फाशीपेक्षा कोणतीही कमी शिक्षा देण्यास काहीच कारण नव्हते, याबद्दलही त्यांची खात्री झाली होती.

पण...पण काय ? कायद्याची दिरंगाई ! या सर्व प्रकरणात शासनाकरवी झालेली मनस्वी दिरंगाई हीच शेवटी विनयेंद्राच्या नि डॉ. तारानाथांच्या पथ्यावर पडली.

१६ फेब्रुवारी १९३४ रोजी विनयेंद्राला खुनाच्या आरोपावरून पकडण्यात आले. त्यानंतर थोड्याच दिवसांनी डॉ. तारानाथही बंदिस्त करण्यात आले. हायकोर्टाचा त्यांची फाशीची शिक्षा कायम केल्याचा निर्णय दोन वर्षे उलटून गेल्यानंतरही–म्हणजे १९३६ च्या जानेवारीपर्यंत–देण्यात आला नव्हता. तसेच, सेशन्स जज्जांनी त्यांना फाशीची शिक्षा सुनावल्यावरही, हायकोर्टाने त्या शिक्षेवर शिक्कामोर्तब करीपर्यंत मध्यंतरीच्या दहा महिन्यांच्या काळात, शिक्षेच्या निमित्ताने ते कोठडीतच डांबले गेले होते. या दिरंगाईमुळे, त्यांचा गुन्हा सिद्ध होऊनही, हायकोर्टाने त्यांच्या बाबतीत थोडेसे मवाळ धोरण स्वीकारून त्यांना फाशीऐवजी जन्मठेपेची शिक्षा सुनावली.

दोन्ही न्यायमूर्ती आपल्या निकाल–पत्रकात म्हणतात : " केवळ परिस्थितिजन्य पुराव्याच्या आधारावरच आरोपींचे भवितव्य अवलंबून आहे. प्रत्यक्ष असा पुरावा उपलब्ध झालेला नाही. तथापि, सर्व घटनांच्या, आरोपींच्या अमानुष हेतूंचा आणि अमरेंद्राचा प्रत्यक्ष खुनी सापडण्याच्या दृष्टीने, फाशीची शिक्षा कायम करण्याऐवजी आम्ही दोन्ही आरोपींना जन्मठेपेची शिक्षा देत आहोत ! "

तथापि, अमरेंद्राचा खरा खुनी कालांतराने सापडेल ही हायकोर्टाची आशा फोल ठरली. एक ' बुटकी, काळ्याशार वर्णाची नि खादीधारी व्यक्ती' अद्यापही अज्ञातच राहिली आहे; मध्यंतरीच्या काळात ही अज्ञात व्यक्ती मृत झालेली नसेल तर ती अजूनही कुठेतरी दडून बसलेली आहे, असे मानणे अपरिहार्य आहे.

ही ' बुटकी, काळी नि खादीधारी व्यक्ती ' आहे तरी कुठे ? तिचा पत्ता तरी काय आहे ? हावरा फलाटावर, तुफान गर्दीत, अमरेंद्राच्या उजव्या दंडात प्लेगजंतूचे इंजेक्शन देणारी ही व्यक्ती होती तरी कोण ? तिचे नाव तरी काय ? अमरेंद्राचा खरा खुनी हाच बुटका, काळा नि खादीधारी इसम असू शकेल काय ? का अमरेंद्राच्या मृत्यूनंतर ' पाकूरच्या ' प्रचंड धनदौलतीचा हाही एक वारसदार ठरला होता ? ○

[ बॅरिस्टर के. एल्. गौबा यांच्या " Famous trials for love and murder " यातील " The case of B. C. paudey " वरून ! ]

# तुमचे भविष्य आमचा अंदाज

**श्री. गो. जोशी, सायनाचार्य**

दि. २० ते २६ जानेवारी १९६८

**मेष :** या कालात अभिनव, आकर्षक आणि विधायक **कार्य** आपल्या हातून घडावे अशीच अंतरिक्षीय ग्रहांची इच्छा दिसते. या वेळची ग्रहरचनाच अशी आहे की, काहीही करा ते घवघवीत यश घेऊनच उठेल.

शैक्षणिक क्षेत्रात पात्रता वाढेल, यांत्रिक–विद्युत्–वैमानिक क्षेत्रांत अधिकारवृद्धी घडेल. आणि सामाजिक, राजकीय क्षेत्रांत प्रतिष्ठा खूपच उंचावेल. साडेसातीचे विचारही आता डोक्यातून काढून टाका. मागे राहणे, माघार घेणे हे सारे प्रकार आता आपण विसरू शकता.

दूरचा प्रवास घडेल, नवीन स्नेहसंबंध जुळून येतील. काही व्यक्तींचे विवाहही ठरू पाहतील.

रवि-हर्षल-त्रिकोण–(२० जा०) येथूनच प्रगतीचे नवे मार्ग दिसू लागतील.

**वृषभ :** सूर्य-बुध भाग्यस्थानी आणि मंगळ दशमस्थानी या साऱ्या ग्रहांचे तुम्हांला आवर्जून सांगणं आहे की, 'कोणतेही काम निष्ठेने आणि निर्धाराने करा; त्यात अपेक्षेबाहेर विजयी व्हाल.'

या वर-प्रदानाने तुमचा वर्तमानकाळ उजळून निघेल, आजवरची आपली खडतर तपस्या फळाला येईल. नोकरीधंद्यातील अत्युच्च प्रगतीचे स्थान तुमच्यासाठीच राखून ठेवलेले आहे.

कलाक्षेत्रात–वृत्तपत्रीय व्यवसायात तुमचे श्रेष्ठत्व निरपवादपणे सिद्ध होईल. हाती भरपूर पैसा येईल. स्थावराची, वाहनाची समस्या त्यामुळेच सुटेल, व्यवसाय-धंद्याला नवी दिशा लाभेल.

दि. २०, २२, २५ या दिवसांचे महत्त्व विशेषत्वाने जाणवेल.

**मिथुन :** भाग्यातील मंगळ आणि आगामी गुरु-शुक्र-त्रिकोण तुमच्या आशा-आकांक्षा पूर्णांशाने सफल करतील असा मला विश्वास वाटतो.

तुमच्या सुप्त कलाप्रवृत्तींना याच वेळी उत्थान मिळेल, नोकरीत बदली-बढतीचे योग दिसू लागतील. आणि तुमच्या ज्या आशाआकांक्षा असतील त्या बऱ्याच प्रमाणात सफल होतील.

शिक्षण, संशोधन कार्य, ग्रंथप्रकाशन या बाबतीतही यापुढे मिथुन राशी व्यक्ती सतत आघाडीवरच राहाव्यात अशीच या वेळच्या ग्रहस्थितीची इच्छा दिसते. आणि ती त्यांची इच्छा लवकरच फलद्रूप होण्याचा प्रत्ययही तुम्हांला यावा.

२०, २२, २३, २५ या तारखांवर सारे लक्ष केंद्रित करा.

**कर्क :** सध्या आपणांस बरेचसे ग्रह अनुकूल असूनही मनावर सतत दडपण पडल्यासारखे जाणवेल. आठव्या मंगळाचा ताण कित्येक वेळा असह्य होतो. अहोरात्र परिश्रम करून कामांचे डोंगर उपसावे लागतील. थोरामोठ्यांच्या भेटीगाठीने अनेक राजकीय पेचप्रसंग सोडवावे लागतील. क्षणाची उसंत नाही की, समाधानाची झोपही नाही.

पण या वेळचे सारे परिश्रम भावी प्रगतीच्या उभारणीसाठीच केले जात आहेत. प्रामुख्याने २० जानेवारीचा सूर्य-हर्शल-त्रिकोण अनपेक्षितपणे स्थानांतर घडवून आणील, अनेक नव्या कार्याला प्रवृत्त करील.

दि. २०, २३, २५, २६ या कालात अनपेक्षितपणे प्रगतीला चालना मिळावी.

**सिंह :** कुंभेत मंगळ आल्यापासून तुम्हा साऱ्या सिंह राशी व्यक्तींचा व्यवसायक्षेत्रातील दबदबा बराच कमी झालाय असे काही लोकांना उगीचच वाटू लागलंय. पण तो त्यांचा भ्रम आहे. सिंहेत गुरू असेपर्यंत तुम्हांला कोणालाही डरायचे कारण नाही. किरण साधून झप घेण्याचा तुम्हा सिंहांचा स्वभावच.

या आठवड्यात तशी संधी चालून येत आहे. रवि-हर्शल-त्रिकोणाबरोबरच (२० जानेवारी) तुमच्यातील सुप्त कर्तृत्वाचे जगाला दर्शन घडू लागेल.

राजकीय क्षेत्रात गर्जना करू लागाल. समाजात तरी तुमच्याविना पान हालेनासे होईल. व्यवसायक्षेत्रात तुमचाच शब्द प्रमाणभूत मानला जाऊ लागेल.

हा आठवडा अनपेक्षित प्रगतीचा निश्चितच ठरेल.

दि. २०, २२, २४, २६—या दिवसांवर टपून बसा.

**कन्या :** या वेळचे अनेक ग्रह तुमच्यावर प्रसन्न दिसतात. तुमच्या कन्या राशीत कित्येक दिवसांपासून हर्शलचे वास्तव्य आहे. या आठवड्यातील बु-ह-त्रिकोण व सूर्य-हर्शल-त्रिकोण या ग्रहस्थितीमुळेच हर्शलचा लोकविलक्षणपणा, त्याचे अनन्यसाधारणत्व, त्याच्यातील कलात्मक प्रवृत्ती या सर्वांचे आपणांस दर्शन घडेल.

व्यावसायिक क्षेत्रातील आघाडीचे स्थान लाभेल. संशोधन विभागातील सामाजिक संघटनेतील आपले श्रेष्ठत्व निरपवादपणे सिद्ध होईल.

श. रा. ची दुक्कल सप्तमात आहे याची मुळीच खंत बाळगू नका. सांपत्तिक बाबतीतील तुमच्या अपेक्षा बऱ्याच प्रमाणात सफल व्हाव्यात.

दि. २०, २१, २५, २६ या वेळी विक्रमी यश संपादन कराल.

**तूळ :** मंगळाची वटवट मिटली पण सूर्याची सुरू झाली. चतुर्थात दोन्हीही ग्रह एकंदरीत अनिष्टच. चालत्या गाड्याला खीळ कशी लागेल एवढाच त्यांचा विचार. पण गुरूच्या कृपेने पावन झालेल्यांना कोणताच अनिष्ट ग्रह फारसा त्रासक ठरू शकत नाही.

या कालीही तुमचे व्यक्तिमत्त्व नेहमीप्रमाणेच आकर्षक राहील. एवढेच नव्हे तर रवि-हर्शल-त्रिकोणामुळे कलाक्षेत्रातील अनन्यसाधारण महत्त्वही तुमच्या वाट्यास येऊ लागेल.

यांत्रिक धंद्यातील व्यक्तींना हे दिवस विशेष प्रगतीचे जाणवतील.

दि. २०, २४, २६ – अनेकांचे हार्दिक सहकार्य लाभेल.

**वृश्चिक :** पराक्रमस्थ सूर्यामुळे चौथा मंगळ निष्प्रभ ठरेल. तो सहसा तुमच्या प्रगतीच्या आड येण्याचे धाडस करणार नाही.

या वेळी तरी तुमचे भवितव्य घडविणार आहेत सूर्य–हर्शल. त्यांच्या अंशपूर्ण त्रिकोणात किती अचाट सामर्थ्य साठवलेले असते, याचा प्रत्यय हातोहात येऊ लागेल.

कलाक्षेत्रात सौंदर्यप्रसाधनांच्या व्यवहारात, यांत्रिक धंद्यातही आजवर कधी न लाभलेले यश या वेळेस लाभू शकेल.

दूरचा प्रवास घडेल. राजकीय क्षेत्रातील थोर व्यक्तींचे सहकार्य लाभेल, पैसाही अनेक मार्गांनी हाती येईल.

दि. २०, २२, २४, २६ – या काली अनेक संस्मरणीय प्रगत घटना घडाव्यात.


स्वादिष्ट मिठाईसाठी
आम जनतेची निवड

# शर्मा स्वीट मार्ट

दत्त मंदिराशेजारी,
मंडई रस्ता, पुणे २.

**धनू :** भाग्यात गुरू आणि पराक्रमात मंगळ यशस्वी व प्रगत जीवन जगायला एवढी ग्रहस्थिती बस्स! या काळी तुम्ही कुठेही गेलात आणि काहीही केलेत तरी अपयशाची धास्ती नको. चतुर्थातील शनी–राहूबद्दल इतक्यातच धास्ती बाळगण्याचे कारण नाही.

आगामी ८–१५ दिवसांत दूरचा प्रवास घडेल. नोकरीत अनपेक्षितपणे स्थलांतर घडेल. कदाचित गेल्या ८–१५ दिवसांत घडून आलेही असेल. प्रगतीच्या नव्या वाटा दृष्टिक्षेपात यायला लागतील. कौटुंबिक कटुता, व्यावसायिक संघर्ष सारे काही मिटून अनूकूल व उत्साही वातावरण सर्वत्र दिसू लागेल.

दि. २० ते २४ – यांतील प्रत्येक दिवस महत्त्वाचा ठरेल.

**मकर :** धनस्थानी मंगळ अष्टमात गुरू सांपत्तिक ताण इतका वाढेल की, काही सुचेनासे होईल. उलट पैसा ही बाब सोडून दिली तर या काळाइतका सर्वोत्तम यशाचा अत्युच्च प्रतिष्ठेचा काळ हाच. रवि–हर्शल–त्रिकोणाचे सामर्थ्य तुम्हा मकर राशी व्यक्तींनाच अधिकाधिक प्रत्ययास यावे.

परदेशगमन–दूरचे स्थित्यंतर, यांत्रिक धंद्यात उत्क्रान्ती, शिक्षणात, सामाजिक जीवनात अत्यानंदाच्या घटना हे सारे या काळी घडून यावे – काही बाबतीत तुमच्या जीवनातील अधिकाधिक उत्कर्षाचा काळ हाच.

दि. २२ ते २४–अनेक चिरंतन स्मृतींच्या घटना या काली घडून याव्यात.

**कुंभ :** शनी-राहू पुढे आणि सूर्य मागे व मंगळ मध्ये – सारेच प्रखर ग्रह तुमच्या राशीच्या आसपास संचारत आहेत. गुरू या सर्वांची उग्रता कमी करायला समर्थ असला तरी – हे दिवस संपूर्ण स्वास्थ्याचे व घवघवीत यश देणारे नव्हेतच.

काहीसे जपून – केव्हा केव्हा माघार घेऊन आणि सतत जुळते-मिळते घेऊन वागलात तर या ग्रहांची उग्रता फारशी बाधू नये. दूरच्या प्रवासाचे शक्य तो टाळा. साहसी कार्याला उद्युक्त होऊ नका. वरिष्ठांशी नम्रतेने वागा.

दि. २१, २३, २६ या काळी थोडाफार अनुकूल घटना घडाव्यात.

**मीन :** मंगळाने आपला बराचसा अपेक्षाभंग केलाय. यातून शनी–राहूची तुमच्या राशीमध्येच गट्टी जमलेली. यामुळे हे सध्याचे दिवस फारसे स्वास्थ्याचे–समाधानाचे जातील असे दिसत नाही. पण सूर्य–बुध एकादशात आणि त्यांचा हर्शलशी त्रिकोण एवढी एकच गोष्ट समाधानाची आहे. या योगाच्या कृपेने, पैशाआडव्याची विवंचना सहसा जाणवणार नाही. व्यवसायधंद्याचे क्षेत्र सहसा दूषित होणार नाही. सामाजिक राजकीय प्रतिष्ठेलाही फारसा धक्का लागू शकणार नाही, थोडाफार त्रास जाणवेल तो प्रकृतीचाच.

दि. २०, २४, २६– काही गोष्टींत चांगले यश मिळावे.

○

MANOOS (Weekly) : 40 Paise : Regd. No. M H–649




राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक, संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक **श्री. ग. माजगावकर** यांनी संगम प्रेस प्रा. लि., ३८३ नारायण पेठ, पुणे २, येथे छापून, ४१९ नारायण पेठ, पुणे येथील संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले. सं. **श्री. ग. माजगावकर.**